# माणूस

शनिवार । २४ सप्टेंबर १९७७ ७५ पैसे




## यापुढील अंक

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या आत्मसंरक्षक राजकारणाचा

मागोवा घेणारा

## कृष्णा - कोयना विशेषांक

# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक सतरावा

२४ सप्टेंबर १९७७

मूल्य ७५ पैसे

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरदरे

¤

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी, साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


# माळावरचं शेत

कुसुम कर्णिक

दुपारचं ऊन तापलं होतं. एकादा चुकार ढग पावसाळा असल्याची आठवण देत निघून जात होता. आम्ही तिघजण आणि प्रभाकर खुडे त्याच्या शेतावर निघालो होतो. वर्षापूर्वी प्रभाकरला जमीन मिळाली होती. भूमिहीन म्हणून. त्यावर त्याने घायपाताची १०० रोपं लावली होती. ती बघायची होती.

'फार, लाब आहे शेत. इतक्या लांब कशाला जायचं?' त्याची थोडी कुरकुर चालली होती 'रोप काही टिकत नाहीत. किती राखण करायची ? जरा राखण नसली की मेंढ्या-बकऱ्या खातायन. इतक्या लाब राखण कशी ठेवणार? आणि दिवसभर राखणीला बसलो तर खाणार काय ?' असे तसे तो बोलत होता. थोडे स्वत.शी, आम्ही ऐकल्यास आमच्याशी. आम्ही त्याच्या अडचणी मान्यच करून टाकल्या; कारण त्या खऱ्या होत्या. २–२॥ मैल असलेल्या शेतावर १०० घायपाताच्या (आम्ही म्हणजे 'ग्रामायन'ने दिलेल्या) रोपांची राखण करीत बसणे हे अशक्यच आहे

आम्ही समजू शकतो आहोत असे दिसल्यावर प्रभाकर बोलायला लागला. 'माग वस्तीन सगळे 'सकट' असताना तू एकच खुडे कसा ?' अशा प्रश्नानी गप्पांची सुरुवात झाली.

त्याची आई सकटाकडची; पण बापानं दुसरी सोयरीक केली तेव्हा आई प्रभाकरला घेऊन भावाकडे माघारी आली. मामाच्या आश्रयावर प्रभाकर वाढला. नववीपर्यंत शिकला. इतकं शिकल्यावर कुठे तरी सरकारी नोकरी मिळेल अस फार वाटलं होतं; पण वशिला कुठून आणायचा ? फार खटपट केली; अर्ज घातले, भेटलो पण काही जमलं नाही मामाकडे कवर रहायच ? त्याच्यावर काय आपला अधिकार आहे का ? त्याला त्याचच थोड झालं, तो आपलं कुठ बघणार ? सरकारनं झोपडी दिलीय. हक्काचं घर झालय. आई आणि मी रहातो तिथे.

दोन वर्षांपूर्वी बघा तोडावरून वारं गेलं. तोड पार इकडचं तिकडे सरकून गेल होतं. अजूनपण बोलायला त्रास होतो. कायवाय उपाय केले. कुणी देवाच सागितल तर त्याची पूजा केली. धनगराचा देव तिकडे लाव, तो सुद्धा केला. डॉक्टर केले. कोण काय सागत, कोण काय सागतं. आपल्याला सगळयाच ऐकलं पाहिजे. अजूनपण त्रास होतो बोलायला; पण खूप गुण आलाय आता.

मला सागावस वाटलं की, त्रास होत असला तर बोलू नकोस; पण तो अशा प्रकारे बोलत होता की आतापर्यंत त्याचं दु:ख ऐकायला कोणीच मिळालं नव्हत.

शिकलोय तसा मी. पण काय उपयोग झाला नाही बघा; पण आता सरकारन जमीन दिली आहे. आता करायचं काही नाही. माझी हक्काची जमीन झाली. कायमचा आधार झाला. काय पिकल ते खाईन पोटाला; पण फार लाब आहे जमीन. राखण करायला जमत नाही. रोज फेरी मारायलाही जमत नाही. आपण इकडं मजुरीत गुतलेलो. तिकडे ढोरं, शेळ्या-मेंढ्या घालतात शेतात. कुणाशी भांडायचं ? आपल्याला काय बळ आहे का भांडायला ? आपण गरीब पडलो. कोण ऐकणार आपल्याला !

सरकारन जमीन दिली आहे. घर दिल आहे आता होईल काही तरी हातून. इदिराबाईला आमची गरीबाची कळकळ होती. आमच्यावर लक्ष होतं तिच. नाहीतर आमच कोण बघतय ! कुत्र्यावाणी जगायच तसच मरायचं.

पण जमीन मिळालीय आता. करायचच काही तरी आता. तसं मला गुळाच काम येतं लई बोलावणी येतात; पण यदा नाही गेलो. ठरवल, आपल्याला जमीन मिळाली आहे ती कसायला पाहिजे. कामावर जाऊन कस चालेल ? ओस पडली तर सरकार परत घेईल काय सागावं ?

कशी काय मिळाली रे जमीन तुला ? सगळ्याना नाही मिळाली वस्तीवर ?

त्याच काय झाल, माझं नशीबच जोरावर होतं. आम्ही सगळ्यांनी मामलेदाराकडे अर्ज केला होता. मामलेदार आला. त्याला मी खरीखरी हकीगत सागितली. मला काही आधार नाही. मदतीला कोणी नाही. खूप अर्ज होते. मग चिठ्ठ्या करून एका लहान मुलाच्या हाती त्या उचलल्या. त्यात माझा नंबर लागला. मला पाच एकर जमीन

मिळाली. सांगताना प्रभाकर खुलला होता. खूप मोठं काही तरी त्याला मिळाल होत. जमीन मिळाली तसा मी अर्ज केला की माझी जमीन ट्रॅक्टरने नांगरून मिळावी. आणि एक दिवस सकाळी ट्रॅक्टर माझ्या दारात आला. लोक आश्चर्य करायला लागली, याच्याकडे कसा ट्रॅक्टर आला ? सोमेश्वर साखर कारखान्याने ट्रॅक्टर पाठवला होता. ट्रॅक्टर–वाल्याची जेवायची फक्त सोय करायला लागली. काय एक पैसा नाही घेतला त्यानी गरीबाकडून.

आम्ही बरेच चालून आलो होतो तरी अजून शेत येत नव्हतं गाव मागे टाकून आम्ही डोंगराच्या कुशीत आलो होतो. सभोवताली सारा माळ पसरला होता. पाऊस या भागात फार बेताचा आणि दगडाळ जमीन. गवताच पानही नाहीये. काळे गोल दगड सगळीकडे विखुरलेले आहेत. चहूकडे नजर टाकली तरी शेत म्हणता येईल असं काही दिसत नव्हतं.

मला आणि एका महाराला एकाच सर्व्हेनंबरमधली जमीन मिळालीय. तो पडला पैसेवाला. त्यातल्या त्यात बरी बाजू त्याने घेतलीय. आपण गरीब काय बोलणार ? मी सर्कलला, तलाठ्याला सांगून बघितल तर ते म्हणाले, तुला जमीन नको असली तर तस लिहून दे।' म्हणजे आला का प्रश्न ? एवढा अर्ज केला; कोणाला नाही ती जमीन मिळाली आणि आता नको म्हणून कशी सागू ? आणि गरिबाला भांडायला कुठं वळ असतय? शिवाय ते म्हणणार जमीन-नको होती तर अर्ज कशाला केलास ? काय थट्टा वाटली काय ? मग काय करायच ? मिळेल ती जमीन घेतली. गावात विहिरीची जमीन सीलिंग-मध्ये निघाली; पण ती कशाला आमच्या वाट्याला येतेय. ती गेली पैसेवाल्यांकडे आपण काय करणार गप्प बसायलाच लागत !'

दूर खडकाळ जमिनीत एक काहीसा हिरवा पट्टा दाखवत तो म्हणाला, 'आता थोड चालल की आलाच शेत.'

आम्ही जवळ गेलो तेव्हा धक्काच बसला. त्या जमिनीला शेत म्हणणे म्हणजे थट्टा होती. सगळीकडे दगडगोटे आणि खडकाळ जमीन. त्यात मधेमधे माती. गेल्या वर्षी पाच एकरात मिळून ३० किलो ज्वारी पिकली होती यदा खरिपात थोडी बाजरी, मूग, हुलगे असे पेरले आहेत त्यांनी. बाजरीच्या सहा इंचाच्या रोपाला २–३ इंचाची खुरटी कणसं आली आहेत. जमीन या नावाखाली प्रभाकरच्या मानेभोवती मोठा धोंडा अडकवून त्याला बुडवायची व्यवस्था झालेली आहे; पण तरी त्या जमिनीचं प्रभाकरला अप्रूप झालं आहे. त्याच्या साऱ्या आशा त्या मातीत जीव धरू पाहत आहेत. त्याचा पालवी फुटायला पाहते आहे मी मात्र बघून हैराण झाले आहे. शेजारच्या महाराची जमीनही तशीच आहे उडदामाजी निवडणेही कठीण तरी त्यातल्या त्यात गोरा काळ्याला हिणवत असेल कदाचित आणि काळ्याला गोऱ्याचा हेवा वाटत असेल एवढेच. त्यात त्याची जमीन ट्रॅक्टरने खरवडून दिल्याचे उपकार सरकारने त्याच्यावर करून, ठेवले आहेत. त्या उपकाराखाली तो दबून गेला आहे त्याला माळसुद्धा सुखावतो आहे, पल्लवित करतो आहे

शेतावरून निघालो. काही वेळ कोणीच काही बोलले नाही. कधी नव्हे ती जमीन मिळाल्याने प्रभाकर मोहरून गेला होता त्याच्या आनंदावर विरजण घालावे की नाही असा प्रश्न पडला होता. त्याच्या आशा आभासात्मक असल्या तरी त्यावर निखारे ठेवावेसे वाटेनात, पण त्या माळाने मनात मात्र रखरखाट होतं होता.

येताना एका शेताच्या बांधावर घायपात दिसला त्याची माहिती करून घ्यावी म्हणून बांधावर गेलो शेत सधन दिसत होते. १०–१५ इंच पाऊस पडणाऱ्या भागातही ऊस होता, पेर–भात होते. आम्ही बांधावर का शिरलो याची चौकशी करत शेताच्या मालकीणबाई आल्या ओचा-पदर आवरून; डोळ्यात तेल घालून पोटच्या पोराप्रमाणे त्या शेताची काळजी घेत असाव्यात.

आम्ही मांगाच्याबरोबर काम करतो हे ऐकल्यावर त्याच्या कपाळावर स्पष्ट आठी पडली. 'हे लोक माजले आहेत. मस्तवाल झाले आहेत काम करायला नको. नुसते हिंडायला हवे सरकारने यांना डोक्यावर बसवून ठेवले आहे. याना जमीन द्या, घर द्या मग हे माजतील नाही तर काय ? आणि तुम्ही त्याना मदत करा वरती परवा यातल्या एकाला सागितलं 'जरा एवढ दारातल गाजर-गवत काढ, पसाभर धान्य देईन. तर सरळ म्हणतो माझा दिवसाचा रोज बुडवून मी कशाला येऊ पसाभर धान्यासाठी ? आता येऊ दे गरजेच्या वेळेला. मग सागत त्याला. यांना उपास पडले तरच हे वठणीवर येतील ! सरकारने डोक्यावर बसवलं आहे यांना !' बाईंची मुलुखमैदान तोफ गरजत होती. प्रभाकर आमच्याकडे आणि बाईंकडे आळीपाळीने बघत होता. माझ्या डोळ्यासमोर प्रभाकरचा १०×१० चा ऐसपैस राजवाडा आणि पाच एकराचा माळ आला.

बाईंकडे आम्ही पाणी मागितले आम्हाला पाणी मिळाल प्रभाकरने मागितलेही नाही आणि त्याला मिळालेही नाही.

बाईंशी आक्रमक पवित्रा घ्यावा की नाही अशा संभ्रमात एकजण तर एकाचा पवित्रा सरळ आक्रमक, भांडणाचा. यात प्रभाकर काहीसा गोंधळला होता. परत रस्त्याला लागल्यावर तो बोलायला लागला, 'हे वरचे लोक आम्हाला असेच वागवतात आम्हाला पाणी देत नाहीत दिले तर वरून ओततात. आम्हाला देवळात यायला देत नाहीत. देव काय यांचाच आहे का ? सगळी माणसे सारखीच असतात ना ? मग आम्ही आत गेलो तर काय होते ? आम्ही देवळात गेलो तर हे लोक ते देऊळ वर्ज करतात !' त्याच्या मनातून ठिणग्या उडत होता. आमच्याजवळ त्याच्या सांत्वनाकरिता शब्दच नव्हते

तात्यासाहेबाना भेटायला गेलो; पण ते बाहेरगावी गेले होते. त्याच्या शेताचे दर्शन नजर सुखावीत होते ऊस, मका, ज्वारी, बाजरी, केळी, नारळी यानी जमीन नटली होती. बांधावर घायपात वाढला होता. शेजारच्या ओढ्यातून पाणी वाहात होते. विहिरीवर मोटार होती त्याची खूप जमीन आहे; खूप कष्टाने त्यानी ती समृद्ध केली आहे पण समृद्धीचा जोर काही वेगळा असतो 'घायपात चांगल्या किंमतीला गेला तरच विकीन। नाही तर कुजू दे तिथेच ! हवा असला तर घेतील नाही तर राहिला !' मग त्या अवास्तव किंमतीला घेण्याशिवाय मांगाना काही पर्याय उरतच नाही.

येताना आवारात ३।४ गावकरी भेटले. त्यांच्याशी चौकशी केली. ते तात्यांची जमीन ६ व्या हिस्स्याने करतात. 'आमच्याजवळ जमीन नाही; पण ती सरकारची जमीन घेण्यात काही अर्थ नाही. २–२॥ मैलावर ती जमीन आणि तीही खडकाळ ! तिच्यात काय उगवायचंय ? आणि काय खायच ? माणसाला बुडविणारी जमीन आहे ती ! त्यापेक्षा हे आम्हाला चागल परवडतं आम्ही ६ हिस्से खर्च करतो, तात्या ४ हिस्से करतात. उत्पन्न वाटून घेतो तसच. सरकारची जमीन घेण्यात काही अर्थ नाही माणूस मरेल पण ती जमीन नाही पिकायची ! ' ते सागत होते

प्रभाकरला त्यांनी छेडल. 'काय रे तुझ्याकडे जित्राब नाही, ना नागर ना कुळव ! काय मशागत करणार रे तू शेताची ? '

प्रभाकरला पडलेला प्रश्नच ते त्याला विचारीत होते.

आम्ही परतलो तेव्हा बरेच काही नवीन समजले होते; पण समजून मन उदास झाले होते, सुन्न झाले होते. या समाजात न्याय-प्रस्थापना होऊ शकेल का कधी ? म्हणूनच बहुधा सुशिक्षितवर्ग हे बघण्याच्या भानगडीत पडत नसावा 'कशाला हवी ही पीडा ? त्यापेक्षा गाणं ऐकाव, नाटक बघाव, सिनेमा बघावा, टी व्ही. आहेच ! ' अशी वृत्ती तो धारण करतो, पण डोळे झाकून परिस्थिती बदलणार नाही। डोळे उघडे ठेवून परिस्थितीच भान ठेवावंच लागेल ! □

# मुक्ताफळे

## □ हास्य–शिबीर

इंदिराजीची काँग्रेस नाश पावली असे अनेकजण समजतात. दुर्दैव नशिबी आल्यावर यशवंतरावांनी महाराष्ट्रात जागोजाग 'शिबीरे घ्या' हा संदेश सर्वांना दिला. त्याचा 'टाहो' ऐकून अनेकांचे हृदय हेलावले–

कोणीच येईना का ?
कोणी असेल का हो ?
असल्यास या 'शिबीरा'
या हो खरेच या हो !
माझ्या पराभवाची
आताच का टवाळी ?
मागून गा कवाली !
आता समोर या हो !
पोलाद जाळणारी
होती उरात मस्ती,
गेली उठून वस्ती,
आम्हीच फक्त आहो !
आता मला अशा का
दिसतात फक्त भिंती ?
सारे प्रतिध्वनी ते
शिबीरात देत टाहो !

पण जमली ! मंडळी जमली आणि मुंबईला काँग्रेस कार्यकर्त्यांचे दोन दिवसाचे शिबिर भरले. जनता पक्षाचे पानिपत करण्यासाठी जमलेले काँग्रेसचे अहमदशहा अबदाली, शुजाउद्दौला आणि कुतुबशहा यांनी या शिबीरात नुकत्याच झालेल्या पराभवाची कारणमीमांसा तर केलीच; पण हे करताना अशा दारुण प्रसंगी धीर देणारी जी समर्थ वस्तू हास्य–ते शिबीरात खेळते ठेवले. दक्षिणेकडे अजून धुगधुगी आहे. दाक्षिणात्य ग्रंथ 'कुरल' सांगतो–

'दुर्दैव नशिबी आल्यावर प्रसन्न मुखाने त्याचे स्वागत करा ! अशा वेळी धीर द्यायला एकच गोष्ट असते. ती म्हणजे हास्य !'

–कुरल, सर्ग ६३

१२ सप्टेंबरच्या इंग्रजी टाइम्समध्ये पहिल्या पृष्ठावर अहमदशहा अबदाली यांनी विनोद केला असून, मुंबई मंत्रिमंडळातील समस्त मंत्र्यांची कुटुंबे त्या हास्यरसात बुडाल्याचे जे चित्र प्रसिद्ध झाले आहे ते आपण पाहिले का ? या महिन्याची रद्दी अजून विकली नसल्यास अजून तुम्हाला ते पाहता येईल. पु. ल. ना काय वाटते आपणच लोकांना हसवतो ? हे चित्र पहा म्हणावं. तुम्ही विचाराल, नेमका विनोद काय केला ? तर ते 'टाइम्स'च्या वार्ताहराने दिलेले नाही. आमचा तर्क आहे पूर्वीचे मुख्य मंत्री शंकरराव चव्हाण यांना काही तरी मार्मिक कोपरखळी दिली गेली असावी. प्रश्न विनोद काय होता अथवा कोणत्या दर्जाचा होता हा नाही. हास्य निर्माण झाले हे नक्की ! कारण छायाचित्रात सर्वजण हसताना दिसत आहेत. ही लक्षणे निश्चित नाश जवळ आल्याची नाहीत.

शुरू हुवा है जंग हमारा ! १९ सप्टेंबरला जनता पक्षाविरुद्ध लढा सुरू करा असा आदेश २३–२४ ऑगस्टला दिल्लीला भरलेल्या काँग्रेस वर्किंग कमिटीने दिला आहे. इंदिराजीचे लढाऊ मार्गदर्शन या लढ्याला आहे त्यांनी दौरा काढलेला आहे. ५ सप्टेंबरला हरद्वार येथे त्यांनी मार्गदर्शन केले–

'जनतेने गरिबीविरुद्ध लढा दिला पाहिजे. जर आवश्यकता भासली तर तो रक्तरंजित असला तरी चालेल. कारण समाजवादाच्या निर्मितीसाठी हे रक्त सांडेल.'

रक्त कुणाचे सांडायचे ? इंदिराजींनी अंगुलीनिर्देश केला.

'रा. स्व. संघाचा प्रभाव वाढत जाईल तो दिवस देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने दुर्भाग्याचा ठरेल !'

यशवंतराव मोहित्यांना यापेक्षा जास्त माहिती होती. त्यांनी सांगितले–'आज हेरगिरीची सूत्रे संघवाल्यांच्या हाती आहेत. काँग्रेस नष्ट करून फॅसिस्ट राजवट आणण्याचा डाव संघाने चालविला आहे. आम्ही काही मेल्या आईचे दूध प्यायलेलो नाही !'

रक्त सांडायला जोमदार सुरुवात झालेली आहे. इंदिराजी व यशवंतराव मोहिते यांच्या प्रभावाचे हे लक्षण आहे. इंदिराजींचा जयजयकार करण्यास नकार दिला यासाठी काँग्रेसमधले सूर्याजी पिसाळ, काँग्रेसचे माजी चंद्रजित यादव यांच्यावर हात टाकण्यात आला. २६ ऑगस्टला लखनौ येथे चंद्रजित यादव यांच्या अंगावरचे कपडे फाडून त्यांना याद राहील अशी मारहाण करण्यात आली.

'केंद्र सरकारने संघाला खत-पाणी घालून वाढविले तर आम्हालाही तसेच करावे लागेल !' हे यशवंतराव मोहित्यांचे धमकीचे शब्द २७ ऑगस्टला वृत्तपत्रात येतात न येतात तोच २८ तारखेला खेरवाडी येथे वांद्र्याला जनता पक्षाचे कार्यकर्ते श्रीपाद लक्ष्मण बागवे या २५ वर्षांच्या तरुणाचा, भर दिवसा सकाळी ११॥ वाजता भोसकून खून पाडण्यात आला ! पकडलेले चारी संयशित हे 'शिवसैनिक' आहेत ! शरद पवार जातीने सर्व गुंडांकडे लक्ष देत आहेत. खत-पाणी घालायला मोहिते तयार असल्यास इथे शौर्याला मंडळी कमी पडतीलसे वाटत नाही !

२ सप्टेंबरला दैनिक 'दिव्यवाणी'चे संपादक राघवेंद्र नागोरी (वय २८) यांचा कार्यालयात पूजा करीत असताना खून पाडण्यात आला ! राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी सहानुभूती बाळगणारे हे संपादक होते.

अशा रक्तरंजित पार्श्वभूमीवर भरलेल्या शिबीरांत 'हास्य' खेळते ठेवणे किती कठीण होते याचा विचार करा ! जनता पक्षाविरुद्ध सुरू झालेल्या लढाईत ज्या खालील फितुरांनी आधीच पळ काढला त्यांचा आधी तीव्र निषेध करतो.

'५६ वर्षे ज्या पक्षात काढली त्याचा त्याग करतो आहे. कारण काँग्रेस पक्ष काही शहाणपणाने वागेल ही आशा आता मावळली आहे'

गुलझारीलाल नंदा. १०-४-७७

'लोकसभेच्या निवडणुकीत ज्यांनी अनेक काँग्रेस उमेदवारांच्या पाठीत वार केला असा बदमाश ब्रह्मानंद रेड्डी यांना तुम्ही अध्यक्ष केलेत–मी काँग्रेसपक्षाचा प्रतोद राहू शकत नाही !'

–के. रघुरामय्या. १२-४-७७

'लोकसभेच्या निवडणुकीतील पराभवाने काँग्रेस शहाणी होईल असे मला वाटले होते,

पृष्ठ २८ वर

# चक्रमचक्री ( २४ )

# सहकारी शिक्षण

दीर्घस्मृती विश्वनाथ

या विश्वनाथ, नमस्कार !

नमस्कार !

का हो, एक आठवडा नाहीसेच झाला होतात, आपण इंदिराबाईंविषयी बोललो तेव्हापासून ?

त्याचं काय झालं, आमचे चाफाजीराव पाटील आले होते; बळेच घेऊन गेले मला दूधवाडीला !

चाफाजीराव म्हणजे तेच ना, की ज्याना काँग्रेसची खासदारकी हवी होती ? त्यांच्याबरोबर तुम्ही दिल्लीला गेला होता ?

हो तेच ! त्यानतर मी त्याच्याबरोबर बॅरिस्टर विठ्ठलरावांना भेटायला गेलो होतो...

आणि त्या वेळी बॅरिस्टर-साहेब आपल्या पश्चात्तापदग्ध अंत:करणाला शांतवीत पडले होते !

तेच हो ! तर ते गेल्या आठवड्यात आले आणि मला म्हणाले, 'मास्तर, चल दूधवाडीला. आमच्या वसंताला मॅनेजिंग डायरेक्टर करायचाय् साखरकारखान्याचा; त्याचा समारंभ आहे !'

हा कोण वसता ? आणि साखरकारखाना कोणता काढलात ?

अरे, तुम्हाला चाफाजीरावाची काहीच माहिती दिसत नाही !

छे हो, कुठून असणार ?

हं:, म्हणजे बरीच हकीकत सांगावी लागणार तुम्हाला !

तुम्ही सांगितल्याशिवाय थोडेच रहाणार ! सागा बरं, कोण हे चाफाजीराव ? कोणता साखरकारखाना आणि त्याचा मॅनेजिंग डायरेक्टर होणारा हा वसंता कोण ते.

त्याचं काय आहे की, पुणे-सोलापूर रस्त्यावर दूधवाडी म्हणून एक गाव आहे. तिथे पूर्वी एक लहानसा खाजगी साखरकारखाना होता. माझे वडील त्या साखरकारखान्यात चीफ इंजिनियर होते. चाफाजीराव दूधवाडीचे पाटील ! माझ्या वडिलाची आणि त्यांची चागलीच ओळख. आमच्याकडे नेहमी यायचे. माणूस हिकमती, गोष्टीवेल्हाळ आणि दिलदार ! माझ्यासारख्या लहान मुलाला कुठे वावडीच करून दे, विटी–दाडूच खेळ, भोवराच फिरवून दाखव असे खेळ करायचे. त्यामुळे मला त्यांचा फार लळा ! आता इतकी वर्षं झाली, पण अजूनही माझ्यावर त्याचा फार लोभ आहे. बरं, माणूस तालेवार पडला, आपणही त्याची मर्जी सांभाळली पाहिजे !

हां, पण त्यानी साखरकारखाना केव्हा काढला ?

## सहकारभीष्म

त्याचं काय झालं की, १९६१ चा सीलिंगचा कायदा यायचं ठरल. तेव्हा मी मगाशी सांगितलेल्या खाजगी साखरकारखान्याने चाफाजीरावासारख्याकडून खंडाने घेतलेली जमीन शेतकीमहामंडळाकडे जाणार असं दिसायला लागलं. त्यावेळी चाफाजीरावानी उचल खाल्ली आणि त्या खाजगी कारखान्याचच सहकारी साखरकारखान्यात रूपांतर केलं. मूळची अडीचशे टनी साखरेची गिरणी आता पधराशे टनी झालेली आहे चाफाजीराव धाडे पाटील ही मोठी धनत्तर आणि जबरदस्त असामी झाल्येय् !'

वा, वा ! इतर उद्योगही बरेच असतील ?

तर ! दर भागधारक शेतकऱ्याला जर्सी गाय, मेरिनो मेंढी आणि लेगहॉर्न कोंबड्या पुरवून शेतीला जोडउद्योग करून दिलेत ! साखरेच्या जोडीला डिस्टिलरी काढून देशी बनावटीची दारू वाहती ठेवली आहे. शाळेच्या जोडीला दोन-अडीचशे विद्यार्थ्यांचं आर्टस्-कॉमर्स-सायन्स कॉलेज आहे !

म्हणजे सकाळी चहासाठी गाय, दुपारी ज्ञानप्राशनासाठी शाळा-कॉलेज आणि रात्री वारुणी-विलासासाठी मद्यार्क-निर्मिती अशी तिहेरी सोय केलीय चाफाजीरावानी !

खेरीज कागद-कारखाना, वर्कशॉप याही योजना कार्यान्वित होत आहेत. स्वत: चाफाजीराव पंचायत-समितीचे अध्यक्ष, झेड. पी. चे उपाध्यक्ष, आमदार अशा पायऱ्या चढून गेल्या मार्चमध्ये लोकसभेचे तिकिट मिळवण्याच्या विचारात होते; पण आता ती ईर्षा गेलेली दिसते. वसताला येत्या फेब्रुवारीत 'जन्ता' चं विधानसभेचं तिकिट मिळावं म्हणून खटपटीत आहेत तें !

म्हणजे चाफाजीरावांच्या कर्तृत्वाचा शेतमळा चहूबाजूनी हिरवा कच झालाय म्हणा ना !

बरोबर बोललात; पण आता चाफाजीराव थकत चालले. त्यातून वसंतालाही फार दिवस गप्प बसून रहावत नाही. आपल्या मोंगल बादशहाचं असे ना, की तख्तानशीन बादशहाचा दुय्यम शहाजादे करू लागत; तसंच या साखर-सम्राटाच आहे. त्यामुळे चाफाजीरावानी ठरविल की, वसंताला 'नीरातीर सहकारी साखरकारखान्या'चं मॅनेजिंग डायरेक्टर करून टाकावं. त्यानंतर त्यांचा साठी-समारंभही होणार आहे.

छान छान ! मग वसंतरावदादा अध्यक्ष असतील ?

अध्यक्ष वसंतरावदादाच होणार आहेत; पण एस्. एम्., संभाजीराव काकडे आणि शरद पवार यांचीही व्याख्यानं होतील. खेरीज 'सहकारभीष्म' या चाफाजीरावांच्या चरित्राचं प्रकाशनही आहे. चाफाजीरावाचा निवृत्तिसमारंभ अशा झोकात साजरा झाला की मग ते 'एल्डर शुगर पॉलिटीशियन' म्हणून वावरतील आणि वसंतराव चाफाजीराव धांडे पाटील, बी. ई., मॅनेजिंग डायरेक्टर, नीरातीर सहकारी साखरकारखाना याची वैभवशाली आणि कर्तृत्वसपन्न कारकीर्द सुरू होईल !

## वसंतराव पाटील, बी. ई.

हा वसंतराव बी. ई. आहे ? हुशार दिसतो !

मलाही जेव्हा कळलं की, वसंता बी. ई. झालाय, तेव्हा जरा आश्चर्यच वाटलं. महा

डब्लिस कार्ट होतं माझ्यापेक्षा पाच–सहा वर्षांनी हा वसंतराव लहान. तो शाळेत जाणारा होता, तेव्हापासून मी ओळखतो त्याला. तेव्हासुद्धा त्याच्या लीलानी चाफाजीराव रंजीस आले होते. पुढे वसतराव कसाबसा एस. एस. सी. झाला. तेव्हा चाफाजीरावानी दूधवाडीला कॉलेज काढलं. मी त्या वेळी एम. ए. झालो होतो. चाफाजीरावांनी मला कॉलेजात घेऊन टाकलं. म्हणून तर मला 'मास्तर' म्हणतात.

छान छान! म्हणजे मोफ्युसिल कॉलेजात तुम्ही काम केलय तर!

सगळीकडचा अनुभव आहे मला. तेव्हा दोन वर्षं मी चाफाजीरावाकडेच होतो. बाळ वसता काही प्री डिग्रीचा उंबरा ओलांडायला तयार नाही!

सारा दिवस उद्योग काय असायचा त्याचा?

उद्योग? अहो, जनता पार्टीचं ग्रामीण भागातील लघुउद्योगाचं फंड वसतानं तेव्हाच उचलल होतं. दूधवाडीला साखरकारखाना निघाला, इतरही बारके-सारके उद्योग निघाले, तेव्हा मूळ दूधवाडीची झाली झोपडपट्टी! मग झोपडपट्टीतले उद्योग तिथेही सुरू झाले. धर्मा कोगाड्याची हातभट्टी हा वसतरावाच्या आश्रयाखाली चाललेला पहिला उद्योग! साखरकारखान्याच्या वस्तीत टाकून दिलेली फळ नगाला एक पैसा या दरानं खरेदी करून तीन पैशाला धर्माला विकायची हा धदा तो तेव्हा करीत असे. त्यामुळे धर्माच्या भट्टीवर सीझनप्रमाणे मोसबी, सत्री, डाळिबी हे अलीकडे निघालेले दारूचे प्रकार तेव्हाही मिळत असत; शिवाय, दूधवाडीच्या गटाण्या घालीत हिंडणाऱ्या पोरांटोराना रोजगार! आहे की नाही कर्तबगार मुलगा?

या हकीकतीवरून मला सजय गांधीची आठवण झाली.

हा सजय कुठून उपटला मध्येच?

त्याचं काय आहे की, मोहम्मद युनुस यांनी 'ब्लिट्झ्'मध्ये एक लेख लिहिला होता. त्यात म्हटलं होतं की, संजयला झोपडपट्टीतल्या राहणीची अगदी जवळून माहिती आहे. कारण, लहानपणापासून चादणीचौकातल्या झोपडपट्टीतून लोखडी सामान विकत घेऊन त्याच्या वस्तू तो विकीत असे. आपला हा वसंतरावही काही कमी दिसत नाही!

संजय इतपत कर्तृत्वाची माणस गावोगाव आहेत. फक्त त्याची आई–बाप पंतप्रधान नाहीत; त्यांच्या आरत्या ओवाळायला युनुस नाहीत आणि त्यांना विमानात घालून देशभर हिंडविण्यासाठी विठ्ठलराव गाडगीळ नाहीत!

## डेप्युटी चीफ इंजिनियर

हो, पण आपल्या या गप्पात प्री–डिग्रीचा उंबरा ओलाडताना सासरी निघालेल्या नवऱ्या मुलीसारखा अडखळणारा वसंतराव बी. ई. कसा झाला, हे सागितलच नाहीत!

तेच तर सागतोय ना! हां, तर मी सुरुवात कोठून केली?

की, चाफाजीराव तुम्हाला घेऊन दूधवाडीला गेले.

हूं, तर गेलो दूधवाडीला. पुण्याहून आणखीही पंधरा–वीस मंडळी, सरकारी ऑफिसर्स, गाय–वासरू पक्षाची माणसं, 'जनता'चे पुढारी वगैरे आली होती. त्यांची सोय गेस्ट हाउसवर! मी आपला चाफाजीरावाकडेच राहिलो. दुसऱ्या दिवशी वसतराव तख्तनशीन होणार होते. सकाळी सत्यनारायण, त्यानंतर वसतरावांना राज्याभिषेक आणि दुपारी पार्टी असा बेत होता.

पार्टी झोकात असेल!

ते विचारूच नका! बदामाच्या पाकळ्या घातलेला साखरभात आणि कोंबडीचा रस्सा असा मिश्र बेत होता. भोजकाचा अतरात्मा अगदी 'गोविंद, गोविंद' म्हणायला लागला!

जास्त वर्णन नका करू आता. वसंतराव बी. ई. कसा झाला ते सागा आधी!

सागतो हो. सगळ कस दमादमानं आणि बईजवारीनं करावं लागतं. तर, माझ्या शेजारी अविनाश कुलकर्णी बसला होता. 'आमचे नवे डेप्युटी चीफ इंजिनियर'. अशी त्याची ओळख चाफाजीराव–वसतराव या बाप-लेकानी आधीच करून दिली होती. तसा मी त्याला त्याच्या लहानपणापासूनच ओळखत होतो.

सगळ्यांशी बऱ्या तुमच्या आधीच्याच ओळखी?

त्याचं काय, झाल की, पूर्वी आम्ही सागलीला होतो तेव्हा कुलकर्ण्यांच्या वाड्यात बिऱ्हाडाने होतो. अविनाश हा मालकाचा मुलगा. फार कष्टाळू. रोज तास–दीड तास माझ्याकडे गणितं सोडवायला बसायचा. हुशार म्हणता नाही येणार; पण टापटिपीचा आणि अभ्यासू! घरची परिस्थिती बेताची. विधवा आई आणि तो याची गुजराण घराच्या भाड्यावर जेमतेम होई. तोही पुढे इजिनियरिंगला गेला आणि बरेचदा नापासही झाला असं ऐकून होतो. आता अविनाशसारखा मुलगा जेमतेम किर्लोस्कर कारखान्यात सुपरवाझर होईल एवढीच अपेक्षा! हा बामणगडी एका दीड हजार टनी सहकारी साखरकारखान्याचा डेप्युटी चीफ इजिनियर! माझी उत्सुकता अविनाशला कळल्याशिवाय राहिली नाही. मला त्याने संध्याकाळी घरी बोलावून सारी हकीकत सागितली. त्यावरूनच वसतरावाच्या बी ई. मागचं रहस्यही उलगडल!

## गोष्ट अविनाशची

आता लांबण न लावता सांगून टाका बरं सारी रहस्यकथा. अहो, आमची मुलही इजिनियर व्हायचीत!

झालं अस की, वसतराव एस. एस. सी. नतर चार–दोन वर्षांनी कसाबसा प्री–प्रोफेशनल परीक्षा पास झाला. त्या वेळी चाफाजीराव आमदार होते. त्यामुळं त्यांनी मोठ्या खटपटीन त्याला एका इजिनियरिंग कॉलेजात घातलं. पुढं एफ. ई.ला दोनदा मचकला! चाफाजीराव मोठ्या फिकिरीत पडले. त्यांनी एक्झॉमिनर्सकडे शब्द टाकले; पण वसंतराव असायचा साऱ्याच विषयात नापास! शेवटी चाफाजीरावांना सुचली एक युक्ती–किंवा कुणी तरी सुचविली म्हणा!

ती कोणती?

चाफाजीराव युनिव्हर्सिटीत गेले. तेथे वाघ नावाचा ऑफिस सुपरिंटेंडेंट एफ. ई.चा निकाल लावीत असे. त्याला भेटले आणि सारा प्रश्न समजावून सागितला. म्हणाले, 'आमचा मुलगा काही कुठे नोकरी करणार नाही, काही नाही. तेव्हा त्याला काही विसाव्याचं काम करायच नाही. त्याला फक्त पदवी हवीय. बास!' तेव्हा वाघोबा म्हणाले, 'एकच उपाय आहे. दुसऱ्या मुलाच्या नावाचे मार्क्स वसतरावाच्या नावावर

चढवितो. मात्र त्या मुलाकडनं तक्रार येता कामा नये !' मग चाफाजीराव आणि वाघ यांनी परीक्षेला बसलेल्या मुलांची यादी चाळली. 'अविनाश कुलकर्णी' हे नाव चाफाजीरावांना बरं वाटलं !

चाफाजीराव सांगलीला गेले. अविनाशला आणि त्याच्या आईला त्यानी आपल्या आर्जवी बोलण्यानं घोळात घेतलं. अविनाशला दरमहा तीनशे रुपये पगार, तो आणि वसंतराव दोघेही बी. ई. झाले की, अविनाशला तहहयात इंजिनियरिंगची नोकरी, *अशा अटी ठरल्या.* तेव्हापासून अविनाश आणि वसतराव यांची इंजिनियरिंग पदवीची सहकारयात्रा चालू झाली. एक वर्षाआड दोघेही पास–नापास होत गेले. वाघोबांनी कामगिरी चोख बजाविली !

काय सांगताय् ?

एक अक्षर खोटं नाही ! पूर्वी पेशव्यांची सुतक पाळण्यासाठी त्यांनी धडफळे नावाचं घराणं पदरी बाळगलं होतं, असं म्हणतात. तसं या श्रीमताचो नापाशी पाळण्यासाठी त्यांनी पदरी माणसं बाळगली तर त्यात आश्चर्य करण्याजोग काय आहे? उलट आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहात सामील होऊन अशा रीतीनं का होईना त्या चौकटीची बंधनं हे नवे सरंजामदार पाळताहेत, हे सुचिन्ह असं म्हणणारे कुलगुरुदेखील आपल्यात निघतील ! □

# नेपाळ

## लोकशाहीचा लढा

वा. दा. रानडे

नेपाळमध्ये डॉ. तुलसी गिरीच्या जागी श्री कीर्तीनिधी बिश्ता पतप्रधान झाले हा बदल घडून आला ! नेपाळच्या अंतर्गत राजकारणावर त्याचे काय परिणाम होतील आणि सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे नेपाळमध्ये अधिक लोकशाही येण्यास त्यामुळे कितपत मदत होईल या दृष्टिकोनातून या बदलाचा विचार केला पाहिजे.

डॉ. तुलसी गिरीच्या राजीनाम्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे लोकशाही, लोकाचे हक्क, नागरी स्वातंत्र्य याबाबत अधिक उदार धोरण स्वीकारण्यास त्यानी दिलेला ठाम नकार. भारतात आणीबाणीतील काळी राजवट जाऊन जनता पक्षाची नवी राजवट अधिकारावर आली. राजकीय पक्ष आणि वृत्तपत्रे यांच्यावरील निर्बंध उठले. शेजारच्या देशातील या घटनांचा परिणाम नेपाळवर होणे स्वाभाविक आहे नेपाळी जनता ही अधिक लोकशाही हक्कांची, अधिक प्रातिनिधिक सरकारची मागणी करू लागली आहे

नेपाळमध्ये सध्या पंचायत पद्धतीची राज्यव्यवस्था आहे. *ग्राम पचायत आणि नगर पचायत* हे या व्यवस्थेचे पायाभूत घटक. प्रत्यक्ष निवडणुका फक्त या दोन घटकांसाठी होतात. हे प्रतिनिधी जिल्हापंचायतीची निवड करतात जिल्हा पचायतीचे सभासद विभाग पंचायती निवडतात आणि विभाग पचायतीचे प्रतिनिधी राष्ट्रीय पंचायत निवडतात. याचा अर्थ जिल्हा पंचायतीपासून वरच्या सर्व निवडणुका अप्रत्यक्ष पद्धतीने होतात. राष्ट्रीय पंचायतीवर राजाने नेमलेलेही काही सभासद असतात. राजे महेंद्र यांनी डिसेंबर १९६२ मध्ये नवी घटना जारी करून पंचायतपद्धतीची व्यवस्था अंमलात आणली. ससदीय पद्धतीची लोकशाही नेपाळला योग्य नाही असे सांगून त्यानी या व्यवस्थेचे समर्थन केले.

पंचायतपद्धती अंमलात येण्यापूर्वी नेपाळमध्ये अल्पकाळ संसदीय लोकशाहीचा प्रयोग झाला होता. फेब्रुवारी १९५९ मध्ये झालेल्या निवडणुकात नेपाळी काँग्रेसने १०९ पैकी ७४ जागा जिंकल्या आणि श्री. बी. पी. कोईराला यांच्या नेतृत्वाखाली सरकार अधिकारावर आले; पण ते फार काळ कारभार करू शकले नाही. डिसेंबर १९६० मध्ये राजे महेंद्रानी सरकार बडतर्फ करून बी. पी. कोईराला यांना अटक केली आणि सर्व सत्ता आपल्या हाती घेतली. त्यानंतर त्यांनी संसदीय पद्धतीची घटना रद्द करून त्याऐवजी पचायतीपद्धतीची घटना जारी केली. राजकीय पक्षाना बंदी करण्यात आली. कोईराला यांच्या नेतृत्वाखाली नेपाळी काँग्रेसने राणाशाहीविरुद्ध यशस्वी लढा दिला आणि १९५१ मध्ये राणाशाही संपुष्टात आणली. राणा घराण्याने पंतप्रधानपद वंशपरंपरा बळकावून राजाला केवळ नामधारी करून टाकले होते. राणाशाही नष्ट झाली तर राजालाही ते हवेच होते; पण राणाशाहीविरोधी लढा हा लोकशाही प्रस्थापनेच्या लढयाचा पहिला टप्पा होता आणि लोकप्रतिनिधींच्या हाती सर्व सत्ता आली पाहिजे अशी कोईरालाची अपेक्षा होती; पण कोईरालांच्या हाती सत्ता राहिल्यास राणाशाहीच्या मागोमाग राजेशाही नष्ट होईल अशी भीती राजे महेंद्र यांना वाटत होती म्हणून त्यानी कोईराला *मंत्रिमंडळ बडतर्फ करून कोईरालाना अटक* केली. संसदीय लोकशाहीची घटना रद्द केली आणि आपल्या हाती निर्णायक सत्ता ज्यात राहील अशी पंचायतपद्धतीची घटना जारी केली. या घटनेनुसार मंत्री राष्ट्रीय पंचायतीचे सभासद असले तरी ते पंचायतीला जबाबदार नाहीत. त्याचे मंत्रिपद राजाच्या मर्जीवर अवलंबून आहे. नेपाळी काँग्रेस, प्रजापरिषद या पक्षांमध्ये गटबाजी व वैयक्तिक हेवेदावे होते. त्याचा फायदा घेऊन आणि राजकीय नेत्यांना एकमेकांविरुद्ध उठवून राजे महेंद्रानी राजकीय पक्ष कमकुवत केले त्यामुळे पंचायतपद्धतीची घटना देशावर लादणे त्यांना सोपे गेले. नेपाळी काँग्रेसमध्ये एम् पी. कोईराला व बी. पी. कोईराला या बंधूमध्ये संघर्ष होता, तर प्रजापरिषदेत भद्रकाली मिश्र आणि टंकाप्रसाद आचार्य यांच्यात सत्तास्पर्धा होती. मत्र्यामध्येही एकजूट नव्हती. डॉ. तुलसी गिरी कोईरालाच्या मंत्रिमंडळात उपमंत्री होते. ते रोज रात्री राजे महेंद्रांना नेपाळी काँग्रेस गोटात काय चालले आहे याच्या बातम्या देत. त्यांच्या या कामगिरीबद्दल राजे महेंद्रांनी त्यांना पुढे मंत्रिमंडळाचे चेअरमन म्हणजेच पंतप्रधान नेमले. राष्ट्रीय पंचायतीच्या बैठकीचे कामकाज गुप्तपणे चाले; प्रेक्षकाना त्या खुल्या नसत. पतप्रधानाची निवड राजा करी. पंचायतीस तो अधिकार नव्हता !

पंचायतपद्धती रद्द करून संसदीय लोकशाही पद्धतीची घटना अमलात आणावी अशी कोईरालाची मुख्य मागणी आहे. राजे महेंद्राच्या निधनानंतर राजे वीरेन्द्र अधिकारावर येऊन पाच वर्षे झाली. पंचायतपद्धतीच्या घटनेत काही बदल त्यांनी केले आहेत. नेपाळमध्ये राजकीय पक्षाना बंदी असली तरी

'बॅक टु व्हिलेज नॅशनल कॅम्पेन' (ग्रामानुवर्ती राष्ट्रीय मोहीम') या नावाने राजे वीरेन्द्र यानी एक सघटना स्थापन केली आहे. राजेसाहेबाच्या धोरणाचा पुरस्कार करणारा तो एक प्रकारचा राजकीय पक्षच असून घटनादुरुस्तीने या सघटनेला घटनेचीहि मान्यता दिली आहे. मत्रिमंडळ निवडणे आणि एखाद्या 'पचायत-सभासदास' परत बोलावणे हे अधिकार या सघटनेला देण्यात आले आहेत. लोकप्रतिनिधी आपले कर्तव्य बजावीत नाही, दिलेली आश्वासने त्याने पाळली नाहीत असे आढळून आले तर त्याला परत बोलाविण्याचा अधिकार मतदाराना असला पाहिजे अशी मागणी आपल्याकडे जयप्रकाश नारायण यानी अनेकवेळा केली आहे. नेपाळच्या घटनेत तशी तरतूद करण्यात आली आहे. आशियातील राष्ट्रात अशा प्रकारची तरतूद नेपाळनेच प्रथम केली आहे. मात्र परत बोलावण्याचा हा अधिकार मतदाराना दिलेला नसून ग्रामानुवर्ती राष्ट्रीय मोहीम' या राजे वीरेन्द्रप्रणीत संघटनेस देण्यात आला आहे. या अधिकाराचा दुरुपयोग केला जाण्याची शक्यता आहे. राजसत्ता टिकविण्यासाठी स्थापन झालेली सघटना आपल्याला नको असलेल्या पचायत-सभासदांना काढून टाकण्यासाठी या अधिकाराचा उपयोग करू शकेल. लोकप्रतिनिधीस परत बोलावण्याच्या हक्काचे हे विडबन आहे. राष्ट्रीय पचायतीचे कामकाज गुप्तपणे न चालता प्रेक्षकाना खुले असावे ही मागणी मान्य करण्यात आली आहे. मत्री आणि अधिकारी यांना अधिकाराचा गैरवापर करण्यास प्रतिबंध करण्यासाठी एक कमिशन नेमण्याची सुरुवात करण्यात आली आहे. मात्र हे कमिशन राजे वीरेन्द्र याच्या प्रत्यक्ष नियत्रणाखाली काम करणार आहे.

पंचायतपद्धतीच्या घटनेत हे बदल दोन वर्षांपूर्वी करण्यात आले त्यामुळे 'ग्रामानुवर्ती राष्ट्रीय मोहीम' या राजेप्रणीत संघटनेचे अधिकार राष्ट्रीय पंचायतीपेक्षा वाढले अशी टीका करण्यात आली. तिला उत्तर देताना सरकारतर्फे असा खुलासा करण्यात आला की या बदलामुळे राष्ट्रीय पचायतीचे अधिकार मर्यादित करण्यात आलेले नाहीत. मत्रिमडळ आणि 'ग्रामानुवर्ती राष्ट्रीय मोहीम' या सघटनेची मध्यवर्ती समिती व्यक्तिशः आणि सामुदायिकरीत्या राजालाच जबाबदार आहेत. राजे वीरेन्द्र याचे आदेश आणि मार्गदर्शनानुसारच राष्ट्रीय धोरण व त्याच्या अमलबजावणीबाबतचे निर्णय त्यांना घ्यावे लागतील, याचा अर्थ अतिम निर्णायक सत्ता राजे वीरेन्द्र यांनी स्वत:कडेच ठेवली आहे.

या राजसत्तेच्या जागी खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित करण्याचा लढा कोईराला लढवीत आहेत. अमेरिकेकडून परतल्यावर ते हा लढा पुढे चालविणार आहेत. राजे वीरेन्द्र यानी बदलत्या काळाची पावले ओळखून केवळ घटनात्मक प्रमुख म्हणून रहावे व लोकप्रतिनिधींच्या हाती सर्व सत्ता सोपवावी. नेपाळमध्ये शांततेच्या मार्गाने लोकशाही आणण्याचा हाच पर्याय आहे ☐


**Some new titles received**

1. **I Hold The Four Aces** : James Hadley Chase — Rs. 52/-
2. **The Wages of Fear** : (Bestseller-A gripping novel about nitro-glycerine that explodes at the slightest jolt)– Georges Amaud — Rs. 10/-
3. **Twinkle, Twinkle, Little Spy** : (spy story)–Len Deighton — Rs. 15/-
4. **Mystery of Nagarwala Case** : (The Rs. 60,00,000 scandal that shook India !)–K. L. Gauda — Rs, 5/-
5. **Father Pig** : (Bestseller–novel-a Son turns against his own father)–Burt Hirshfeld — Rs, 12/-
6. **Tears of Autumn** : (Bestseller-Novel–Was there a connection between murder of a leader in the far east and that of President Kennedy ? )–Charles McCarry — Rs. 18/-
7. **Lay It On The Line** : (Bestseller–Humourous book)– Trudy Baker & Rachel Jones — Rs. 17/-

- आमच्या दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून इतर लायब्ऱ्यांइतक्याच वर्गणीत उत्कृष्ट पुस्तके वाचा.
- Watching TV will make you a conformist but book-reading will make you individualist !

**दि फिनिक्स लायब्ररी**
७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०

आर्थिक टिपणे :

# रोलींग प्लॅन

नारायण वैद्य
सभासद, महानगरपालिका

१ एप्रिल १९७८ पासून रोलीग प्लॅन नावाची नवी नियोजनपद्धत सुरू होणार असल्याचे पतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई यांनी सागितले. त्यावर सर्वत्र उलट-सुलट चर्चा चालू आहे. याचा अर्थ सध्या चालू असलेली पाचवी पचवार्षिक योजना, या योजनेचे चौथे वर्ष ३१ मार्च १९७८ ला सपताच सपुष्टात आल्याचे जाहीर करण्यात येईल व नवीन (सहावी) पंचवार्षिक योजना १ एप्रिल १९७८ पासून चालू होईल; परंतु ही (सहावी) पचवार्षिक योजना 'सहावी' आणि 'पचवार्षिक' अशा स्वरूपात राहाणार नाही असे रोलीग प्लॅन या नवीन कल्पनेवरून वाटते या योजनेचे स्वरूप असे राहाणार आहे : प्रथम पाच वर्षासाठी एक योजनाबद्ध विकास कार्यक्रम आखला जाईल व त्याची अंमलबजावणी १ एप्रिल १९७८ पासून सुरू होईल. तो कार्यक्रम १ एप्रिल १९७८ ते ३१ मार्च १९८३ असा पाच वर्षांचा असेल; परंतु ३१ मार्च १९७९ रोजी या योजनेचे एक वर्ष पूर्ण होईल. तेव्हा १ एप्रिल १९७९ पासून सुरू होणारा विकास-कार्यक्रम हा पुन्हा ५ वर्षांचा – म्हणजे १ एप्रिल १९७९ ते ३१ मार्च १९८४ असेल.

याबाबत देशातील विचारवंत, नियोजन-तज्ज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, उद्योगपती, वेगवेगळी मते व्यक्त करीत असतानाच पंतप्रधानांनी दि. १२ सप्टेंबर रोजी दिल्लीत जनता पार्टीच्या संसदीय गटाच्या अभ्यासवर्गात भाषण करताना सागितले, 'आम्ही (रोलीग प्लॅनची भूमिका स्वीकारून) नियोजनाला रामराम ठोकीत आहोत, ही टीका पूर्णपणे निराधार आहे. यशस्वी व व्यवहार्य नियोजनाच्या दृष्टीने आम्ही एक पाऊल पुढे टाकीत आहोत. पंचवार्षिक योजना एकदा तयार झाली की पाच वर्षेपर्यंत नियोजनाचा विचार करण्याचेच आम्ही सोडून देतो. पुढची पचवार्षिक योजना आखण्याचे काम सुरू होईपर्यंत दरम्यानच्या काळात नियोजनमंडळ नावापुरतेच राहाते. आता नवे सरकार आले आहे नियोजना-बाबत विचार करण्याची ही पद्धत बदलून नवे सरकार नवी पद्धत चालू करीत आहे. श्री. जवाहरलाल नेहरू यानी पचवार्षिक योजनेची पद्धत चालू केली हे चागले झाले. ती परिणामकारकरित्या राबवावयाची असेल तर नियोजनात दूरदर्शीपणा आणला पाहिजे; तो रोलिग प्लॅनच्या कल्पनेमुळे येईल' पंतप्रधान पुढे म्हणाले, 'विरोधी पक्षाने (कांग्रेसने) याबाबत नापसती दर्शविली आहे; परंतु त्यानी रोलीग प्लॅन व्यवहार्य व दूरदर्शीपणाचा का होऊ शकणार नाही हे मात्र कोठेही दाखवून दिले नाही. श्री. जवाहरलाल नेहरूनी या नियोजनकल्पनेचा पाया या देशात घातला तो आम्ही (जनता सरकार) उद्‌ध्वस्त करीत आहोत हा त्याचा आरोप चुकीचा आहे.'

सध्या चालू असलेली पाचवी पंचवार्षिक योजना दिशाहीन बनली आहे यात शका नाही. गेल्या तीन–चार वर्षांत शेतीउत्पन्नाची वाढ अपेक्षेप्रमाणे देशभर झाली नाही. चलन-वाढ कमी होऊ शकली नाही. अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन व सुमारे २ कोटी टनांचा शिलकी धान्यसाठा राहूनसुद्धा महागाई कमी झाली नाही. आणीबाणीच्या कालखंडात सुमारे दीड वर्ष पूर्णपणे सत्ता स्वतःच्या हाती असताना, कोणताही विरोध नसताना, शिस्तीचा बडगा व मिसाच्या धमक्या जनतेच्या डोक्यावर असताना पाचव्या योजनेची फलश्रुती जी काही दिसत आहे त्यावरून सदर योजना गुडाळून ठेवली तर कोणालाही वाईट वाटणार नाही. उलट जनतेची मागणी अशी आहे की, '१९७८–१९७९ ही वार्षिक योजनासुद्धा पुनर्घटित करा व कालवे–पाटबंधाऱ्यांचा पाणीपुरवठा, विद्युत उत्पादन, रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या विशेष योजना, लघु उद्योग, ग्रामीण विकास, अविकसित क्षेत्राचा विकास यांना आगामी वर्षाच्या योजनेत प्राधान्य द्या.' अर्थात या मागण्याप्रमाणे आगामी वर्षात (म्हणजे चालू पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरच्या वर्षात) कार्यक्रमात बदल करा-वयाचा म्हटले म्हणजे रकमांच्या उपलब्धतेचा व तरतुदीचा नव्याने विचार करणे आलेच.

पाचवी पंचवार्षिक योजना तयार करताना सुरुवातीला वार्षिक वाढ (growth) ५·५ टक्के धरली होती; परंतु सदर योजनेच्या तिसऱ्या वर्षात जेव्हा (पाचवी पंचवार्षिक) योजनेचा पक्का व अतिम आराखडा जाहीर झाला तेव्हा ही वाढ ४·३७ टक्के (पक्की म्हणून) गृहीत धरली होती त्याबाबतीत सुद्धा फारशी आशादायक परिस्थिती केव्हाच नव्हती.

पाचव्या पचवार्षिक योजनेच्या सुरु-वातीच्या काळामध्ये अन्नधान्याचे उत्पादन प्रतिकूल हवामानामुळे घटले व पेट्रोलच्या आयातीच्या किमती भरमसाट वाढल्या त्यामुळे रकमेच्या उपलब्धतेचा (resources) प्रश्न अवघड बनला. शिवाय एखादी पंच-वार्षिक योजना आखल्यानतर त्या अंतर्गत पुन्हा दरवर्षी वार्षिक नियोजनाचा आराखडा तयार करून कार्यवाही करण्याचा प्रकार चालू असतोच, तो गेली चार वर्षे होताच. अशा परिस्थितीत दरवर्षाचे नियोजन स्वतत्र-रीत्या (दूरदर्शीपणा ठेवून–Perspective) करणे ही रोलीग प्लॅनमधील कल्पना नवीन नाही. तरीसुद्धा 'अॅप्रोच पेपर' प्रसिद्ध होईपर्यंत रोलीग प्लॅन म्हणजे सरकारला व नियोजनमडळाला 'नेमके' काय म्हणा-वयाचे आहे हे पूर्णपणे कळणे सध्याच्या वृत्त-पत्रीय बातम्यावरून सामान्य माणसाला कळणे शक्य होत नाही.. □

# चिली आणि अर्जेन्टिना

चन्द्रशेखर पुरन्दरे

अमेरिका आणि रशिया या दोन बड्या शक्ती व त्याची प्रभावक्षेत्रे वगळल्यास, उरलेल्या जगाला तिसरे जग म्हणण्याचा प्रघात आहे. नवस्वतंत्र राष्ट्रे, अर्धविकसित व विकसनशील राष्ट्रे प्रामुख्याने यात येतात. लोकशाही मार्ग आपल्या राष्ट्राला सोईचा अशी बहुधा या देशातील बुद्धिवंत कल्पना करून घेतात; परतु स्थानिक कारणानी व प्रामुख्याने जनतेच्या अजागृततेमुळे, दारिद्र्याने व अशिक्षिततेमुळे भाकरीही नाही आणि स्वातन्त्र्यही नाही अशा अत्यंत दुर्दैवी भोवऱ्यात ही जनता सापडते.

चिली आणि अर्जेन्टिना ही दक्षिण अमेरिका किंवा आतरराष्ट्रीय परिभाषेत लॅटिन अमेरिका या विभागातील राष्ट्रे अशाच सकटात आहेत.

या ११ सप्टेंबरला चिलीमध्ये राजकीय उलथापालथ होऊन लष्कराने सत्ता हातात घेतल्याला चार वर्षे पूर्ण झाली. त्या वेळचे अध्यक्ष अॅलेन्दे याला पदच्युत करून जनरल पिनोशेत सर्वाधिकारी बनला. त्या वेळी त्याने लष्करी हुकुमशहा जसे करतात तसेच ताबडतोब लोकशाही मार्गावर जाण्याचे आश्वासन दिले. या राजवटीमध्ये आता तर केवळ अंदाधुदी चालू आहे. नागरी स्वातंत्र्ये केव्हाच हरवली आहेत. वृत्तपत्रेही सरकारच्याच धोरणाचा नाइलाजाने उदो उदो करतात. विनाचौकशी लोक अटकेत टाकले गेलेले आहेत, हजारो बेपत्ता आहेत तात्पर्य, अराजक माजलेले आहे आणि त्यात लष्करशाहीचे फावते आहे.

मार्क्सिस्ट प्रवेशाला आळा घालणे हा लॅटिन अमेरिकेतील या दोन देशाच्या लष्करी सत्ताधीशानी प्रमुख कार्यक्रम मानलेला होता आणि आहे. जेव्हा पिनोशेत सत्तेवर आला, तेव्हा ख्रिश्चन डेमोक्रॅटस् हा पक्ष या मार्क्सिस्ट दहशतवाद्याच्या बदोबस्तानतर सत्ता आपल्याकडे येईल अशी अपेक्षा करीत होता; परतु पिनोशेतला सत्ता सोडविली नाही.

अमेरिकेचा अध्यक्ष कार्टर याने वारंवार मानवी स्वातंत्र्याचा उद्घोष केल्याने मात्र या देशावरही परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. आपल्याकडच्या मिसासारखी व इंदिरा गांधीच्या RAW सारखी, चिलीमध्ये DINA ही डिरेक्टोरेट ऑफ इण्टेलिजन्स सर्विसेस अशी सस्था आहे. या सस्थेने गेल्या चार वर्षांत सपूर्ण स्वातंत्र्याची गळचेपी आणि दहशतीचा अंमल बसविण्याचे कार्य केले. ही DINA आता बरखास्त करण्याची घोषणा पिनोशेतने नुकतीच केली जुलैमध्ये त्याने लोकशाहीच अतिम ध्येय असल्याचा पुनरुच्चार केला.

जे चिलीमध्ये चालू आहे तेच अर्जेन्टिनामध्ये चालू आहे. इथे जनरल विदेलाची अनिर्बंध सत्ता आहे. अर्जेन्टिना हा अत्यत समृद्धीची potentials असणारा देश. तरीही तेथे आर्थिक गोंधळ माजलेला आहे. १९७३ मध्ये पेरॉ हा अर्जेन्टिनाचा अध्यक्ष म्हणून परत निवडून आला; पण पुढच्याच वर्षी त्याचा मृत्यू झाला. त्याच्यानतर त्याची बायको सेमोरा पेरॉ सत्तेवर आली. ती अध्यक्ष या नात्याने फारसा प्रभावी कारभार न करू शकल्याने आर्थिक आघाडी ढासळली आणि मार्च १९७६ मध्ये जनरल विदेलाच्या अमलाखाली देश गेला. तोपर्यंत लष्कर राजकीय बाबतीत अत्यत उदासीनतेने वागलेले होते. त्यामुळे अर्जेन्टिनाशी चागले सबध असणाऱ्या युरोपीय देशाना हा धक्का होता. तरीही सत्तेवर आल्यावर लष्कराने चिलीप्रमाणेच मार्क्सिस्टाना ठेचण्याचे ध्येय बोलून दाखविल्याने पीपल्स रिव्होल्यूशनरी आर्मी (PRP) आणि मोनो टोनरोस या दोन मार्क्सिस्ट दहशतवादी संघटनांनी पीडलेल्या जनतेला दिलासा वाटला, पण प्रत्यक्षात घडले निराळेच. अतिडाव्याना नेस्तनाबूत करण्यासाठी आलेली लष्करी राजवट अतिउजवीकडे झुकली ! १९७० पासून या दोन सघटना त्रास देत होत्या; पण आता लष्करशाहीचा नवा त्रास सुरू झाला !

अर्जेन्टिनातील वृत्तपत्रे पहिल्यापासून आपले स्वातंत्र्य राखून होती आणि वैशिष्ट्यपूर्ण म्हणून दक्षिण अमेरिकेत ओळखली जात; पण त्याची आता पूर्णपणे मुस्कटदाबी करण्यात आली आहे. ट्रेड युनियन्सच्या कार्यावर प्रचड दडपणे येऊन त्या नामशेष झाल्या आहेत. पोलिसानी कुठेही घुसावे आणि कोणालाही धरून देशद्रोहाच्या नावाखाली न्यावे हा प्रकार चालू आहे. चिलीप्रमाणेच हजारो बेपत्ता, हजारो अटकेत आहेत !

त्यातसुद्धा वैशिष्ट्य म्हणजे अर्जेन्टिनामध्ये ज्यूची सख्या बरीच आहे नेमके त्याना टिपून मारण्यात येत आहे, अशी त्याच्या सघटनेने नुकतीच तक्रार केलेली आहे. असाच एकजण जन्माने ज्यू असल्याच्या घोर अपराधाबद्दल पळविला गेला होता त्याने सांगितलेल्या हकिकतीवरून त्याचे हालहाल ज्या खोलीत करण्यात आले, ती स्वस्तिकांनी, (नाझींचे प्रतीक) हिटलरच्या व फ्रँकोच्या चित्रानी सजवलेली होती. यावरून अर्जेन्टिनातील लष्करशाहीचा रोख लक्षात यावा.

दुसरी एक घटना ११ सप्टेंबरला उजेडात आली योगायोग असा की ११ सप्टेंबरलाच जनरल विदेला अमेरिकेची कार्टर–भेट आटोपून मायदेशी परतला होता. तिथे व स्वतच्या देशात आल्यावर त्याने या दहशतवादी सघटना आणि उजवे प्रतिगामी याना पूर्ण नष्ट करण्याची प्रतिज्ञा केलेली होती.

या प्रतिज्ञेला टोला म्हणून की काय प्रोफेसर आल्फ्रेड ब्राव्हो याला शाळेतून पळवल्याची बातमी प्रस्तुत झाली. आल्फ्रेड ब्राव्हो हा Argentine Permanent Assembly For Human Rights या सघटनेचा उपाध्यक्ष आहे आणि शिक्षक सघटनेचा अध्यक्ष आहे. त्याच्या शाळेत जे पोलिस आले त्यानी आपण मध्यवर्ती गुप्तचर विभागाकडूनच आलो असे सागून ब्राव्होला पळवले. परतु मध्यवर्ती गुप्तचर विभागाकडे चौकशी केली असता तो विभाग, आपल्याला याबाबतीत

काहीच माहिती नाही असे सांगून, मोकळा लागला त्यामुळे प्राव्होचे गूढ जसजसे वाढत आहे तसा तसा सामान्य माणसाचा धीर व आत्मविश्वासही खचत आहे.

या दोन्ही राजवटीबद्दल हे कबूल केले पाहिजे की त्यानी गगनाला गवसणी घालायला जाणाऱ्या किंमती ताब्यात आणल्या, बेकारीचे प्रमाण कमी केले, चलन फुगवटा कमी केला पण त्यासाठी त्यांना जी स्वातंत्र्याची किंमत मोजावी लागत आहे ती परवडण्यासारखी नाही. कारण ' भाकरीही पुरेशा प्रमाणात मिळालेली नाही.

आज जगाच्या हातात या दोन लष्करशहाकडे भयचकित होऊन पहात हळहळण्या खेरीज काहीच राहिलेले नाही. *

## माओनंतरचा चीनः माओचा स्मृतिदिन व नव्या नेत्याचा उदय

या नऊ सप्टेंबरला माओ त्से तुंगच्या मृत्यूला एक वर्ष झाले या अवधीत चीन विशुद्ध माओवादापासून दूर सरकलेला आहे ' Red Flag ' हे चिनी कम्युनिस्ट पार्टीचे मुखपत्र आहे यामध्ये परवाच माओवादाचे परीक्षण करण्यात आले होते त्यात माओची थोरवी त्याने मार्क्स–लेनिन याच्या तत्त्वज्ञानात लवचिकपणा राखला या गोष्टीत असल्याचे नमूद केले आहे. ही गोष्ट महत्त्वाची अशासाठी की माओचे स्वत चे तत्त्वज्ञानही लवचिक आहे आणि म्हणूनच ते थोर आहे असा सूर यातून काढून सध्या जी त्रिमूर्ती सत्तेवर आहे, (चेअरमन हुआ कुओ फेंग, तेंग सिआओ पेंग आणि मार्शल येह) तिने माओवादाचा योग्य अर्थ लावल्याचा निष्कर्ष काढला आहे. दुसरे वैशिष्ट्य असे की, मार्क्सवादाचे पायाभूत तत्त्वज्ञान-वैयक्तिक बुद्धिक्षमतेला मर्यादा असतात पण संपूर्ण समाजाची वा वर्गाची बुद्धिक्षमता अनंत असते–याचा पुनरुच्चार करण्यात आलेला आहे. तसेच, चीनच्या सांस्कृतिक क्रान्तीच्या फळाची चर्चा अशा प्रकारच्या लेखामध्ये हटकून करण्यात येत असे; ही फळे म्हणजे विद्यार्थी ग्रामीण भागात गेले किंवा वैद्यकीय व्यवस्थेचे पुनरुज्जीवन इत्यादी ही चर्चाही या लेखात टाळण्यात आलेली आहे. त्याऐवजी स्वच्छ दृष्टीने व पूर्ण विचाराती, परिस्थिती पाहून निर्णय घ्यावा असे प्रतिपादन केलेले आहे चीनची धोरणात्मक बदलाची दिशा यातून स्पष्ट होते.

वरच्या धोरणाची निदर्शक दुसरी गोष्ट म्हणजे, युगोस्लाव्हियाचा अध्यक्ष टिटो याची भेट. त्याचे प्रचंड स्वागत करण्यात आले. इतकेच नव्हे तर त्याला या १० सप्टेंबरला उद्घाटन करण्यात येणारे माओचे शव जेथे ठेवले आहे. ते प्रचंड म्युझियमही दाखवण्यात आले सायरस व्हान्सच्या भेटीनतर मात्र अमेरिका–चीन सबंध " जैसेथे ' न रहाता सूक्ष्म प्रमाणात बिघडलेच असावेत असा संशय निरीक्षकाला. यावा. अमेरिकेचा हा परराष्ट्र सेक्रेटरी या बाबतीत अपयशी दिसतो. मध्यपूर्वेतील त्याची सफरही अशीच निराशाजनक ठरली.

सायरस व्हान्स मायदेशी परतल्यावर एका जपानी खासदारांच्या शिष्टमंडळाची तेंग सिआओ पेंगने जी भेट घेतली तिच्यात अमेरिकेच्या धोरणावर त्याने खरमरीत टीका केली, ही घटना महत्त्वाची आहे. अमेरिकेत प्रेसिडेंट फोर्ड सत्तेवर असताना, निवडणुकीच्या रिंगणात उतरला असताना त्याने चीनला जी आश्वासने दिली, विशेषत तैवानच्या बाबतीत, तिच्याकडे अमेरिका आता लक्ष देत नाही व वचनभग करीत आहे असा तेंगचा आरोप आहे तैवानशी सबध कमी करणे व सरक्षण करार सपवणे ही वचने फोर्डने दिली होती असा चीनचा दावा आहे आज अमेरिका चीनमध्ये प्रथम दर्जाचा व तैवानमध्ये दुय्यम दर्जाचा राजदूत नेमण्यास तयार आहे सध्या त्याच्या बरोबर उलट परिस्थिती आहे.

याचवेळी, १० सप्टेंबरला जेम्स शेन हा तैवानचा अमेरिकेतील राजदूत कार्टरला व व्हान्सला भेटला ही उल्लेखनीय बाब आहे

माओनतरच्या एका वर्षात, विशेषत. तेंग सिआओ पेंगच्या द्वितीय पुनरागमनानतर उपरिनिर्दिष्ट त्रिमूर्तीच्या नेतृत्वाच्या कल्पनेचा उदय व उदोउदो करण्यात आला. सध्या मात्र या त्रिमूर्तीमध्ये आणखी एका इसमाची भर पडेल अशी चिन्हे आहेत. चीनचे नेतृत्व एकूण चौघे करणार असा एकूण रंग दिसतो. ही चौथी व्यक्ती म्हणजे माओच्या शरीर-सरक्षकदलाचा प्रमुख वाग-तुग–सिंग. हा वाग-तुग–सिंग, जनरल ऑफिस ऑफ कम्युनिस्ट पार्टी सेंट्रल कमिटीचाही अध्यक्ष आहे. ही कमिटी चीनच्या राजकारणात कायम महत्त्वपूर्ण भूमिका बजावीत आलेली आहे. नुकत्याच संपलेल्या चिनी कम्युनिस्ट पार्टीच्या अकराव्या काँग्रेसमध्ये या वाग-तुग–सिंगचा चीनचा चारांपैकी एक उपाध्यक्ष म्हणून उल्लेख करण्यात आला. त्याचप्रमाणे ९ सप्टेंबरच्या ' पीपल्स डेली ' च्या अग्रलेखात या कमिटीचा गौरवपूर्ण निर्देश करण्यात आलेला आहे. ९ सप्टेंबरच्या महत्त्वाच्या अकात– कारण हा माओचा मृत्युदिन–असा उल्लेख होणे हे वाग-तुग–सिंगच्या वेगाने होणाऱ्या प्रगतीचे द्योतक आहे.

वाग-तुंग–सिंग ज्या शरीर-रक्षकदलाचा प्रमुख आहे ते युनिट नबर ८३४१ या नावाने ओळखले जाते. यांची व चीनची आता कुप्रसिद्ध करण्यात आलेली ' गँग ऑफ फोर ' यांची, प्राचीन खुन्नस होती. माओची बायको चिअँग चिंग हिने या दलामध्ये वाग-तुग–सिंगच्या हाताखाली खास ' आपले ' असे काही लोक घुसविले होते.

या शरीर-सरक्षक दलाचे महत्त्व आपल्या लक्षात सहजी येत नाही; पण यातील प्रत्येक माणूस हा चीनच्या विभिन्न प्रातातून निवडलेला असे. त्याने आपल्या प्रातातील सर्व बारीक-सारीक घडामोडी चेअरमन माओला कळवायच्या किंवा एखाद्या देशातंर्गत गुप्तहेर सघटनेचे काम करायचे अशी त्याची जबाबदारी असे वाग-तुंग-सिंगचा उदय हा चीनच्या अंतर्गत राजकारणात गुप्त-पोलिसाचे स्थान काय राहील याचाही निदर्शक आहे. या दलातील प्रत्येकाला खास शिक्षण देण्यात येऊन मार्क्स-लेनिन याच्या तत्त्वज्ञानात पूर्ण पारंगत करण्यात येते. या दलाचे व ' गँग ऑफ फोरचे ' सबंध इतके बिघडल होते की, माओच्या मृत्यूनंतर ' गँग ऑफ फोर ' विरुद्ध जी लाट उसळली व त्यांचा जो बंदोबस्त करण्यात आला, तो या युनिट नंबर ८३४१ नेच केला. त्यामुळे त्याची पोचपावती म्हणून हे स्थान वागला मिळत आहे.

' चिनी कम्युनिस्टपक्षाची गीता ':– माओचे लाल पुस्तक त्याचा प्रसार करण्यात वर सागितलेल्या कमिटीचा मोठा भाग होता. हे पुस्तक वस्तुतः लिन पिआओने संपादित

केले होते; पण चिनी राजकारणाच्या पटावरून लिनपिआओंचे नाव पुसण्यात आले. विशेषत. त्या वेळी या जनरल ऑफिस ऑफ द कम्युनिस्ट पार्टी सेन्ट्रल कमिटीने देशभक्तीची कमाल केली असा 'पीपल्स डेली 'चा उल्लेख आहे.

तात्पर्य, , चीनच्या सत्तेवर माओ से तुग-नंतर कोण ? हा प्रश्न अधिकाधिक विकेंद्रीकरणाने सोडविण्याचे प्रयत्न चालू आहेत असे दिसते. कारण चीनचे प्रमुख सात भाग पाडून ती प्रत्येक भाग स्वयंपूर्ण करण्याची आर्थिक योजना आखण्यात आलेली आहे.

माओचा स्मृतिदिन चीनमध्ये पेकिंगच्या स्वर्गीय शांततेच्या चौकात लक्षावधी लोकांनी फुले वाहून साजरा केला. ९ सप्टेंबरला रात्री १२ वाजून १० मिनिटांनी (एक वर्षापूर्वी बरोबर याच वेळी माओची अखेर झाली होती.) १००० युवकांनी या वेळी अधिकृतरीत्या श्रद्धांजली वाहिली. म्हणजे सरकारतर्फे हे पथक तयार करण्यात आले होते. त्यांनी 'The East Is Red' हे सुप्रसिद्ध गाणे गाऊन काही काळ स्तब्धतेने उभे राहून श्रद्धांजली अर्पित केली.

याच सुमारास माओला जाऊन वर्ष झाल्याने त्याच्याबद्दल दंतकथा प्रसृत करण्यात येत आहेत. चि अँग चिंगला (माओची बायको व 'गँग ऑफ फोर'ची प्रमुख) कुंड्यांमधील फुलांची फार आवड होती. सध्या ही 'गँग ऑफ फोर' देशद्रोही समजली जाते त्यामुळे एक वृत्तपत्र, माओने साधेपणाचा आदर्श म्हणून ज्या गोष्टी त्याच्या खोलीतून हलविल्या व ज्या त्याला आवडतच नाहीत म्हणून त्याने तिरस्काराने नाकारल्या त्यात फुलांच्या कुंड्याही होत्या, अशी कथा सांगत आहे तर दुसऱ्याने, एके काळी माओने मांस, अंडी व फळे खाणे याचा साध्या राहणीच्या तत्त्वानुसार वर्ज्य केले होते असा दाखला दिला आहे. आणखी एकाने माओ ६० व्या वर्षानंतर इंग्रजी शिकला वगैरे माहितीही मोठ्या श्रद्धेने दिली आहे.

सध्या मात्र स्फटिकाच्या शवपेटीत ठेवलेल्या माओला देवत्व देऊन माओवाद सोडून देणे हाच माओवाद, असे दाखविण्याचा अट्टाहास चालू आहे. □

# टेक इट लाइटली

संजीव मंगरूळकर

## □ सामान्यांची लोकशाही

सध्या मात्र भारतात लोकशाही परंपराची आणि मूल्यांची पुन्हा एकदा प्रतिष्ठापना होऊ लागली आहे असं मी म्हणतो, याला अर्थातच तशी सबळ कारणं आहेतच. सध्या भारतात भाषण-स्वातंत्र्य, विचार-स्वातंत्र्य आहे आणि बऱ्याच थोर-थोर मंडळींच्या मते हीच तर लोकशाहीची प्रधान मूल्ये आहेत. ही प्रधान मूल्यांची कल्पना तशी लोकशाहीच्या व्याख्येनुसार अगदी बरोबर असली, तरी आपल्या भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने मात्र त्यात काही उणीवा जाणवतात. एक तर तुमच्या-आमच्यासारख्या सरळमार्गी माणसाला विचार-स्वातंत्र्य, भाषण-स्वातंत्र्य असल्या स्वर्गीय कल्पनांची तशी निकड कधीच भासली नव्हती कारण एक तर स्वतंत्रच काय पण कुठलाच विचार धडपणे करणं आपल्याला झेपलं नाही आणि दुसरं म्हणजे फालतू विचार वगैरे करण्यापेक्षा इतर महत्त्वाची बरीच कामं आपल्याला होती. तेव्हा विचार काय किंवा भाषण काय ही दोन्ही मोजक्या आणि थोर मंडळींची पुंजी होती. ती हरवल्याचं तितकसं दुःख तुम्हा-आम्हाला झालं नाही हे साहजिकच आहे; पण यातही एक गंमत आहे. ही पुंजी हरवल्याचं पुरेसं दुःख त्या 'पुंजीपती' थोर मंडळींनाही झालं नाही. म्हणजे किमान त्यांनी तसं बाहेर फारसं दिसू दिलं नाही. त्यालाही बरीच कारणं आहेत. या थोर मंडळींमधले बरेच जण फावल्या वेळातले म्हणजे पार्ट-टाइम विचारवंत होते. त्यामुळे तळमळीनं मांडावा असा विचारच मुळी बहुतेकांजवळ नव्हता आणि ज्या थोड्यांजवळ तो होता त्यांना तो लोकांसमोर मांडावा अशी तळमळच मुळी नव्हती. साहजिकच बहुतेकांनी हा पार्ट-टाईम विचारवंताचा जॉब सोडून इतर फुल-टाइम काम सुरू केली. तेव्हा तात्पर्य इतकेच, की विचार-स्वातंत्र्य गेलं म्हणून हताश व्हावं, अगदी धाय मोकलून रडावं असा प्रसंग काही तुमच्या-आमच्यावर आला नाही; पण तरीही 'आणीबाणी आली आणि लोकशाही गेली' अशी काहीशी पुसट हळहळ मात्र आपल्याला मधूनमधून वाटत होती. हे मात्र थोडसं विचित्र आहे विचार-स्वातंत्र्याशी किंवा भाषण-स्वातंत्र्याशी आपलं फारसं सोयर-सुतक नाही, पण आपल्याला लोकशाहीविषयी मात्र अनावर प्रेम आहे. या प्रेमाचं रहस्य तसं उलगडायला अगदी सोपं आहे आणि त्यातच 'भारतीय लोकशाही' ची खासियत लपलेली आहे.

आणीबाणीनंतर 'दुसरं स्वातंत्र्य' या भारताला मिळालं. या स्वातंत्र्यानंतर आपल्या आसपास काय फरक पडला? देशाच्या राजकीय परिस्थितीत काय परिवर्तन झाली? या प्रश्नाची उत्तरे तशी खूपच विस्तृत आणि चिंतनीय आहेत; पण आपल्या साध्या, सरळ नजरेला काही ढोबळ फरक जाणवतातच.

आणीबाणी उठल्यानंतर सर्वत्र विशेष आत्मविश्वासाचे वातावरण पसरले. जनतेला आपल्या सामर्थ्याची जाणीव झाली आणि मग संप, सत्याग्रह, निषेध, आंदोलने, मोर्चे असल्या प्रकारांना सुरुवात झाली. भरघोस आणि सार्वत्रिक संप सुरू झाले. पुढारी आवाज चढवून बोलू लागले. आव्हाने, प्रति-आव्हाने देऊ लागले. सरकारला खेचण्याची, पाडण्याची भाषा बोलू लागले आणि मग खरा 'मजा' आला. आम्हाला जाणवले, आता खरी लोकशाही सुरू झाली. कारण आमच्या मते संप, मोर्चे, आंदोलने हेच लोकशाहीचे खरे सौंदर्य आहे. लोकशाहीशी आमचा संपर्क फक्त संपातून येतो. त्यामुळे आता लोकशाही आली आणि सर्व मंडळींनी संप पुकारून तिला आपला पाठिंबा जाहीर केला. अगदी आपल्या पुण्यनगरीनेसुद्धा लोकशाहीच्या स्थापनेला आपला जोरदार पाठिंबा दाखवायला सुरुवात केली. प्रथम आमचा औद्योगिक परिसर जागा झाला [illegible] आपल्यावरील अन्यायाचा चो[illegible] एक दिवस रस्त्यावरील सर्व वाहने जाळून,

इमारतीच्या काचा फोडून त्यांनी लोकशाहीचे स्वागत केले. मग भाववाढविरोधी मोर्चे निघाले. निषेध म्हणून त्यानी पनप्रधानांच्या गाडीवर चपला फेकल्या. वृत्तपत्रकामगारानी आपला सप करून घेतला आणि मग युवकवर्गानेही हिरीरीने लोकशाहीचा धुमघडाका सुरू केला. फीवाढविरुद्ध त्यानी आदोलन केले, मोर्चे काढले, कुलगुरूंना 'घेरावो' घातला मग इजिनिअर्स चवताळले. त्यांनी बेमुदत सप पुकारला. अगदी फाटाफूट होईपर्यंत सप चालवून दाखवला. मग 'मेडिकोज' आपल्या अन्यायाविरुद्ध दाद मागू लागले. गेल्या चार वर्षांतील त्याच्यावरच्या अन्यायाची दाद ते त्वरित मागू लागले. त्यांनीही पहिले चार दिवस 'बेमुदत सप' करून आपली लोकशाहीविषयीची आस्था प्रगट केली. एक आदर्श मूकमोर्चा काढून पुणेकर युवकांसमोर त्यानी आदर्श ठेवला. दरम्यान पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी आपल्या रास्त मागण्यासाठीचा लढा प्राणपणाने चालवलाच होता. प्राध्यापकांनीही एक दिवस सामुदायिक रजा घेतली. 'खडू–फळा–बंद' योजनेची धमकी दिली. बँक–कर्मचाऱ्यानी हळूहळू आपला विसवादी सूर आळवण्यास सुरुवात केली. सरकारी कर्मचाऱ्यांनी सालावादप्रमाणे पगारवाढीची मागणी सुरू केली. त्यासाठी संपाची धमकी दिली.

अशा रीतीने अगदी चौका-चौकातून, रस्त्यारस्त्यातून आम्हाला लोकशाही फिरताना दिसून आली !

'पृथ्वीवरील कोणतीही ताकद आम्हाला आदोलनापासून परावृत्त करू शकणार नाही' 'कामगारानो जागे व्हा !' 'स्टूडट्स् युनिटी झिंदावाद !'' आता पाऊल मागे घेणे नाही. आम्ही प्राणपणाने आमचा लढा लढविणार !' अशा निकराच्या वल्गना आमची लोकशाही रात्रंदिवस ओकू लागली. लोकशाहीचा हा तोंड-वळा आमच्या परिचयाचा वाटला. कारण आमच्या मनात लोकशाहीची एक प्रतिमा पक्की ठसलेली आहे. – लोकशाही म्हणजे आपल्या रास्त मागण्यासाठी ( मागण्या नेहमी रास्तच असनात–इति लोकशाही ) बेमुदत आणि मनसोक्त सप करण्याचा परवाना. आम्हा सामान्यांचा लोकशाहीशी संबध येतो तो या संपापुरता, त्याचा विचार-स्वातंत्र्याशी सुतराम संबंध नाही !

हा झाला लोकशाहीमुळे तुमच्या-आमच्या आसपासच्या वातावरणात पडलेला फरक. आपल्या राजकीय परिस्थितीत झालेली स्थित्यतरे तर बहुचर्चित आहेत. लोकशाहीमुळें देशात विरोधी पक्ष अस्तित्वात आला. पुढारीमडळी साठमाऱ्या खेळू लागली. मनोरंजक संवाद राजकीय व्यासपीठावर सुरू झाले. चौकशी-समित्याची विविध स्तरावर स्थापना होऊ लागली. वगैरे वगैरे.

पण राजकीयदृष्ट्या खरा महत्त्वाचा फरक वेगळा आहे तो म्हणजे राजकीय शक्तींच्या ध्रुवीकरणाची प्रक्रिया. ही प्रक्रिया आणीबाणीनंतर जबरदस्त वेगाने सुरू झाली. प्रथम राजकीय शक्तींनी कॉंग्रेस सोडणे सुरू केले लोकशाही कॉंग्रेस मूळ धरू लागली. मग लोकशाही कॉंग्रेस अचानक जनतापक्षात विलीन झाली. बहुसख्य राजकीय चिंतकाना वाटले आता इथे ध्रुवीकरणाची प्रक्रिया थांबणार. कॉंग्रेस आणि जनता-पक्ष हे दोनच ध्रुव भारताला पुरेसे आहेत; पण भारतीय लोकशाहीच्या तत्त्वात एवढेही ध्रुव बसत नाहीत. 'जितके पक्ष अधिक तितकी लोकशाही मजबूत' अशी आमची धारणा आहे. यासाठी भारतात घरोघर पक्षस्थापना करण्यात येते. 'जितक्या व्यक्ती, तितके पक्ष' हा आमच्या कल्पनेतल्या लोकशाहीचा आदर्श आहे. त्यानुसार आता देशभर विविध पक्षस्थापनाना सुरुवात होत आहे. आणीबाणीनतर जनता-पक्ष आणि कॉंग्रेस असे दोनच मोठे पक्ष उरून राजकारणाच्या धद्याला मदी येण्याची चिन्हे दिसत होती; पण आता मात्र आपल्या लोकशाहीचे जुने स्वरूप हळूहळू उजळू लागले आहे. द्र. मु. क. ची शकले नव्याने पडू लागली आहेत. महाराष्ट्रात 'समाजवादी कॉंग्रेस' उच्च आवाजात गर्जन करू लागली आहे. जनता-पक्षाच्या अंतर्गत जाचाला कंटाळून स. का. पाटील यानी सघटना कॉंग्रेस पुन्हा एकदा स्वतंत्र करण्याचा चग बाधला. आहे आणि त्यानुसार पावले उचललीही आहेत. कॉंग्रेसचे माजी मंत्री हनुमंतय्या यानी नव्या 'सुराज्य' पक्षाची स्थापना केली आहे. त्यांच्या सहकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार त्यांनी असा नवीन पक्ष स्थापला आहे.

काहीच्या मते अर्थातच या घटनांना फारसे महत्त्व नाही. स. का. पाटलानी ही जी वल्गना केली, त्यामागे त्याचा तसा कुणालाच त्रास देण्याचा हेतू नव्हता. अधूनमधून वर्तमानपत्रात आपले नाव येत रहावे यासाठी ते असे करतात म्हणे. तेव्हा त्याला फारसे महत्त्व देण्याचे कारण नाही. तसेच काहीच्या मते नवा 'सुराज्य' पक्ष काही गैरसमजामुळे निर्माण झाला असावा. हा गैरसमज मुख्यत: हनुमंतय्याच्या सहकाऱ्यमुळे झाला असावा. अखिल भारतीय पातळीवर हनुमंतय्या याच्या नावाला काही वेगळें अस्तित्व आणि महत्त्व असावे असा समज या सहकाऱ्यांचा झाला असावा. त्यातून हा पक्ष स्थापन झाला असावा; पण या पक्षानेही फारसे बिघडणार नाही.

हे काहीही असले तरी लोकशाहीची प्रक्रिया भारतात मूळ धरू लागली आहे हे सिद्ध करण्यास ह्या घटना पुरेशा आहेत. कारण या नव्या पक्षाची तत्त्वे खूपच चित्य आहेत. सघटना कॉंग्रेस जनतामधून असतोषानेच फुटणार, यात तत्त्वाचा संबध नाही. समाजवादी कॉंग्रेस कॉंग्रेसमधूनच असतोषानेच फुटली. यातही तत्त्वाचा संबध नाही 'सुराज्य' पक्षाचे ध्येय राजकारणातील घाण काढण्याचे आहे. हे ध्येय माझ्या कल्पनेप्रमाणे सर्वच पक्षाचे असते. तेव्हा त्यात वेगळे काहीच नाही. याखेरीज हनुमंतय्याच्या मतानुसार जनता-पक्ष व कॉंग्रेस दोघेही भ्रष्ट आहेत आणि असे असूनही त्याचा पक्ष जनतापक्षाशी (फक्त) सहकार्य करणार आहे. एकूण सुराज्य पक्षाची तत्त्वेही बरीच लवचिक दिसतात आणि तसा जनता-पक्ष आणि कॉंग्रेस याच्यातही तात्त्विक भेद कोणता हा प्रश्न भल्याभल्याना चकवणारा आहे. तेव्हा भारतीय लोकशाहीतील राजकीय पक्ष हे तत्त्वानुसार नव्हे तर व्यक्तीनुसार बदलतात. त्याच त्याच व्यक्ती निरनिराळ्या पक्षांच्या बॅनरखाली एकत्र येऊन गरजेनुसार राजकारण साधतात आणि वेळ भागवून नेतात. भारतीय राजकारण गतिशील (dinamic) आहे ते असे.

भारतात लोकशाही परंपरांची आणि मूल्याची पुन्हा एकदा प्रतिष्ठापना होऊ लागली आहे असे मी वर म्हटले ते याच अर्थाने.

भरपूर संप आणि भरपूर पक्ष ( तेही तत्त्वहीन ) हे भारतीय लोकशाहीचे मर्म आहे आणि ही आम्हा सामान्याना जाणवलेली लोकशाही आहे.




### लेखांक दहा

# नक्षलवाद—विमोचक की विनाशक ?

शिरीष सहस्रबुद्धे । चन्द्रशेखर पुरंदरे

नक्षलवादाच्या शोधात लिहिलेला हा अखेरचा लेखांक. यापूर्वीच्या लेखाकांमध्ये एक राजकीय तत्त्वप्रणाली म्हणून नक्षलवादाची, त्याच्या शक्य त्या व्यावहारिक पैलूंसह, तोंडओळख करून देण्याचा प्रयत्न होता. त्यामुळेच बरेचसे लेखन यथासंभव वस्तुनिष्ठ व कमीत कमी पक्षपाती असावे या जाणिवेसह केले गेले. तसेच या लेखांकात तटस्थ परिचायकाच्या भूमिकेतून, संपूर्ण वास्तव व तार्किक भूमिकेतून (Rational Approach) नक्षलवादाचा अभ्यास करणे, त्याचे मूल्यमापन करणे एकूण तत्त्वज्ञानाला न्याय मिळण्याच्या दृष्टीने सोयीचे पडेल.

ज्या ज्या ठिकाणी राबणाऱ्या, अर्धपोटी वा उपाशी लोकांना डोळ्यांसमोरच आपल्या जिवावर जमीनदार गबर होतो आहे हे जाणवले, पोटातील भुकेच्या आगीने जाणवले, त्या त्या ठिकाणी आपल्या त्याच्याविषयीच्या असंतोषाला मार्ग करून देण्यासाठी त्यांनी नक्षलवादाचा आश्रय घेतला किंवा, ज्या अशा चळवळी झाल्या, त्या 'नक्षलवादी' या सदरात टाकल्या गेल्या. कोणत्याही समाजाची रचना बदलू पहाणाऱ्या तत्त्वज्ञानाची यशस्विता ही ते तत्त्वज्ञान, जो समाज बदलू पहाते त्याचा त्या तत्त्वज्ञानाला पाठिंबा किती यावरून जोखली जाते आणि इथेच एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होतो तो हा, की समाजाची जी अंतःप्रेरणा वा सदसद्विवेकबुद्धी असते (हे गृहीत धरणे कम्युनिस्टांना पूर्णतः मंजूर आहे. कारण माओनेच वैयक्तिक प्रेरणेला, बुद्धीला मर्यादा असतात पण संपूर्ण समाजाची प्रेरणा, बुद्धी अमर्याद असते असे म्हटलेले आहे.) ती कोणत्याही मानवनिर्मित एका नव्या तत्त्वज्ञानानुसार पूर्णपणे बदलू शकते काय ? प्रत्येक वेळी जुन्या संस्कारांचे ओझे पाठीवर वाळगून, पूर्वानुभवांच्या चष्म्यातून जेव्हा माणूस जगाकडे पाहतो, तेव्हा ते पहाणे हे एखाद्याने तटस्थतेचा कितीही उद्घोष केला, तरी पूर्वग्रहदूषितच असते आणि अशा पारंपरिक दृष्टिकोनाहून नवीन तत्त्वज्ञान आत्मसात् होणे हे नवीन तत्त्वज्ञानाचे विशुद्धत्व परिस्थितीनुरूप अशुद्ध परिवर्तन केल्याखेरीज शक्य होत नाही.

दुसऱ्या शब्दात, ज्या ज्या ठिकाणी लोकांनी नक्षलवाद्यांना पाठिंबा दिला त्या त्या ठिकाणी तो तत्त्वज्ञानाला दिला की वास्तवतेला दिला याच्या सीमा ठरविणे कठीण आहे. विशेषतः नक्षलवाद हा तत्त्वज्ञात

आणि चळवळ (किंवा वास्तवता) या दोन बहुतांशी सुदूर अशा पायांवर उभा असल्याने हा प्रश्न त्यांच्याबाबतीत विशेष महत्त्वाचा ठरतो.

## नक्षलवाद का वाढला नाही ?

यातूनच उद्भवणारा दुसरा प्रश्न म्हणजे जर अन्न वस्त्र आणि निवारा या तीन जीवनाच्या मूलभूत गरजांची ग्वाही देण्यासाठी या पक्षाचा जन्म झाला होता (हे इतक्या सोप्या शब्दात दुर्दैवाने नक्षलवाद्यांनी कधीही सांगितले नाही) आणि आज या देशामध्ये या तीन गरजा एकेक वा सगळ्या भागल्या न जाणारे असंख्य लोक असताना नक्षलवादाला मूळ का धरता येऊ नये ? त्याचे कारण बहुतांशी असे, की जेव्हा संपूर्ण क्रान्तीची भाषा बोलली जाते तेव्हा माओने ज्याप्रमाणे एका क्षितिजावर रेंगाळणाऱ्या स्वर्गाची लालूच जनतेला दाखवून एक क्रान्ती पार पाडली ( आणि तो स्वर्ग अस्तित्वात नसलेल्या क्षितिजाप्रमाणें कायम दूरच ठेवला) तसा एक स्वप्नाचा फुगा आकाशात न सोडता केवळ आहे ते उद्ध्वस्त करण्याची शिकवण आजवर नक्षलवादाने दिली.

नक्षलवादाच्या रचनात्मक क्षमतेविषयी–नवसमाज उभारण्याच्या क्षमतेविषयी–लोकांची खात्री कधीच पटलेली नाही प्रारंभापासूनच ही चळवळ जुने मोडणारी म्हणून प्रसिद्धी पावली आणि ती तशा प्रकारे कुप्रसिद्ध ठरावी अशीच वर्तणूक पहिल्या तीन–चार वर्षांत तिच्या अनुयायांनी ठेवली. तिला नवे घडविण्याची इच्छा व ताकद आहे की नाही याची चाचणी कधी घेताच आली नाही तसा अनुकूल विश्वास आपल्याविषयी निर्माण करण्याकडे नक्षलवादी नेत्यांनी व प्रचारकांनी कधी गंभीरपणे लक्ष पुरविल्याचेही दिसत नाही.

क्राती याचा अर्थ केवळ मोडतोड, केवळ जुन्याचा विध्वंस असाच होणारसे दिसले तर भारतीयच काय पण कोणत्याही देशातली आमजनता क्रातीला (अंशतः क्रांतीलासुद्धा) हार्दिक पाठिंबा देणं कसं शक्य आहे ? क्रातीमध्ये काही जळलं–पोळलं तर त्याच्या राखेतून फिनिक्ससारखी काही नवनिर्मिती होईलच याची हमी मिळाल्यागिवाय लोक आहे त्याचीही राखुडी करायला कसे तयार होतील ? आणि त्यातूनही भारतीय जनता तर प्रथमपासूनच अत्यधिक स्थैर्यवादी–पर्यायानं स्थितिप्रिय, जैसे थे वादी–म्हणून प्रसिद्ध आहे. आणि तिला मुळात जे सोसाव लागलय आणि लागतय त्याची तीव्रता ध्यानात घेता तिला क्रांतिप्रवण करून आणखी काही सोसायला लावायच असेल तर त्यामागे (उज्ज्वल नाही तरी निदान सुसह्य) भविष्यकाळाचं आश्वासन मिळायला हव. नक्षलवादानं त्या दिशेन काही कार्यक्रम आखायला व प्रसृत करायला हवा आहे

## मनुष्याचे विश्लेषण

परतु प्रश्न दिसतो इतका सोपा नाही. ज्या ज्या बाबतीत समाजाचा सहभाग अपेक्षित असतो त्या त्या बाबतीत तत्त्वाचे सामान्यीकरण केवळ अवास्तवच नव्हे तर धोकादायक सुद्धा ठरू शकते. Give them bread, shelter & clothing, they will ask for poetry, असे म्हटले जाते; पण यामध्ये कोणताही कालक्रम सुनिश्चित करतां येतो असे दिसत नाही. पशुत्व संपलें की, मनुष्यत्व सुरू होते हे mutually enclusive म्हणून व समजण्यास सोपे म्हणून गृहीत धरणे साहजिक असते; पण मनुष्यत्व व पशुत्व एकसमयी एकाच शरीरात नांदत असतात या साऱ्याचा नक्षलवादाशी संबंध कोठे येतो ? तर नक्षलवाद किंवा कोणतेही तत्त्वज्ञान समाज बदलण्याचे जेव्हा आव्हान स्वीकारतो, तेव्हा या समाजाचा केंद्रबिंदू कोण हे ठरविण्याची मोठी जबाबदारी त्याच्यावर असते समाज समाजात सुरू होऊन समाजात संपतो, व्यक्तीत सुरू होऊन वर्गयुक्त समाजात संपतो, व्यक्तीत सुरू होऊन व्यक्तीतच संपतो (समाज ही चीजच अस्तित्वात नसते) की आणखी काही Permutations Combinations या केंद्र व परिघ ठरविण्याच्या बाबतीत शक्य असतात, हे नक्षलवादाच्या बाबतीत ठरविणे आवश्यक आहे याचे कारण असे की, संपूर्ण प्रस्थापितातील जे जे शोषण व शोषणकर्ते या सदरात किंवा बूर्ज्वा या सदरात मोडते, ते सर्व मोडून एक नवा समाज अस्तित्वात आणण्याची नक्षलवादाची इच्छा आहे, मुळात असा समाज अस्तित्वात आणता येतो का, आल्यास तो स्वप्नांशी किती प्रामाणिक असतो, हिंसेच्या साहाय्याने आणलेल्या समाजात हिंसा टिकूनच राहते, की तो अहिंसावादी बनू शकतो, म्हणजे उद्याच्या शांततामय जीवनासाठी आज हिंसेचा अवलंब तत्त्व म्हणून नव्हे तर rationality म्हणून योग्य ठरू शकतो का हे अत्यंत मूलभूत व कायमचे विवाद्य प्रश्न या संदर्भात उत्पन्न होतात. त्यांचा संदर्भ केवळ नक्षलवादामुळेच देणे भाग पडले असे नव्हे तर जे जे कोणी वर्तमानकाळातील सर्व अगर भेदभाव उज्ज्वल उद्याचे स्वप्न दाखवून सोडविण्याचे वा मिटविण्याचे प्रयत्न करू इच्छितात त्या सर्वांनी हा विचार फार सूक्ष्मतेने केला पाहिजे. आजवरच्या नक्षलवादाच्या चुका दिसायला ढोबळ आहेत आणि दुर्दैवाने त्यांची कारणमीमांसाही नक्षलवाद्यांनी तितक्याच उथळपणे केलेली आहे. उदाहरण म्हणून आपण चारु मुझुमदारची तत्त्वप्रणाली घेऊ. आजचा नक्षलवादी ही चूक कबूल करतो तेव्हा त्या बाबतीत परत परत तेच त्याला खडसावून 'जितं मया' असा अभिनिवेश धारण करण्यात अर्थ नाही, परंतु नक्षलवादाच्या विवेचनात हा भाग अपरिहार्य आहे तेव्हाचे नागी रेड्डीचे जे तत्त्वज्ञान होते त्यात चारु मुझुमदारच्या तत्त्वज्ञानापासूनचे त्याचे भिन्नत्व दोन प्रमुख मुद्द्यावर होते. एक म्हणजे लोकशिक्षण आणि दुसरे म्हणजे बहुजनसहभाग. या दोन प्रमुख आधारस्तंभांखेरीज चळवळ उभी राहूच शकणार नाही हा त्याचा दावा होता. याचे सविस्तर विवेचन पुढे करू. काळाने तो खरा ठरविला असे म्हणावे लागेल. कारण आजच्या नक्षलवादात त्याचे महत्त्व मानण्यात आले आहे; पण हाही एक प्रयोगच आहे हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. एक absolute solution कधीही मिळत नसते. क्रान्तिकारक म्हणजे तो स्वप्नाळू, ध्येयवादी, वेडा वगैरे असणारच या मूर्खपणाच्या कल्पना आहेत. क्रान्तिकारक असणे सगळ्यात जास्त महत्त्वाचे आहे. सम्यक् परिस्थितीचे आकलन करून त्याने 'क्षणे क्षणे यत् नवतामुपैति' असे काही तरी सतत शोधून काढलेच पाहिजे. चारु मुझुमदारसुद्धा या देशात अयशस्वी व्हावा याची कारणमीमासा नक्षलवाद्यांनी ढोबळपणे केली असे आम्हाला वाटते ते यामुळेच. जर देशात क्रान्तीची वस्तुनिष्ठ परिस्थिती तयार

आहे, शोषक आणि शोषित यांच्यात एवढी तफावत दृग्गोचर आहे, तर अगदी मुडदे पाडायलाही माणसे का तयार होऊ नयेत ? इथे प्रश्न लोकशिक्षणाचा येतच नाही. लोकशिक्षणाने काय होणार ? शिक्षणाच्या आधी 'मार गोळी म्हटले की मारली गोळी !' अशा 'खाकी डोक्याचा सैनिक तरी असतो, म्हणजे शिक्षणाआधी चळवळीचे नेते सांगतील तेच प्रमाण मानण्याचा तरी कल असतो; पण शिक्षणाने कितीही ढापणे लावून देण्याचा प्रयत्न केला, तरी एकदा स्वतंत्र विचार करू लागल्यावर माणूस आपल्या अकलेचे काही तरी तारे तोडणार हे उघड आहे. मला माझे तत्त्वज्ञान बरोबर वाटते ते राबविण्यासाठी केवळ एक राबणाऱ्याची संघटना हवी– निष्ठेने ते राबले पाहिजेत एवढीच अट–तर लोकशिक्षण बूमरँग ठरू शकते. याचा अर्थ लोकशिक्षण करणे, 'शहाणे करूनि सोडावे सकळ जन' हे मूलत:च चूक आहे असे आम्हाला म्हणावयाचे असेलच असे नाही तर सगळ्या लोकांना शिक्षण दिल्यावर, सद्य:स्थितीत तुमचे शत्रू आमच्या मते कोण हे सांगितल्यावर हजार लोकांमध्ये एखादा सच्चा अनुयायी पूर्ण Convinced मिळायचा त्यापेक्षा एखादी घटनाच अशी घडवायची की तिचा विद्युत्प्रवाहासारखा परिणाम घडेल व त्यायोगे भारलेले जनसामान्य मेंढरासारखे मागे येतील यात चारु मुझुमदार फारसा चुकला असे म्हणता येणार नाही.

### कोणतेही तत्त्वज्ञान सर्वश्रेष्ठ नसते

मग चूक कोठे झाली ? तर चूक तियेच झाली की जिथे ती होते आहे. कोणतेही समाजशास्त्र का अस्तित्वात येते ? तर समाज बदलायचा म्हणून. हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे समाज बदलण्यातील यशस्विता हे त्या समाजशास्त्राच्या यशाचे गमक ठरते. रशियन वा चिनी क्रान्ती हे मार्क्सवादाच्या यशाचे गमक ठरते आणि म्हणजेच त्या विशिष्ट परिस्थितीला अनुरूप असा अर्थ लावल्याने अस्सल मार्क्सवाद कधीच संपला होता. जे झाले ते मार्क्सवादाच्या व्यवहारवादाच्या तडजोडीतून जन्माला आलेले होते. नाही तर मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे पहिली क्रान्ती इंग्लंडमध्येच व्हायला हवी होती. मार्क्सवादाची त्रिकालाबाधितता किंबहुना कोणत्याच तत्त्वज्ञानाची त्रिकालाबाधितता आम्हाला मान्य नाही. एखाद्या विश्लेषणाची महती त्यातील व्यवहाराच्या वास्तवतेवर, स्थलकालावलंबित्वाने यशस्वी होते. **मार्क्सवाद हा इतिहासाच्या अनेक अन्वयार्थांपैकी एक अन्वयार्थ आहे. तो सर्वग्राही नाही, सर्वस्पर्शी नाही किंवा सर्वसमावेशकही नाही** या मानवी बुद्धीच्या अपरिहार्य मर्यादा आहेत. दुर्दैवाने मार्क्सने ज्या पोथीनिष्ठांवर कडाडून हल्ला केला, त्याचेच नशीब त्याच्या वाट्याला आले.

कोणतीही राजकीय तत्त्वप्रणाली ही अखेर माणसाची निर्मिती असते आणि त्यामुळेच तो परिपूर्ण, निर्दोष, सर्वांगसुंदर असण्याचा संभव नाही. तथापि याची जाणीव माणसाच्या जातीला राहत नसल्याचा पुरावा इतिहासाने वारंवार करून दिला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात गांधीवाद हा सर्व व्यक्तिगत व राष्ट्रीय दुरितांवर एकमेव व रामबाण इलाज असल्याचा गैरसमज करून घेतला व दिला गेला; परंतु बाह्य आक्रमणाची टांगती तलवार व अंतर्गत समस्यांचे उद्रेक यांच्या दबावाखाली गांधीवाद संपून गांधीजींचे नाव फक्त जपमाळेसारखे उरले. [ आज तोच ऐतिहासिक गैरसमज करून घेण्यादेण्याची प्रक्रिया केंद्रापासून पुन्हा एकवार सुरू झाल्याची लक्षणे दिसत आहेत, तेव्हा विचार करण्याची वेळ पुन्हा येऊन ठेपल्याचे दिसते. साम्यवादाच्या बाबतीतला अनुभव गांधीवादापेक्षा फार वेगळा नाही. ] साम्यवाद हेच सर्वच्या सर्व प्रश्नांचे अंतिम उत्तर असल्याच्या धारणेने जी राज्ये चालविण्यात येतात त्यांच्या आजवरच्या वाटचालीची फलश्रुती या दृष्टीने तपासून पाहण्यालायक आहे. तेव्हा साम्यवादाचाच एक प्रवाह असणारा व साम्यवादातील मार्क्स–लेनिन–माओ यांच्या विचारधारेचे प्रतिनिधित्व करीत असल्याचा दावा करणारा नक्षलवाद या आभासात्मक परिपूर्णतेला अपवाद कसा ठरेल ? त्यामुळे एकीकडे ही मार्क्स–लेनिन-माओवादी तत्त्वप्रणाली ही बहात्तर रोगांवरची अक्सीर दवाई असल्याचा आग्रह तिच्या समर्थक / अनुयायांकडून केला जातो, तर दुसरीकडे तिच्या विरोधकांकडून तिची हेटाळणी, गुंडगिरी–देशद्रोह–माथेफिरूपणा–रक्तपिपासूवृत्ती–अमानुषता अशी लेबल्स लावून केली जाते. नक्षलवाद ही अमृतवल्ली असल्याचे सांगून तिचे बीजारोपण या तथाकथित अनुकूल भूमीत करण्याचे आटोकाट प्रयत्न तिच्या उपासकांनी केले, तर ती विषवल्ली असल्याचे मानून तिचे समूळ उच्चाटन करण्याची पराकाष्ठा सरकारने व साम्यवादविरोधी समाजघटकांनी केली. तथापि हे दोन्ही परस्परविरोधी प्रयत्न एकाच वेळी असफल ठरण्याचे अघटित घडले आणि आज अवस्था अशी आहे की ही राजकीय तत्त्वप्रणाली वाढतही नाही किंवा मरतही नाही ! तिच्याबद्दल काही गंभीर व मूल्यमापनात्मक विचार करण्याची वेळ / गरज याच चमत्कारिक अवस्थेतून उद्‌भवली आहे.

### नक्षलवादाचा खरा शत्रू गांधीवाद

हा प्रश्न अधिक सूक्ष्मपणे पाहू. माणसामध्ये सत् आणि असत् दोन्ही प्रवृत्ती आहेत मार्क्स हा जडवादी तत्त्वज्ञ मानला जातो. त्याचे म्हणणे काय ? त्यासाठी हेगेलचे म्हणणे थोडे-फार पहावे लागेल. कारण मार्क्सने हेगेलचे द्वित्ववादाचे तत्त्व पुढे घेतले. हेगेलच्या मते जडातून चैतन्याची निर्मिती होते. ह्या जड व चैतन्य या दोन संकल्पनांमध्ये प्रमुख कोणती मानायची हा गांधीवाद ( विशेषत विनोबांनी घेतलेला अर्थ ) व मार्क्सवाद यांतील मतभेदाचा मुद्दा आहे. मगाशीच म्हटल्याप्रमाणे कोणापासून कोणाकडे ह्याच प्रश्नाचा हा आविष्कार आहे. केन्द्र कोणते ? समाज की व्यक्ती ? गांधी चैतन्य मूळ मानतात व त्यामुळे अहिंसेला प्राधान्य येते. मार्क्स जड मूळ मानतो त्यामुळे बाह्य परिस्थिती बदलून असत् प्रवृत्तीचा नाश त्याला करावयाचा आहे. चे गव्हेरा 'क्रान्तिकारक हा सर्वांत मोठा मानवजातीचा प्रेमिक असतो' असे म्हणे. त्याचा हाच अर्थ आहे.

## आज अवस्था अशी आहे की ही राजकीय प्रणाली वाढतही नाही किंवा मरतही नाही....

किंवा जपानमधील झेन बुद्धिझममध्ये 'संताच्या हातातच तलवार शोभू शकते' अशा विचारसरणीचा एक पथ आहे तोही याला मिळताजुळता दिसतो; परंतु गांधी चैतन्य प्रमुख मानीत असल्याने ते दडेलीने बदलता येईल यावर त्याचा विश्वास नव्हता; तर चैतन्य बदलले की (किंवा अधिक अचूक शब्दात, त्याची अभिव्यक्ती अधिक अस्सल स्वरूपात झाली तर) परिस्थितीत गुणात्मक फरक पडणे शक्य होईल. त्यासाठी अहिंसा अटळ आहे.

मार्क्सवादातील प्रोलेटॅरिअटची हुकूमशाही हा प्रकार त्याला स्वतःला अल्पकाळापुरता अभिप्रेत असला तरी तो कधीच संपत नाही असे दिसून येईल. रशियामध्ये तर आज प्रोलेटॅरिअट जाऊन केवळ हुकुमशाहीच चालू आहे. चीनचा जो (PICM-L) चा पुळका आहे तोही अस्थानीच आहे ही हुकुमशाही नष्ट होत नाही. ती वेशिस्त लोकशाहीपेक्षा त्रासदायक ठरते. माओच्या सुप्रसिद्ध Let hundred flowers bloom या उदारमतवादाच्या घोषणेनंतर पीकिंग विद्यापीठाच्या प्राध्यापकांची अशी काही भलतीच प्रतिक्रिया झाली आणि विद्यार्थ्यांचा वणव्यासारखा वाढता असा काही पाठिंबा मिळाला की माओने ती घोषणा मागे घेतली आणि अधिक जोमाने लोकांना राबवायला सुरुवात केली. नक्की काय म्हणायचे आहे ते आपल्याकडच्या निवडणुकानंतर पाश्चात्य जगात आलेल्या एका प्रतिक्रियेवरून लक्षात येईल. 'इंदिरा गांधींचा पराभव तर झाला. यावरूनच जर आज चीन, रशियामध्ये निवडणुका घेतल्या तर ब्रेझनेव आणि हुआकुओफेंग यांची काय हालत होईल ते स्पष्ट आहे.'

असे का व्हावे? जडवाद श्रेष्ठ की चैतन्यवाद श्रेष्ठ हा अधिक खोलात शिरून सुटणारा प्रश्न नाही. तेव्हा याचे एक उत्तर त्याहूनच जो साधनशुचितेचा महत्त्वाचा प्रश्न पुढे येतो त्यात मिळू शकेल. हिंसात्मक मार्गांनी वा साधनांनी अहिंसात्मक ध्येये गाठता येतील काय? परत हिंसा आणि अहिंसा याचे विवेचन आम्ही सूक्ष्मतम पातळीपर्यंत जाऊन करू. आपला विचार दुसऱ्यावर लादणे ही अत्यंत तलम व तरल स्वरूपाची हिंसाच असते, पण इतक्या सूक्ष्म पातळीवर जाण्याने प्रत्यक्ष नक्षलवादाचा संबंध न राहता in general कोणताही 'वाद' अथवा 'ism' फोल ठरतो. तर ढोबळ मानाने जी हिंसा मानली जाते ती घेऊ. यातसुद्धा गांधींचे whenever there is a choice between cowardice & violence, I'dprefer violehce हे वाक्य लक्षात ठेवायला हवे. भेकडाची अहिंसा त्यांना कधीच अभिप्रेत नव्हती. तेव्हा आज संरक्षणात्मक भूमिकेतूनच केवळ जो पवित्र हिंसेच्या सहाय्याने (परत नागी रेड्डीचा तेव्हाचा मार्ग) घेतलेला आहे त्याचे गांधीवादाशी फारसे वावडे दिसत नाही. प्रोलेटॅरिअट भेकड आहे की शूर आहे हा प्रश्न असला तरच तो हिंसक की अहिंसक हा प्रश्न येतो. गुंता नक्की कोठे होतो? हिंसा आणि असत् व अहिंसा आणि सत् हे जेव्हा equate करून एक अध्याहृत बैठक तयार केली जाते तेव्हा मूळ संकल्पना रेखीवपणे अलग राहात नाहीत.

पण दुर्दैवाने आज काय दिसते? पूर्वीच (तिसऱ्या लेखात) एक उदाहरण दिले होते विड्याच्या पानांच्या संदर्भात. आज त्या फॉरेस्ट कॉन्ट्रॅक्टरने नक्षलवाद्याच्या चळवळीमुळे आदिवासींना अधिक पैसे देण्याचे मंजूर केले. १०० विड्यांचे एक बंडल करून द्यायचे असे ठरले. दर बंडलामागे काय पाच-दहा-पंधरा पैसे कामगाराला मिळणार. भेटलेल्या नक्षलवाद्याने मोठ्या फुशारकीने 'आज तो कामगार १०० विड्यांचे बंडल करतच नाही, तो ६०-७० चेच करतो आणि जास्त पैसा मिळवतो' असे सांगितले. हा अस्वस्थ करणारा प्रसंग आहे. इतकेच नव्हे तर नक्षलवादाच्या चिटेपणाची ही नागडी साक्ष आहे. बाह्य परिस्थिती बदलली; पण माणूस बदलला का? नाही. उद्याचा यांचा आदर्श समाज, ज्याचे जगातील हा 'मुक्त प्रदेश' हे उदाहरण आहे किंवा miniture आहे तिथे अशी परिस्थिती आहे. उदाहरणच मोठ्या भिंगातून दाखवण्याची आमची इच्छा नाही. कदाचित हे एकच उदाहरण असे असू शकेल; पण इथे जी भेदक सूचकता आहे ती बरेच काही सांगणारी आहे.

. व्यावहारिक पातळीवर विचार करता ज्या तत्त्वाच्या आधारावर नक्षलवादी चळवळ भारतीय साम्यवादी पक्षापासून फुटून वेगळी निघाली तो पाया आता शिल्लक नाही. मुळात हा पाया सैद्धांतिक कमी आणि व्यावहारिक जास्त होता. CPM पासून नक्षलवाद वेगळा झाला तो मुख्यत: डावपेचाच्या, tactics च्या मतभेदाच्या आधारे. धोरणात्मक किंवा तत्त्वज्ञानात्मक मतभेदाच्या आधारे नव्हे. त्यांनी काही नवा वाद (ism) निर्माण केला किंवा साम्यवादाचा काही नवा अर्थ लावला असे म्हणणे धाडसाचेच ठरेल (त्यामुळेच मागील काही लेखांकात दाखवून दिल्याप्रमाणे, CPM चे राजकीय तत्त्वज्ञान आणि CPI(ML) चे राजकीय तत्त्वज्ञान यात मोठे, महत्त्वाचे असे फरक फार कमी आहेत.) सशस्त्र क्रांतीची वेळ अगदी नजीक येऊन ठेपली आहे असे साम्यवाद्यांच्या काही गटाचे मत बनले व त्यांनी इतरांपेक्षा अधिक लढाऊ डावपेच स्वीकारून आपली चूल वेगळी मांडली.

आज हा लढाऊ बाणा कुठे आहे? सर्वंकष सशस्त्र क्रांतीचे स्वप्न सध्यापुरते तरी विरून गेले आहे. शस्त्रे उचलण्याची वेळ आली आहे हे चारु मुजुमदार व इतरांचे निदान व शस्त्रे उचलल्यानंतरचे त्यांचे डावपेच केवळ अपयशीच नव्हेत तर आत्मघातकीही ठरले. या पराभवानंतर नक्षलवाद आता आपले डावपेच बदलू इच्छितो. (लेखांक सात-आठ-नऊमध्ये स्पष्ट झालेली भावी नक्षलवादाची रूपरेषा या दृष्टीने पुन्हा पाहावी.) पूर्वीप्रमाणे सशस्त्र क्रांतीची घाई करण्याऐवजी आता निवडणुकीच्या राजकारणाशी नक्षलवादाने लगट चालविली आहे. CPI(ML) ने राज्यविधानसभाच्या १९७७ च्या निवडणुकामध्ये कॉंग्रेसविरोधांना पाठिंबा दिला. प. बंगालमध्ये तर संतोष राणा हा नक्षलवादी नेता तुरुंगात असतानाच विधानसभेवर निवडूनही आला. नक्षलवादी नेता सत्यनारायण सिंग याने गृहमंत्री चरणसिंग यांच्याशी कम्युनिस्ट राजबंद्यांच्या सुटकेविषयी चर्चा केली. या साऱ्याचा अर्थ काय? नक्षलवाद जर असा खरोखरीच बदलला असेल तर CPI(ML) व CPM यांच्यामध्ये कशाच्या आधारावर फरक करायचा? हा लेख लिहिला जात असतानाच दिलेल्या एका मुलाखतीत उपरिनिर्दिष्ट संतोष राणाने 'CPM शी आमचे गंभीर तात्त्विक मतभेद असले तरी आमचे परस्पर संबंध सामोपचाराचे राहतील. अर्थात जनतेच्या मूलभूत प्रश्नावर आम्हाला कदाचित त्यांच्याविरुद्ध लढाही पुकारावा लागेल,' असे विधान केले

आहे पण त्या मंडळींना जे फरक मतभेदाच्या रुंद दरीसारखे वाटतात ते तटस्थ व सामान्य निरीक्षकाला वीतभर फटीएवढेच दिसल्यास नवल नाही. टाटा–बिर्लांना बिग बूर्ज्वा म्हणायचे की नॅशनल बूर्ज्वा हा मुद्दा CPM व CPI(ML) ला अगदी जीवन-मरणाच्या फरकाएवढा महत्त्वाचा वाटत असला, तरी अनेक मूलभूत धोरणात्मक बाबींवरील त्यांचे परस्पर साम्य लक्षात घेता, असे किरकोळ फरक अंतिमत: परिणामकारक ठरणारे नाहीत हे ध्यानात येण्यास अडचण पडू नये. प्रदीर्घकालीन वर्गलढा (Protracted Class-War) हे अशा साम्यस्थळांपैकी एक महत्त्वाचे. भारताच्या संदर्भात अशा वर्गलढ्याचा योग्य तो अन्वयार्थ लावण्याच्या टप्प्यापर्यंत CPM व CPI(ML) हे दोन्हीही आता येऊन पोहोचले आहेत आणि म्हणूनच CPM चे लढ्याचे तत्त्वज्ञान व नक्षलवादाच्या भावी वर्गलढ्याची गेल्या अंकात स्पष्ट केलेली रूपरेषा याच्यात बरेच साम्य आढळले तर आश्चर्य वाटू नये. भारतात लढाईच्या प्रदीर्घकालीन वर्गसंघर्षामध्ये संसदीय पातळीवरील युद्ध आणि लोकशिक्षण (mass education) या दोन महत्त्वाच्या घटकाचा समावेश अपरिहार्यपणे करावा लागणार. दहा वर्षांपूर्वी शस्त्रे हाती घेताना चारु मुजुमदार व कंपनीने हे दोन घटक त्याज्य मानले व त्या बेपर्वाईची फळे चळवळीला भोगावी लागली. त्या वेळीही सरकारमध्ये सामील असलेल्या CPM ला ज्या नक्षलवाद्यांनी क्रांतिद्रोही, प्रतिक्रांतिवादी, सुधारणावादी, भांडवलदारी लोकशाहीचे हस्तक अशी लाखोली वाहिली होती, त्याच नक्षलवाद्यावर आज निवडणुकात सहभागी होण्याची पाळी यावी हा काळाने त्याना दिलेला जबर धडाच आहे. आता इथे त्यानी काळाची पावले ओळखली की काळाने त्यांना आपल्यामागे फरफटत नेले याबद्दल दुमत होऊ शकेल. संसदीय लोकशाहीच्या प्रक्रियेत सामील होण्याच्या आपल्या निर्णयाचे समर्थन करताना CPI(ML) च्या मुंबईच्या एका नेत्याने आम्हाला असे सांगितले की, 'आम्ही निवडणुकीत किरकोळ प्रमाणात सहभागी झालो याचा अर्थ, संसद हे सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन म्हणून आम्ही मान्य केले, असा होत नाही. निवडणुकीमुळे कोणतेही महत्त्वाचे परिवर्तन घडून येत नाही. मात्र लाखो भारतीय उत्साहाने त्यात भाग घेत असल्यामुळे त्याला वळसा घालून टाळून जाणे प्रदीर्घकालीन लोकयुद्धाच्या हिताचे नाही एवढेच. संसदीय प्रक्रियेतील सहभाग हा आम्ही एक डावपेच म्हणून स्वीकारला आहे, मूलभूत धोरण म्हणून नव्हे. क्रांतीला अनुकूल काळ येताच हे लोढणे आम्ही झुगारून देऊ ' हा युक्तिवाद मान्य केल्यावर प्रश्न उरतो तो असा की, CPM ने तरी प्रचलित संसदीय पद्धतीच्या नावे लावलेले कुंकू कुठे जन्मोजन्मीचे आहे? वर्गयुद्धासाठी किंवा सर्वंकष क्रांतीसाठी आम जनतेला तयार करण्याचे एक साधन म्हणून त्यानाही या पद्धतीचा वापर करायचा आहे. फक्त त्याची चाल धीमी आहे आणि नक्षलवाद्याना तर क्रांतीची भलती लगीनघाई झाली होती, त्यामुळेच CPI(ML), CPM पासून वेगळी झाली. आता चित्र दिसते ते असे की, (विशेषत: १९७७ च्या निवडणुकानंतर) CPM ची ताकद वाढलीच वाढली आहे आणि प. बंगालमध्ये त्याचे राज्य आले आहे तर अनाठायी घाई नडल्याने नक्षलवादी चळवळीचे कंबरडेच मोडले आहे!

साहजिकच मागे उल्लेखिलेला प्रश्न उभा राहतो तो असा की आता नक्षलवादी कुणाला म्हणायचे व का म्हणायचे? ज्याला 'नक्षलवादी' म्हणून CPM पासून आपले वेगळेपण मिरवायचे असेल त्याला काही एका तत्त्वप्रणालीबाबत (उदा. शस्त्रे वापरण्याची वेळ, मार्ग) स्वमताग्रही, हटवादी dogmatic) असा पवित्रा घ्यावाच लागेल. तसे न करता ज्याला उदारमतवादी कम्युनिस्ट व्हायचे असेल त्याला CPM ची दारे खुलीच राहतील. कारण CPM व CPI (LM) दोघांच्याही व्यावहारिक तत्त्वज्ञानाचे सार आता 'सशस्त्र लढ्याची गरज व वेळ येईपर्यंत शांततेच्या मार्गाने प्रदीर्घकालीन वर्गयुद्ध झुजत राहणे व त्या अंतिम युद्धाची तयारी करीत राहणे,' हेच उरले आहे. लोकशिक्षणातून लोकपरिवर्तनाच्याच हमरस्त्यावर आता दोघेही आले आहेत तर नक्षलवादाचे वेगळेपण ते काय आणि कुठे राहिले? ज्या कारणाच्या आधारे नक्षलवादाला CPM पासून वेगळा दर्जा दिला, ते कारणच पराभूत झालेले आहे. किंबहुना त्यामुळेच की काय, मध्ये एखादे बेट आल्यामुळे मूळ नदीपासून फुटून वेगळ्या वाहू लागलेल्या प्रवाहाने तो अडथळा विरताच पुन्हा मूळ प्रवाहात येऊन मिसळावे तद्वत नक्षलवाद्यांनी पुन्हा CPM मध्ये सामील व्हावे असे आवाहन बंगालमधून त्यांना करण्यात आले आहे! अंतर्गत दुहीचे व्यसनच जडलेले नक्षलवादी गट अशा तडजोडीला तर राहूच दे, पण आपसातल्या एकजुटीला सहजासहजी तयार होतील असे आत्ता तरी वाटत नाही. आणि म्हणूनच, "एक राजकीय तत्त्वप्रणाली म्हणून नक्षलवाद आता मेला आहे," हे श्री. टी. रामचंद्र रेड्डी (नक्षलवादी नेता नागी रेड्डीचे बंधू) यांचे उद्गार या उपरिनिर्दिष्ट अर्थानेही आता खरे वाटतात.

### व्यावहारिक पातळीवरच्या चळवळीचे डावपेच

आतापर्यंतच्या विवेचनातून नक्षलवादी चळवळीच्या मूल्यमापनातला दुसरा मुद्दा निघतो– चळवळीचे आजपर्यंतचे डावपेच (tactics). अर्थात या विषयावर आजपर्यंतच्या लेखाकात संदर्भानुसार पुष्कळ काही लिहिले गेल्यामुळे येथे पुनरावृत्ती टाळून सक्षेपानेच लिहितो.

१९६७ ते १९७१ पर्यंत चळवळीचे सशस्त्र लढ्याचे जे रक्तरंजित संघर्षपर्व घडले त्यातील चुका पुन्हा उगाळण्यात अर्थ नाही. शस्त्रे उचलण्याची मुजुमदार–सन्याल व इतर नेत्या–कार्यकर्त्यांनी केलेली घाई व शस्त्रे उचलल्यानंतर टाकलेली चुकीची पावले या आपल्या घोडचुका नक्षलवादी नेतेही आता खुल्या दिलाने मान्य करतात. अपुऱ्या तयारीनिशी केलेल्या या शस्त्राघाताला मिळालेल्या प्रत्याघातामुळे घड्याळाचे काटे उलटे फिरविले गेले आणि ग्रामजनता क्रांतिकारकांपासून दुरावत गेली. 'वर्गशत्रूशी युद्ध' याचा अर्थ individual annihilation असा लावला गेला. शिवाय एवढ्या

**अनाठायी घाई चळवळीला नडली हे आज त्यांचे नेतेही मान्य करतात.**

रक्तपाताची पर्वा न करण्याइतपत लोकक्षोभाचा उद्रेक क्रांतिकारकाना घडवून आणता आला नाही. नक्षलवादी नेते आपल्या केडर्सचा व अगदी स्वतःचा सुद्धा पोलिसाच्या कचाट्यात सापडण्यापासून बचाव करू शकले नाहीत. अपुरे सख्याबळ, अपुरी व मागासलेली शस्त्रास्त्रे, मुक्त संरक्षणक्षेत्राचा अभाव, सर्व थरातील जागृत लोकमताच्या पाठिंब्याचा अभाव, लढ्याला पडलेल्या दुर्गम भूमीच्या जगलाच्या मर्यादा, गनिमी युद्धपद्धतीचा अपुरा अवलंब आणि नेत्याची व अनुयायाची झालेली सरसहा अटक वा कत्तल अशा परिस्थितीत चळवळीचे पानिपत होऊ नये तर दुसरे काय व्हावे ?

नक्षलवाद्याना आपल्या चुका आता उमजल्या असल्या तरी आता त्या सुधारून पुन्हा मूळपदावर यायचे व नव्याने चळवळ उभारायची तर मोठीच ताकद हवी. अंतर्गत दुहीने पोखरलेली चळवळ ही ताकद कशी उभी करू शकणार आहे ? समान उद्देशाने क्रातीची वाटचाल करू पाहणाऱ्यामधली ही बजबजपुरी खेदकारक आहे. त्याच्यातले निरनिराळे लहानमोठे गट एकमेकाशी शत्रुत्व करण्यात जेवढी शक्ती वाया दवडीत आले आहेत तेवढी वाचवून एकत्र केली तरी निम्मीशिम्मी क्रांती होऊन जाईल ! चारु मुजुमदारपासून अनेक नक्षलवादी नेते सदैव कुठल्या ना कुठल्या गैरसमजुतीच्या सोयिस्कर भ्रमाच्या कैफात राहत आले आहेत. उदाहरणार्थ 'लोक आपल्यामागे आहेत' ही एक जुनी कल्पना– १९६७ ला उद्भवलेली आणि १९७० अखेर खोटी ठरलेली. कुठल्याही देशातल्या क्रातिकारकाना परवडणार नाहीत अशा चुका या मंडळीनी गेल्या दहा वर्षांत केल्या आहेत आणि त्या सरसकट व नेटाने सुधारण्याखेरीज चळवळीला भवितव्य नाही.

## नक्षलवादाची चीनची शाज

नक्षलवादाच्या चिकित्सेमधला आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे त्यांचा आंतरराष्ट्रवाद किंवा राष्ट्रवाद (Nationalism and Internationalism) यांची त्यानी घातलेली तथाकथित सांगड.

नक्षलवादी चळवळीच्या प्रारंभापासूनच तिच्यावर देशद्रोहाचा आरोप होत आलेला आहे. 'चीनच्या तालावर नाचणारे' अशी नक्षलवाद्याची संभावना अनेकवार झाली आहे. विशेषतः 'माओ आमादेर चेरमान' किंवा 'चीनचा अध्यक्ष तो आमचा अध्यक्ष' या घोषणेमुळे वरील आरोपाना जोर चढला. (अर्थात अशा घोषणा हा चळवळीतला दुर्दैवी अतिरेक होता असे आज CPI (ML) चे नेते मान्य करतात; पण आता उशीर झाला आहे हे एक व CPI (ML) सुद्धा चीनचे गोडवे गाण्यात यत्किंचित मागे नाही हे दुसरे.) आज अशा घोषणा होत नसल्या तरी 'The Great & Glorious Communist Party of China' अशा संबोधनासह त्याना CPI (ML) कडून गौरवपत्रे जाणे चालूच आहे. तेग सियाओ पिंगच्या हकालपट्टी–प्रकरणात CPC ला असेच अनाहूत प्रशस्तिपत्र पाठवून CPI (ML) ने आपले हसे करून घेतले. गमत म्हणजे या प्रवृत्तीबद्दल CPC कडूनच नक्षलवाद्याना कानपिचक्या मिळाल्याचीही उदाहरणे आहेत. 'माओ आमादेर चेरमन' ही घोषणा गाजत असताना याचे एक शिष्टमंडळ चीनला गेले होते. तेव्हा खुद्द चाऊ एन् लाय यानेच भारतीय लोकमानस दुखविणारी ही घोषणा रद्द करा असा सदेश शिष्टमंडळाला दिला, कारण या घोषणेमुळे अपमान मानून चळवळीपासून लोक दूर जाण्याचा धोका नक्षलवाद्याना नाही तरी चाऊ एन् लायला दिसत होता.

विशेष म्हणजे नक्षलवादाचे विरोधक ज्याला त्याचा देशद्रोह असे म्हणतात, सर्वसाधारणपणे त्यालाच नक्षलवादी आतरराष्ट्रवाद असे नाव देतात. 'आम्ही एकाच वेळी राष्ट्रवादी व आंतरराष्ट्रवादी असून आमचा आतरराष्ट्रवाद राष्ट्रवादाला विरोधी नसून पूरक आहे' असे समर्थन एका प्रमुख CPI (ML) विचारवंताने आमच्यापाशी दिले. 'आमची चळवळ प्रथमपासून आजपर्यंत चीनवर अवलंबून राहिलेली नाही. इतर राष्ट्राकडून आम्ही मदत, पैसा, शस्त्रे वगैरे घेत असतो तर आमच्यावर असे चिरडले जाण्याची पाळी का आली असती ? आजही आमची चळवळ आम्हीच चालवितो. CPC कडून आदेश वगैरे येत नाहीत. आम्हाला CPC बद्दल आदर वाटतो हे खरे आहे; पण तो एवढ्याचसाठी की जी क्राती आम्हाला इथे करायची आहे ती क्राती व तदनुषंगिक शासनव्यवस्था CPC ने त्याच्या देशात यशस्वीपणे राबवून दाखविली आहे. एक क्रातिकारी आदर्श उदाहरण म्हणून आम्ही त्याच्याकडे पाहतो. मालक म्हणून नव्हे.'

हा युक्तिवाद तात्त्विक व तात्रिकदृष्ट्या पटण्यासारखा आहे; पण व्यवहाराचे काय ? तर एक राष्ट्रवादी चळवळ म्हणून आपली प्रतिमा उभी करण्यात नक्षलवादाला कधीच यश मिळालेले नाही. वरील समर्थनाला वस्तुस्थितीचा पुरेसा आधार आजपर्यंत मिळालेला नाही. आमच्या मतानुसार नक्षलवाद्यानी आपल्या तथाकथित आतरराष्ट्रवादाचे जरा जादाच स्तोम माजवून ठेवले आहे. त्याचा हा आतरराष्ट्रवाद स्वतःच्या फिकिरीत पडलेल्या भारतीय जनतेला 'आपला' वाटत नाही आणि ही गोष्ट त्याच्या लक्षात येत नाही. अल्बानिया व चीनचा मधुचंद्र का संपला किंवा सोविएत सोशल इंपीरिॲलिझमच्या क्रातिद्रोही कारवायाचा मुकाबला CPC कसा करीत आहे किंवा साम्यवादाचा विजयी अश्व जगभर चौखूर उधळताना सध्या कुण्या मुक्कामी अडला आहे, यात प्रचंड स्वारस्य वाटणाऱ्या चळवळीत भारतीय लोकमानसाला स्वारस्य वाटत नाही ही गोष्ट नक्षलवाद्याना किंवा एकूणच साम्यवाद्याना उमजली आहे असे त्याच्या भाषण-लेखन-प्रचारावरून तरी वाटत नाही. नक्षलवाद्याची निष्ठा भारतीय जनतेपेक्षा जागतिक साम्यवादी चळवळीच्या ठायी अधिक आहे असाच ध्वनी त्याच्या (खाजगी) प्रकाशनातून उमटतो आणि अगदी व्यवहाराच्या भाषेत बोलायच तर आपल्या घराच्या चार भिंतीसुद्धा एकत्र ठेवता न येणाऱ्यानी आधी ते सुधारायचं सोडून जगाच्या उठाठेवी अनाठायी उत्साहान का कराव्यात ?

साध सत्यनारायण सिगचं UCCR च्या प्रमुखाला पाठवलेलं पत्र पाहिलं, तर त्या प्रमुखान उपस्थित केलेल्या प्रश्नाना सरळ उत्तर देण्याऐवजी सत्यनारायणसिग माओचे उद्धरण देतो. मग या सत्यनारायणसिंगमध्ये आणि 'असं का ?' या प्रश्नाला 'कारण हे वेदात सागितलेलं आहे' अस सागणाऱ्या कोणत्याही डोकं खरवडलेल्या ब्राह्मणात मूलभूत फरक काय ? जेव्हा माझी स्वतःची पटवायची क्षमता सपते तेव्हा मी अधिकाराचे हवाले देऊन सुटू पहातो.

'आम्ही CPC चे हुजऱ्ये नाही', अस नक्षलवादी वजावून सा-

तात. मग त्यांच्या प्रकाशनातून CPC चा अमा अखंड नामगौरव कशासाठी चालतो? चिनी क्रांतीकडे आदर्श म्हणून पाहणे आणि महिन्याच्या महिन्याला त्याची मिळेल त्या कारणासाठी भलावण करणे यात काहीच फरक नाही काय? उदाहरणार्थ '१९६२ चे चीन-भारत युद्ध हे चीनच्या आक्रमणापेक्षा भारताच्या विस्तारवादी धोरणातूनच उद्भवले' असे नक्षलवादी अजूनही ठासून सांगतात: त्याच्या समर्थनार्थ काही पुरावे वगैरेही देतात. हा दावा ऐतिहासिक दृष्ट्या सत्य आहे की असत्य हा वाद घालण्याचे हे स्थळ नव्हे; पण भारतीय राष्ट्राने व जनतेने तो असत्य मानला आहे. आता नक्षलवादी सत्य सांगून जनतेची सहानुभूती व राष्ट्रवादित्वाचे आवरण गमविणार की भारतीयांच्या सुरात सूर मिसळून CPC चा पाठिंबा गमाविणार? त्यांनी पहिला पर्याय निवडलेला दिसतो. त्यालाही हरकत घेतली नसती, पण त्यांनी तो सत्याच्या प्रेमाने स्वीकारला का चीनच्या भक्तीमुळे स्वीकारला? सत्याच्या प्रेमाने स्वीकारला म्हणावे तर एरवीच्या व्यवहारात नक्षलवाद मोठा सत्याचा पुजारी असल्याचे पुरावे कुठेच नाहीत. चंबळच्या दरोडेखोराप्रमाणे नक्षलवादी नेत्यांनी आधुनिक साधु-संतांना शरण जाऊन सदैव सत्यानेच वागण्याची भीष्मप्रतिज्ञा केल्याची नोंदही कुठे आढळत नाही. बरे, भारताचे भूतान-सिक्कीमबद्दलचे धोरण विस्तारवादी असले तर चीनचे तिबेट-मंगोलिया-तैवानविषयक धोरण काय संक्षेपवादी म्हणायचे? तथापि नक्षलवादाने त्या धोरणाची सत्याला स्मरून कुठे निंदा केल्याचे तर स्मरत नाही. मुळात राष्ट्राच्या व्यवहारातले सत्यासत्याचे हिशेब व्यक्तिगत हिशेबापेक्षा निराळे असतात हे काय नक्षलवाद्यांना ठाऊक नसेल? पण त्यांच्या या भलत्या ठिकाणच्या (out of place) सत्यवादित्वामुळे त्यांनी आपल्या राष्ट्रवादित्वाबद्दल जनतेच्या मनात कायमचा संशय निर्माण करून ठेवला आहे. समजा उद्या भारतात साम्यवादी शासन आले तर राष्ट्रीय भूमी किंवा अन्य कोणत्याही प्रकारची राष्ट्रीय संपत्ती यांच्या संबधात ते स्वामित्वपूर्ण (possessive) भूमिका घेणार आहे की नाही?—लोकांच्या मनात ही शंका उद्भवल्यास नवल नाही. (जाता जाता, नक्षलवाद्यांनी हेही लक्षात घ्यायला हरकत नव्हती की त्यांना अभिप्रेत असलेल्या क्रांतीचा आदर्श घालून देणाऱ्या चीननेही राष्ट्रीय प्रश्नावर सदैव आक्रमक पवित्राच स्वीकारला आहे. 'जय जगत' बाद नव्हे).

### नक्षलवादाचे महत्त्व

अशा रीतीने आपण नक्षलवादाच्या शोधात अशा एका टप्प्याप्रत पोचलो आहोत की जेथून नक्षलवाद छोटा दिसावा; पण त्याच वेळी ती लोकांची चळवळ आहे हे महत्त्वाचे आहे. क्रान्ती संपली हा अन्तर्विरोध असतो. क्रान्ती ही प्रक्रिया कायम चालू असते. आज क्रान्ती संपली आणि उद्या नवी विटी नवे राज्य सुरू झाले असे होत नाही. ही चळवळ तिच्या गुण-दोषांसकट चालू आहे कारण ती एक प्रक्रिया आहे. भारतीय जनतेची व्यक्तिपूजेची हाव लक्षात घेता तिला वादातीत व्यक्तिमत्त्वाचा नेता लाभणे, किमान जबर सामर्थ्याचे एक नेतृमंडळ नेतृत्व म्हणून लाभणे आवश्यक आहे. देशाच्या बारा राज्यामध्ये चळवळ पसरलेली आहे असे नक्षलवाद्यांचे म्हणणे आहे. त्यापेक्षा ती किती राज्यात रुजली आहे हे महत्त्वाचे आहे. खोली वाढणे हे विस्तार वाढण्यापेक्षा महत्त्वाचे असते.

भारतामध्ये समाजाचे निश्चित ध्रुवीकरण नाही व ते केले गेल्यास त्यातील आज एकमेकात मिसळलेल्या सीमा स्पष्ट करणे हे फार चिकाटीचे व कौशल्याचे काम आहे. त्याच्यायोगे स्फोट घडविणे हा प्रश्न नंतर येतो, पण २५० रुपये पगार असणारा बंगाली कारकून घरी बाजारहाटाला बिहारी नोकर ठेवतो आणि हा बिहारी नोकर घरी गेल्यावर आणखी एका 'नीच जात' वाल्याकडून अंगाला मालिश करून घेतो त्याच्याशी मालकाच्या मगरुरीने वागतो यात कामगार कोण आणि भांडवलदार कोण?

दुर्दैवाने नक्षलवाद इथे अपुरा पडतो. शेवटी भविष्यावर विश्वास ठेवणेच कितपत योग्य असते याबद्दल आम्ही साशंक आहोत; पण वर्तमानातील प्रश्न नक्षलवाद सोपे करण्याऐवजी अवघड करतो आहे. भारतीय परिस्थितीचे विश्लेषण जिथे अतिशय गुंतागुंतीचे वास्तवात आहे, तिथे ते फार सोपे over simplification करतो आहे ही गोष्ट खटकते

पण ही चळवळ गरीबाची आणि भुकेलेल्यांची म्हणवते. ती जर तसे म्हणत असेल तर ती देशद्रोही असू शकत नाही. किमान या गोष्टी तरी आता स्पष्ट व्हायला हव्यात. इतकेच नव्हे या चळवळीचे पुढे सरकणे (भारतीय सन्दर्भात ती आणखी dilute होणार असा आमचा अंदाज आहे) किंवा राजकीय परिभाषेत अस्सल डाव्या शक्तीचे एकत्र येणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. रावणाऱ्याला हात खाण्यासाठीसुद्धा असतात हे अनुभवास आणून देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

म्हणूनच चळवळीचा परामर्श घेताना हिंसा कोणी केली नाही की तिची प्रतिक्रिया येणार नाही? हा प्रश्न उपस्थित होतो. राम मनोहर लोहियांनी म्हटल्याप्रमाणे या सरकारचे हातच खुनी होते.


## वर्गणीदारांस सूचना

१: अंक न मिळाल्याची तक्रार अंक प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवस वाट पाहून करावी अंक शिल्लक असल्यास दुसरा दिला किंवा पाठवला जातो.

२: वर्गणी पाठविताना किंवा पत्रव्यवहार करताना कायमी वर्गणीदार क्रमांकाचा उल्लेख करावा. अन्यथा पत्रोत्तरास विलंब अपरिहार्य आहे.

३: तीन वर्षांची वर्गणी १००/– रुपये आहे.

४: रु. ३००/–ठेव ठेवल्यास व्याजाचे मोबदल्यात अंक विनामूल्य पाठविला जातो.

तेव्हा प्रतिक्रिया होणे स्वाभाविक होते. हिंसा हा चळवळीतला आज एवढा बाऊ करण्याइतका गुणक राहिलेला नाही. (हे मत आन्ध्र नक्षलवादापुरतेच मर्यादित. बंगाल वा इतर भारतीय संदर्भात पुढे कधी तरी पाहू), तो तसा राहणार नाही. कारण safety valves फार आहेत.

प्रत्यक्षात भारतीय राजपटलावर कोणते परिणाम रेखाटले गेले ते पाहिले म्हणजे चळवळीचे मूल्यमापन होईल.

### वस्तुनिष्ठ मूल्यमापन

१) १९६७ पासून जमीनवाटपाचा प्रश्न प्रथमच तीव्रतेने जाणवला. नतर विभिन्न राज्यानी कमाल जमीन धारणा कायदे केले. २) त्याचबरोबर आदिवासी आणि शेतमजूर यांच्या प्रश्नाकडे मोठ्या भागाचे लक्ष तातडीने वेधले गेले. ३) विरोधी पक्षांनी जमीन बळकाव योजना सुरू केली. ४) कृषिपुनर्रचनेविषयी नवीन बिले संसदेत आली. ५) सामाजिक दृष्टचा वर्गविश्लेषण खऱ्या अर्थाने सुरू झाले. खरे शत्रू कोण व ते काय स्वरूपात आहेत हे दाखविले गेले. विशेषत. कॉम्प्रादोर बूर्ज्वाझी हा गट दाखवून साम्राज्यवाद देशाबाहेरच नाही तर देशातही असल्याचे निदर्शनाला आणून देण्यात आले ६) सोविएट साम्राज्यवादाच्या स्वरूपावर प्रकाशझोत पाडण्यात आला. ७) भारतीय इतिहास नव्या दृष्टीने पाहिला गेला. ८) सुन्दरय्या, राजेश्वर राव यांनासुद्धा दखल घेणे भाग पडले आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, ९) एक पक्ष असा आहे की जो सत्तेसाठी झगडत नाही हे लोकांच्या लक्षात आले.

मात्र आमच्या मते या देशात इतके प्रवाह आले त्यातीलच हा एक प्रवाह आहे. त्याचे सामर्थ्य वाढेल, वाढविले पाहिजे.

त्याच वेळी चळवळीकडे निरीक्षकांनी लक्ष देऊन व चळवळीत असणाऱ्यांनी आत्मपरीक्षण करून चुका सुधारल्या पाहिजेत. कारण चुका मूलतः आजवर सुधारल्या गेल्या नाहीत.

आताच म्हटल्याप्रमाणे फक्त मार्क्स, लेनिन व माओ यांच्या तत्त्वज्ञानाच्या बेरजेने इथली क्रान्ती वाढणार नाही. आजचा नक्षलवाद दुर्दैवाने या त्रिमूर्तीच्या तत्त्वज्ञानाच्या बाहेर नाही. त्याच्या कक्षा हळूहळू रुंदावतील. त्याशिवाय त्याला mass support मिळू शकणार नाही. आजचा नक्षलवाद पूर्णतः मार्क्सिझम, लेनिनिझम व माओइझम पण हा देश भारत आहे. इंग्लडमधील परिस्थिती (१८४८ मधील) रशियाची परिस्थिती व चीनची परिस्थिती याची बेरीज नव्हे.

इथले गणित निराळे आहे. त्याची उत्तरे निराळी आहेत त्याची पद्धत निराळीच असणार हे लक्षात न ठेवता आंधळेपणाने अनुकरण केले गेले. अगदी आम्ही डोळस म्हणून केले गेले आणि परिस्थितीने हिसका दाखविला. चळवळ अडखळली.

यामुळे काय होते ? सच्च्या क्रान्तिकारकाचा तेजोभंग होतो. अटळ भविष्यही पुढे ढकलला जातो. अज्ञानामुळे चळवळीची हानी होते पण प्रामाणिकपणाही कोणत्या तरी दरबारात मुजरे घेतोच. जाळणारी पोटाची आग 'मरायचं' एवढाच पर्याय ठेवते तेव्हा नक्षलवाद 'मारून मरू' एवढा पर्याय सुचवील. आणि सगळे 'वाद' भस्मसात् करणारा असतोष जेव्हा आरामखुर्चीवरून लेखाचे पठण करून बौद्धिक समाधान मिळविणाऱ्यांच्या दारापर्यन्त येईल तेव्हा काजळी उडालेली खरी क्रान्ती या देशात अवतरेल !

आणि तेव्हा नक्षलवाद इतका लाल नसेल.

## स मा प्त





**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**

## पुस्तके

# अंधारातील एक प्रकाश !

### एक धावती ओळख

'अंधारातील एक प्रकाश'

हा कोणता प्रकाश आणि हे कोणत्या व्यक्तीसंबधी पुस्तक आहे हे आजच्या काळात तरी मुद्दामहून कुणाला सांगायला नको.

गेली सहा-सात वर्षं जयप्रकाश नारायण राजकीय रंगमंच नव्यानं गाजविताहेत स्वातंत्र्यपूर्वकाळात ते जसे तत्कालीन तरुणाचे लाडके नेते बनून गेले होते तसे ते आजही स्वातंत्र्योतर पिढीतल्या तरुणाचे लाडके नेते बनून गेले आहेत; पण आज या आपल्या आवडत्या नेत्याचं पूर्वचरित्र मात्र फारच थोडया तरुणांना ठाऊक आहे. किंबहुना त्याच्या मते जयप्रकाशाचा जन्मच मुळी १९७४ साली झाला. भारतकुमार राऊत याच 'अंधारातील एक प्रकाश' हे पुस्तक या अशा तरुणासाठीच लिहिलेलं आहे.

स्वातंत्र्यपूर्वकाळातही जयप्रकाश नारायण आजच्याइतकेच एक बडखोर सेनानी होते. या एका (मुद्दामहून विसरण्यात आलेल्या) सत्याची ओळख- खर म्हणजे साक्षात्कारच, हे पुस्तक वाचून तरुणाना व्हावा.

स्वच्छ, सरळ, सुबोध आणि प्रामाणिक भाषेत हे पुस्तक लिहिल असल्यान आणीबाणीनतर प्रसिद्ध झालेल्या गॉसिप्सनी भरलेल्या सवंग, गल्लाभरू आणि तथाकथित खळबळजनक राजकीय पुस्तकापेक्षा ते खूप वेगळं आहे

पण या छोटया चरित्रात्मक पुस्तिकेचं वेगळेपण इथंच संपुष्टात येतं. चरित्र लिहिताना शक्य तितक तटस्थ अ-साहित्यिकी लेखन कराव हा लेखकाचा अट्टाहास दिसतो. या चमत्कारिक अट्टाहासामुळं ते अत्यंत नीरस आणि कमालीच रुक्ष बनलं आहे. उबग यावी अशी शैलीहीनता. त्यामुळं पुस्तक वाचताना आपण एखाद सरकारी क्रमिक पुस्तक वाचतोय अस वाटत राहत. पुढं-मागं हे पुस्तक खरोखरच एक क्रमिक पुस्तक म्हणून शालेय अभ्यासक्रमास ठेवलं जाईल अशी भीतीही मला वाटते. लेखकाचाही तसा काही हेतू नसावा ना ?

पुस्तकात जी काही किंचित रजकता आहे ती जयप्रकाशाच्या जीवनातल्या रजक आणि थरारक प्रसंग आणि उलथापालथीमुळं आलेली आहे. अर्थात कोणत्याही चरित्रात्मक पुस्तकांत मुद्दामहून पदरची रजकता आणायचा कुणी प्रयत्न करू नये; पण मुळातलीच रजकता किंवा थरारकता वाचकापर्यंत पोहोचेल अशा पद्धतीन माडण असा लेखकाचा नेहमीच प्रयत्न असावा. कारण रजकताच वाचनीयता निर्माण करते आणि चरित्रात्मक पुस्तकात ती एक आवश्यक गोष्ट असते.

भारतकुमार राऊत यांनी तसा काही प्रयत्न केल्याचही आढळत नाही. मुद्दामहून रजकतेकडे झुकून काहीबाही खरडण्याचा प्रकार जसा वाईट तसा रजकतेपासून मुद्दामहून दूर पळण्याचा प्रकारही वाईट.

चरित्रलेखकान फार भावनाप्रधान होऊन लिखाण करू नये; पण त्याचबरोबर जाणूनबुजून भावनाशून्यतेची भूमिका स्वीकारून नीरस चित्रण करू नये.

व्यक्तीच्या जीवनतील चढ-उतारांची नोंद आणि त्याच्या गुण-दोषाच वर्णन यापलीकडे जाऊन चरित्र लिहिताना लेखकान स्वत चं भाष्य करावं की करू नये हा वादाचा मुद्दा आहे; पण चरित्र- मग ते कितीका छोट असेना- केवळ एखाद्या व्यक्तीच्या यश-अपयशाच्या नोंदी आणि एकतर्फी गुणगान यानी भरलेल असू नये हे आता सर्वमान्य झालय. 'अंधारातील एक प्रकाश' हे भारतकुमार राऊत याचं पुस्तक नेमका हाच एकतर्फी मार्ग चोखाळताना आढळते. पुस्तकातलं जयप्रकाशजीच स्वभावचित्रण उथडच एकसूरी आणि एक पक्षी आहे. त्यामुळ त्याच स्वरूप प्रचारकी पुस्तकाहून फार निराळं नाही.

पण लेखकान कुठेही इतिहासाशी अप्रामाणिकपणा केलेला नाही. कोणताही प्रसग तिखट-मीठ लावून अतिरंजितपणे वर्णन केलेला नाही. खोटेनाटे संदर्भही दिले नाहीत. त्यामुळं हे पुस्तक थेट प्रचारकी पुस्तकात जाऊन बसत नाही एवढं निश्चित.

जयप्रकाश नारायणाच कौटुंबिक चित्र संपूर्ण पुस्तकात कुठही उभ राहात नाही. पुस्तकाचा आकार आणि व्याप्ती पाहाता (एकूण पृष्ठसख्या ६८) हेही एक वेळ क्षम्य मानता येईल; पण जयप्रकाशजीच्या राजकीय जीवनाचही पुरेस तपशीलवार चित्रण नाही.

जयप्रकाशाच्या भूमिगत चळवळीसंबधीचं वर्णन लेखक 'भूमीगत चळवळीना पुन्हा ऊत आला. जयप्रकाशाचे भारतभ्रमण पुन्हा सुरू झाले.' अशा दोन ओळीत आटोपतो.

जयप्रकाशजीचे वडील सुखवस्तू सरकारी नोकर. त्याच्या आणि जयप्रकाशजीच्या विचारसरणीत महद् अतर असणार; पण पितापुत्राचे सबध आणि त्याच्यातला सघर्ष पुस्तकात उल्लेखलाही जात नाही. जयप्रकाशजीच्या मातोश्री, त्याचे थोरले बंधू, पत्नी- इत्यादीशी त्याचे असलेले संबधही नीटपणे व्यक्त झालेले नाहीत. जयप्रकाशजीची समाजकारण, राजकारण यावरली मतं, त्यांचा व्यासग इत्यादीविषयी तर मौनच.

मग लेखक देतो काय-तर एकापाठोपाठ एक घटनाची जत्री आणि त्याला अनुसरून त्याची थोडी राजकीय पार्श्वभूमी. देशाच्या स्वातंत्र्याचा आणि विकासाचा ध्यास घेतलेला एक तरुण. आपला मृदू स्वभाव आणि प्रामाणिक तळमळ याच्या जोरावर अनुयायी जमवितो आणि आपल कार्य सिद्धीस नेतो. एवढया सरळ रेषेत काही जयप्रकाशांचं आयुष्य सरकलेल नाही. १९७४ च्या त्याच्या आंदोलनाला यश मिळाल नसत तर एक अपयशी माणूस म्हणूनच ते आज ज्ञात असते-किंवा कदाचित 'देशद्रोही' म्हणून 'प्रसिद्ध'ही असते. पुस्तकात हा महत्त्वाचा विचार आणि मुद्दा कुठेच व्यक्त होत नाही. किंबहुना पुस्तकात कोणत्याही एका विचारावर बारीकशी देखील चर्चा नाही. महत्त्वाचे प्रसग आणि घटनाची वर्णनदेखील टाळली आहेत. वाचकानी त्या प्रसंगाविषयी त्याला

आधी ठाऊक असलेली माहिती लक्षात घेऊन ते प्रसंग वाचावेत असा काही तरी प्रकार लेखकाला बहुधा अभिप्रेत असावा.

१९७४ चं आंदोलन जयप्रकाशजींनी कसं सुरू केलं, तरुणांनी एकजूट कशी बांधली, सुरुवातीला त्यांच्या आंदोलनासंबंधीच्या काय कल्पना होत्या. त्यांच्या यशासबंधी काय आडाखे होते हे जाणून घ्यायला लोक उत्सुक आहेत; पण लेखक हा महत्त्वाचा प्रसग कसा उरकून घेतो पहा–' १९७४ च्या जानेवारी महिन्यातल्या पहिल्या आठवड्यातच त्यांनी आंदोलनाला सुरुवात केली. वाराणसीमध्ये विद्यार्थ्यांच्या एका विराट सभेत जयप्रकाशांनी आवाहन केले की, विद्यार्थी आणि युवकांनी एकजूट करून लोकशाही संस्थांचे रक्षण करावे. हे विधायक कार्य समजून त्याकरिता झटावे. '

तर ही अशी आटोपशीरता (!)

१९७४ ते १९७७ हा जयप्रकाशजींच्या आयुष्यातला तेजस्वी कालखड. आपल्या ६८ पानी पुस्तकात १३–१४ पानात हा कालखंड आटोपून घेतला आहे. हा कालखंड लोकांच्या चागल्या परिचयाचा आहे म्हणून असावं कदाचित; पण याही काळात जनतेसमोर अद्याप न आलेल्या अशा अनेक गोष्टी आहेत; पण सदर पुस्तकात जयप्रकाशांच्या जीवनक्रमाच्या थोड आत जाऊन किंवा थोडं बाहेर जाऊन काही लिहिण्याची वृत्तीच आढळत नाही.

सदर्भ-ग्रथ म्हणून लेखकाने ज्या सहा पुस्तकांची नाव दिली आहेत त्यात ' जे. पी. ' हे डॉ. अमरनाथ सेठ यानी लिहिलेलं जयप्रकाशाच हिंदी चरित्र आहे सदर पुस्तकाचा लेखकाला किती उपयोग झाला माहीत नाही; पण हे पुस्तक त्या हिंदी चरित्राचाच थेट अनुवाद असला तर मात्र पुस्तकातले गुण-दोष हे त्या हिंदी पुस्तकाचे गुण-दोष ठरावेत.

ते असो. आजच्या सनसनाटीपूर्ण पुस्तकांच्या गर्दीत मात्र तसल्या सनसनाटीपणाचा अभाव असलेलं हे साधसुधं प्रामाणिक चरित्र उठून दिसेल आणि त्रोटक निवेदनपद्धतीन ते एखाद्या ' बायो-डेटा 'प्रमाणे वाटत असलं, तटस्थ लेखनपद्धतीनं त्यात रुक्षपणा आला असला तरी सरळमोट निवेदन ही आज साहित्यक्षेत्रातली एक दुर्मिळच गोष्ट आहे.

पुस्तकाच्या शेवटच्या परिच्छेदात मात्र लेखकाला तटस्थतेचं हे ' बेअरिंग ' साभाळता आल नाही शेवटच्या वाक्यात तर ते पूर्ण कोसळून पडतं.

पण कसंही असल तरी आणि जयप्रकाश नारायण यांचं चरित्र म्हणून फारस मोलाचं नसलं तरी जयप्रकाशांची एक धावती ओळख म्हणून ' अंधारातील एक प्रकाश ' हे आजच्या पिढीला उपयुक्त अस पुस्तक आहे.

नाही तरी अविरत परिश्रम आणि सखोल अभ्यास करून लिहिलेले प्रचंड ग्रथराज वाचतोय कोण आजकाल !

—अवधूत परळकर

**अंधारातील एक प्रकाश**
ले. भारतकुमार राऊत.
प्रकाशक . वि गो. धुरी, मुंबई.
पृष्ठे ६८, कि ४ रु

---

# आमचे ग्रंथालय

## The Loch Ness Story

**By Nicholas Witchell**
**Penguin Books,**
**pages 156, Pence 70**

---

Loch म्हणजे Lake. हे लेक स्कॉटलड मध्ये Inverness–shire येथे आहे. सॅलेडॉनियन कॅनॉलचा एक भाग म्हणजेच Loch Ness. लॅक नेस अत्यंत सखोल आहे व त्याच्या बाजूला पर्वतांच्या रांगा आहेत. सन १९३३ मध्ये लॅकनेसमध्ये एक ४०-५० फुटांचा अजस्त्र प्राणी दिसला होता यानंतरसुद्धा पुष्कळ वेळा या प्राण्याचे दर्शन काही लोकाना झालं या प्राण्यालाच लॅकनेस मॉन्स्टर, नेसी वगैरे नावे आहेत. आपल्या हिमालयात जशा 'येती विषयी बऱ्याच आख्यायिका आहेत तशाच या लॅकनेस प्राण्याविषयी भरपूर आख्यायिका आहेत हिमालयाच्या ' येती 'सारखाच हा लॅकनेस प्राणी चकार, शक्कल लढविणारा आहे. कधीकधी हे दोन्ही प्राणी पकडले जातील अशी आशा संशोधकाना वाटते आणि त्यानंतर लगेच हे प्राणी कित्येक महिने किंवा वर्षानुवर्षे दडी मारून बसतात ! हिमालयातील येतीच्या पायाच्या ठशाचे तर मापसुद्धा घेतले गेले होते. या ठशावरून येती ९–१० फूट उंच असावा असा काही शास्त्रज्ञांनी कयास बांधला होता; परंतु हा लॅकनेस प्राणी तर भलताच अजस्त्र आणि चमत्कारिक आहे. नॅसीची मान उंटासारखी लांब तर त्याची शेपटी अजस्त्र अजगराइतकी आहे. त्याचे पाय अगदीच आखड व जाड आहेत. तो धड सरपटणारा प्राणीही वाटत नाही व धड उंटासारखाही वाटत नाहत. उंटासारखी मान तर त्याला आहेच; पण उंटासारखे दोन कोकही ( humps ) त्याला आहेत. पाण्यात पोहताना *हा प्राणी स्वतःचे शरीर आकसून सैल करीत* असेल म्हणून कोक दिसतात की काय असा काही जणाचा समज आहे. लॅकनेस मधून कधीकधी धूसर प्रकाशात त्याची लांबच लांब मान तेवढी बाहेर दिसे.

सन १९७५ मध्ये तर लॅकनेसमध्ये एकदम सॉफिस्टिकेटेड व सेन्सिटिव्ह कॅमेरे ठेवण्यात आले. या कॅमेऱ्याच्या कक्षेत हा प्राणी आला व त्या फिल्मस् कडेकोट बदोबस्तात अमेरिकेत पाठविण्यात आल्या. शास्त्रज्ञानी त्या फिल्मस् पाहिल्या. या शास्त्रज्ञाचे नॅसीबाबतचे निष्कर्ष या पुस्तकात दिले आहेत.

नॅसीविषयी आख्यायिका तशा १४०० वर्षांच्या जुन्या आहेत. काही हौशी व्यक्तींनीसुद्धा नॅसीचे फोटो काढले आहेत. त्याबद्दलही निकोलस विचेलने या पुस्तकात माहिती दिली आहे. आमच्या वाचनालयात ' सुपरनेचर ' व ऑकल्टिझमवर बरीच पुस्तके आहेत. काही मोठे वाचक ही पुस्तके अगदी लहान मुलाच्या उत्सुकतेने वाचतात ! अॅटलांटिसचा बुडालेला खड, परग्रहावरचे जीवन, येती, नेसी, फ्लाईंग सॉसर्स, इजिप्तचे पिरॅमिडस् वगैरे असख्य विषय या पुस्तकात आहेत. ही असली पुस्तके वाचताना आपले स्वतःचे अस्तित्व किती किरकोळ आहे याची जाणीव आपल्याला होते. व त्या किरकोळ अस्तित्वाला आपण घटकाभर विसरून थोडा वेळ वेगळ्याच विश्वात वावरू लागतो. जगातल्या किती तरी गूढ व अगम्य गोष्टी-

पुढे आपण नतमस्तक होऊन जातो.

प्रस्तुत पुस्तकाचा लेखक निकोलस विचेल याचा जन्म १९५३ मंध्ये श्रॉपशायर, इंग्लंड येथे झाला व या पुस्तकाची पहिली आवृत्ती १९७४ मध्ये निघाली. म्हणजे विचेल त्या वेळी अवघा २१ वर्षांचा होता. या वयात एवढे अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिणे हे खचितच कौतुकास्पद आहे.

एकदा तर या प्राण्याच्या अस्तित्वाविषयी इतकी माहिती व इतके पुरावे मिळाले की या प्राण्याला धरण्यासाठी एक मोठा पिंजरा-सुद्धा तयार करून ठेवला होता !

आपली पृथ्वी ही आतून पोकळ आहे व भूगर्भात परग्रहावरचे वेगळेच लोक वावरत आहेत असा दृष्टिकोन काही लोकानी व शास्त्रज्ञानी मांडलेला आहे. हा नॅसीसुद्धा लॅकनेसच्या तळघातील एखाद्या भूभागात लपून बसत असेल म्हणून त्याचा थागपत्ता लागत नसेल असे मी एका नियतकालिकात वाचले होते. UFOs ( Unindentified Flying Objects ) सुद्धा भूगर्भात ठेवले गेले आहेत असे एका लेखकाने म्हटले होते

टीम डीन्सडॅल या गृहस्थाने नेसीचा शोध लावण्याचे आपल्या जीवनाचे एक मिशनच करून ठेवले आहे. त्याने एकदा १९६० मध्ये लॅकनेसची एक फिल्म घेतली होती. त्यानंतर १९७० व १९७१ मध्ये नेसीच्या डोक्याचे व मानेचे फोटो घेतले होते नॅसी हा बरेच वेळा आपली उंटासारखी मान पाण्याबाहेर काढतो. काही फोटोवरून असे सूचित होते की या प्राण्याला जेव्हा पाण्याखाली जायचे असते तेव्हा तो आपल्या खाद्यावरची पिशवी पाण्याने भरून फुगवतो व त्या वेळेस एकच कोक दिसतो; पण जेव्हा ती पिशवी deflate होते तेव्हा या प्राण्याच्या पाठीवर दोन तीन कोक दिसू लागतात;' नॅसीचे तोंड सापासारखे वाटते; पण आतापर्यंत त्याचे डोळे, ओठ किंवा दात कुणी पाहिल्याचे ऐकिवात नाही. त्याचे कानही कुणी पाहिले नाहीत. तथापि नॅसीच्या डोक्यावर गोगलगायीच्या शिंगा-सारखी दोन शिंगे असतात. सौ. ग्रेटा फिनले व तिचा मुलगा हेरी यानी नॅसीला फक्त २० मीटर लांबून पाहिले असे ते म्हणतात. त्या वेळेला नॅसीच्या डोक्यावर दोन सहा इच लांब 'शिंगे' होती. या लॅकनेसमध्ये असे एकापेक्षा जास्त प्राणी असतील, असाही एक समज आहे.

हा नॅसी इथे आला कसा ? पृथ्वीवर सुमारे १०,००० वर्षांपूर्वी हिमयुग संपले. त्या वेळेला सर्व बर्फ वितळून समुद्राची पातळी वर आली व सखोल जमिनीत या समुद्राचे पाणी शिरले. हे समुद्रातील प्राणीही लॅक नेसमध्ये असेच घुसले. तेव्हापासून नॅसी नेसमध्ये तळ ठोकून बसला असावा. समुद्राचे पाणी पुन्हा पूर्वीच्या पातळीवर आले तेव्हा नॅसीला लॅकनेसमधून सुटता आले नाही. थोड्या काळानंतर लॅक नेसचा खारटपणा कमी झाला व ते पूर्वीप्रमाणे गोड पाण्याचे सरोवर बनले. पुष्कळ वेळा खाऱ्या पाण्यातले प्राणी गोड पाण्याला अॅडजस्ट करून घेतात. सर्पाकृती मासे (eels) हे स्थलांतर करताना खाऱ्या व गोड्या पाण्यात कसे राहू शकतात हे मी Lyall Watson च्या 'सुपरनेचर' या पुस्तकाचा परिचय करून देताना सांगितले आहेच. आफ्रिकेतील काही सरोवरे एके काळी समुद्राला जोडली गेली होती. पुढे समुद्राशी या सरोवराचा संबंध तुटला व तळघातले पाणी गोड झाले तरीसुद्धा या आफ्रिकेतल्या काही सरोवरात शार्क मासे आढळून येतात. दुसरा असा एक तर्क आहे की, लॅक नेस व समुद्र यामध्ये एक टनेल असावी व त्यातून नॅसी आत येत असावा. लॅक नेसपासून थोड्या अंतरावर लॅक मॉरार म्हणून आहे. या लॅकमध्येसुद्धा नॅसीसारखा प्राणी दिसला होता असे काही लोक म्हणतात.

कॉन्स्टन्स व्हाईट या गृहस्थाने नॅसीला आणखी एक नाव दिले आहे. (आमच्या ग्रंथालयाचे नाव आहे ते ! ) नॅसीला व्हाईटने 'मॉडर्न फिनिक्स' असे म्हटले आहे. 'फिनिक्स' हा इजिप्शियन आख्यायिके-मधला एक पक्षी आहे. तो जेव्हा ५०० वर्षांचा झाला तेव्हा चितेवर जळून गेला व त्याच्या राखेमधून एक नवीन 'फिनिक्स' पक्षी जन्मास आला. मरण व पुनर्जन्म याचे फिनिक्स पक्षी हा द्योतक आहे. मेल्यानंतर राखेतून तो वारंवार जन्माला येतो. नॅसी हा माशासारखा नाही व सरपटणाऱ्या प्राण्यां-सारखाही नाही व इतर कोणत्याही प्राण्यां-सारखा नाही. जर तो सस्तन प्राण्यासारखा (mammalian creature) असता तर त्याला श्वासोच्छ्वासासाठी बराच वेळ वर यावे लागले असते; पण या प्राण्याच्या नाकपुड्या जर डोक्याच्या वर असल्या तर नॅसी फक्त तेवढाच भाग पाण्याबाहेर काढीत असेल !

ज्या लोकांचा असल्या गोष्टींवर विश्वास बसत नाही त्यांना सिलॅकंथ(Coelacanth) या निर्वंश, (extinct) लोप पावलेल्या विचित्र माशाविषयी ऐकले आहे का ? सन १९३८ मध्ये मादागास्करजवळ पाच फूट लांबीचा चकचकीत निळसर मासा सापडला होता. हा मासा किती तरी हजारो वर्षांपासून निर्वंश .(extinct) झाला आहे असा शास्त्रज्ञाचा समज होता. ऱ्होडस् युनिव्ह-र्सिटीचे प्राध्यापक जे. एल. बी. स्मिथ यानी या सिलॅकंथ माशाची कसून तपासणी केली तेव्हा त्याना आढळून आले की, हा मासा म्हणजे पाण्यातले प्राणी व जमिनीवरचे प्राणी यांमधील एक साखळी आहे. जीवनाचा आरंभ आधी पाण्यात झाला.

आणखी दुसरा एक सिलॅकंथ मासा १९५२ मध्ये पकडला गेला. या वेळेला इतर शास्त्रज्ञानीसुद्धा स्मिथच्या सिद्धान्ताला पुष्टी दिली. शतकानुतके लोप पावलेले प्राणी अचानक सापडतात याचे सिलॅकंथ हे उत्तम उदाहरण आहे.

तर आपला नॅसीसुद्धा खरेच लॅक नेसमध्ये असू शकेल हे अगदीच असंभवनीय नाही.

जून १९७७ च्या नॅशनल जिऑग्राफिक मासिकातसुद्धा नॅसीविषयी एक माहितीपूर्ण लेख आला आहे. नॅशनल जिऑग्राफिक मासिक आमच्या ग्रंथालयात नियमित येते. नॅसी खरोखरच आहे की नाही याचा शोध लावण्यासाठी परत एकदा शास्त्रज्ञांची तुकडी अर्कहार्ट बे जवळ गेली आहे. लॅक नॅस वगैरेंचे फार सुंदर फोटोग्राफ या अंकात आहेत.

–जे. एन्. पोंडा
–फिनिक्स लायब्ररी

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ असाही एक कट होता म्हणे !

आणीबाणी घोषित केल्यावर बाबुजीनी आणीबाणीला पाठिंबा दिला खरा; परंतु १५ ऑगस्ट १९४७ पासून एक कामराज योजनेचा अपवाद वगळता जवळजवळ सलग मंत्रिपद भोगणारे हे धूर्त म्हातारबोवा पुढे-मागे आपल्याला त्रासदायक ठरतील असा इंदिराजींचा अंदाज होता. आणीबाणीचा अमल पूर्ण प्रभावी असताना बाबूजी जरा हात राखून आहेत असा संशयही त्याना होता. इंदिराजीना फारसा पत्ता लागू न देता बाबुजींचा काटा काढण्याची एक अजब योजना, आणीबाणीच्या जबरी अमलाने धाक निर्माण करणाऱ्या चांडाळ चौकडीने आखली होती. इंदिराजींच्या खुनाच्या कटाचे सूत्रधार म्हणून बाबुजींना कैद करण्याचा एक धाडसी डाव कसा टाकला गेला होता याचा रंजक तपशील दिलीप गांगुली यानी 'अमृत बझार' पत्रिकेमध्ये प्रसिद्ध झालेल्या एका लेखामध्ये दिला आहे.

त्या वेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यानी बांगला देशच्या शेख मुजिबूर रेहमान यांच्याप्रमाणे आपल्याला ठार मारण्याचा एक कट करण्यात येत आहे असे २७ फेब्रुवारी १९७६ रोजी पाटणा येथे एका जाहीर सभेमध्ये बोलून दाखविले होते. बाईंच्या त्या भाषणाचे वृत्त देशामधील सर्व प्रमुख वृत्तपत्रामध्ये ठळकपणे प्रसिद्ध झाले होते; पण त्या वेळी अशी कोणालाही कल्पना आली नाही की, पोलिसखाते आणि बाईंच्या मार्गदर्शनाखाली काम करणारी 'रॉ' ही संघटना यानीच राजकारणामध्ये बाईंना त्रासदायक ठरणाऱ्या मंडळींना गोवून घेण्यासाठी या कटाची आखणी केली होती. कटाच्या योजनेप्रमाणे बाबुजींच्या विशेष सहवासामध्ये असलेल्या दोन सहकाऱ्यांकडून बळजबरीने कबुली-जबाब घेण्यात येणार होता. या कबुली-जबाबामध्ये त्यांना असे सांगावे लागणार होते की, बाबूजींनी इंदिराजींच्या खुनाची योजना आखून प्रत्यक्ष अंमलबजावणीचे काम त्यांच्यावर सोपविले होते. या कपोलकल्पित हत्याकांडामध्ये संजय गांधी यांचेही नाव हेतुतः गोवून घेण्यात आले होते. विरोधी पक्षाना नको असलेला राष्ट्रीय नेता म्हणून त्याची प्रतिमा उजळ व्हावी यासाठी हा प्रयत्न होता. या योजनेप्रमाणे इंदिराजींच्या खुनाची योजना आखल्याबद्दल जगजीवनराम, चंद्रशेखर व कृष्णकांत यांना अटक करण्यात येणार होती आणि या नकली खटल्याचे कामकाज गुप्त पद्धतीने चालविण्यात येणार होते–मुळात खटलाच नकली असल्याने कामकाजाचे स्वरूपही नकली ठेवण्यात आले होते. खटला झटपट चालवून गुन्हेगाराना शासन करणे आणि या राजकीय प्रतिस्पर्ध्यांचा काटा काढणे हाच मुळी या योजनेचा मूळ हेतू होता. समजा, या कटाच्या योजनेची यशस्वीपणे कार्यवाही झाली असती तर आज संरक्षणमंत्री असलेले जगजीवनराम, जनता-पक्षाचे अध्यक्षपद भूषविणारे चंद्रशेखर आणि अन्य मंडळी एक तर फाशी गेली असती अथवा त्यांची उरलेली हयात तुरुंगामध्ये खडी फोडण्यासाठी गेली असती !

### योजनाबद्ध आखणी

'रॉ' या संघटनेने कटाची अगदी योजनाबद्ध आखणी केली होती. दिल्ली, कानपूर, पाटणा आणि लखनौ अशा चार ठिकाणच्या सोळा साक्षीदारांची नावे निश्चित करण्यात आली होती. या सोळा-पैकी माफीचा साक्षीदार कुणी बनायचे, ज्यांना शिक्षा देतील त्यांची भरपाई कशी करायची याचाही तपशील निश्चित करण्यात आला. योजनेच्या खरेपणावर जनतेचा विश्वास बसावा म्हणून बाबुजींच्या निकटच्या सहवासातील दोन व्यक्तींना पकडून त्यांच्याकडून हवा तसा कबुली-जबाब मिळविणे हे एक अवघडच काम होते. त्या दृष्टीने नावाची चाचपणी सुरू झाली. शस्त्रास्त्रे कशी चालवावीत, बाँब कसे उडवावेत याचे शिक्षण दिले जात होते असा भास निर्माण करणारा पुरावा तयार करण्यात आला. कुतुबमिनारच्या जवळ एका ठिकाणी तसेच उत्तर प्रदेशामधील रामपूर येथे व नैनितालजवळ असलेल्या गंगापूर गावी पोलिसानीच अनेक शस्त्रास्त्रे पुरून ठेवली पुढे पढिक साक्षीदाराकडून जबाब घेतल्यावर या ठिकाणी छापे घालून शस्त्रास्त्रे जप्त करण्यात येणार होती. सी. आय. डी च्या 'अत्यंत महत्त्वाचे गुपित' असे लिहिलेल्या फाइलमध्ये कटवाल्यानी कुतुबमिनार-जवळील जागेची शस्त्रास्त्रे वापरण्याचा सराव करण्यासाठी निवड केली होती अशी नोंद आढळते.

१२ जून १९७५ रोजी न्यायमूर्ती जगमोहन लाल यांनी राजनारायण यानी दाखल केलेल्या निवडणूक-दाव्याचा निकाल दिला. त्यानंतर इंदिराजी काही दिवस गोंधळलेल्या होत्या. सत्तेवर राहण्याचा निर्णय त्यांनी घेतल्यावर त्यांना बारुआ आणि जगजीवन-राम या दोनच नावांची भीती वाटत होती बारुआंची डाव्या विचारसरणीच्या लोकामध्ये चांगली ऊठबस होती आणि थेट मॉस्कोपर्यंत त्यांचा संपर्क होता आणि इंदिराजीनी राजीनामा दिला असता तर . हा विचार बाबुजींच्या डोक्यातून कधीही न गेल्यामुळे त्यांना बाबुजींची धास्ती वाटत होती. समजा, इंदिराजीनी राजीनामा

दिलं असतं तर बाबुजींची पंतप्रधानपदी निवड होण्याची दाट शक्यता होती.

बाबुजींना पूर्णपणे बदनाम करून त्यांचा काटा काढण्याची ही योजना निश्चित झाल्यावर बाबुजींच्या विशेष सहवासामध्ये असलेल्या त्यांच्या सहकाऱ्यांची आणि मित्रांची एक यादी सी. आय्. डी. ने निश्चित केली सी. आय्. डी चे अकरा अधिकारी या यादीतून अखेरच्या नावाची निवड करण्याचे दृष्टीने चाचपणी करीत होते. नावे कमी करत करत त्यांनी पाच नावांवर लक्ष केंद्रित केले आणि *अखेरीस ६ ऑगस्ट रोजी दोन नावे निश्चित करण्यात आली. त्या*पैकी एक होते श्री. पी. एन्. सिंग, हे हरिजन गृहस्थ दिल्ली मेट्रोपोलिटन कौंसिलचे ते कॉंग्रेसपक्षीय सदस्य होते. तर त्या वेळी तरुण तुर्क-गटाबरोबर काम करणाऱ्या कुलवंत कुमार गुप्ता या अठ्ठावीस वर्षांच्या तरुणाची दुसऱ्या क्रमांकावर निवड करण्यात आली होती. हे गुप्ताजी सध्या मेट्रोपोलिटन कौंसिलचे जनतापक्षीय सदस्य आहेत.

गुप्ताजींना कटाच्या संदर्भात विचारले असता ते म्हणाले, 'मी त्या वेळी कॉंग्रेसचा क्रियाशील कार्यकर्ता होतो आणि चंद्रशेखर यांच्याशी माझी विशेष जवळिक होती. १९७५ च्या प्रारंभापासूनच इंदिराजी आणि संजय यांनी पक्ष ही खाजगी मालमत्ता असल्यासारखे वागावयास सुरुवात केली होती. त्यांच्या या धोरणाला मी, चंद्रशेखर, पी. एन. सिंग आणि कृष्णकांत यांनी विरोध केला होता. बाईंच्या धोरणाचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांच्या घरासमोर रोज मेळावे भरत असत. या मेळाव्यांना घेऊन जाण्यासाठी एक दिवस माझ्या घरासमोर ट्रक उभी राहिली. मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी मेळाव्यासाठी जाण्यास नकार दिला. एवढेच कारण पुरे होते, मी राजीनामा द्यावा असे मला सांगण्यात आले; पण मी दुर्लक्ष केले. पुढे २६ जूनला रात्री मी व श्री. सिंग यांनी बाबुजीबरोबर भेट निश्चित केली होती. त्याच दिवशी सकाळी आणीबाणी घोषित केल्याचे आम्हाला समजले. चंद्रशेखर व जयप्रकाश यानाही अटक करण्यात आली होती. आम्ही रात्री साडेदहाच्या पुढे बाबुजींच्या घरी गेलो. बाबुजींच्या घरात साध्या वेषामधील असंख्य पोलिस होते. बाबुजीबरोबर आम्ही दीर्घकाळ चर्चा केली. त्यांनी जाताना आम्हाला स्पष्टपणे असं सांगितले की, तुम्हाला योग्य वाटेल ते तुम्ही करा. आम्ही इंदिराजींना विरोध करण्याचा निर्णय घेतला. आम्ही भूमिगत होऊन राजकीय कार्य चालूच ठेवले. त्याच कारणासाठी आम्ही नैनितालजवळ गंगापूर येथे आणि उत्तर प्रदेशामध्ये रामपूर येथे गेलो होतो. खरी माहिती देणारी गुप्तपत्रके छापण्याचे व वाटण्याचे आमचे काम चालूच होते. आमच्या पाठी पोलीस नाहीत असे वाटल्यावर आम्ही वीस जुलै रोजी दिल्लीस परत आलो. भूमिगत कार्य चालू ठेवण्यासाठी आर्थिक सहकार्याची गरज होती. त्या दृष्टीने चाचपणी केली असताना आमच्या कामाबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्या एका पत्रकाराकडून चुकीचे मार्गदर्शन झाले आणि आम्ही अचूक पोलिसांच्या जाळ्यात अडकलो. सात ऑगस्ट रोजी आम्हाला अटक करण्यात आली. पोलिसी हिसका दाखवण्यासाठी मला लाल किल्ल्यावरील एका खोलीत नेण्यात आले. बाबुजींनी आम्हाला पैसे दिले आणि इंदिरा व संजय यांचा काटा काढण्यास सांगितले असा कबुलीजबाब त्यांना माझ्याकडून हवा होता. त्यासाठी मला बेदम मारपीट करण्यात आली. अनन्वित अत्याचार करण्यात आले. मोह पडावा अशा सवलती देऊ करण्यात आल्या. मी जर सहकार्य दिले नाही तर माझ्या वृद्ध वडिलांना अटक करून मला दाखवण्यात आलेला 'पोलिसी–हिसका' त्यांनाही दाखवण्यात येईल असे मला सांगण्यात आले. मी विलक्षण मानसिक अस्वस्थतेत होतो; परंतु त्यांना हवा असलेला कबुलीजबाब मी दिला नाही. मग मला तिहार जेलमध्ये नेण्यात येऊन शास्त्रशुद्ध पद्धतीने माझा छळ करण्यास प्रारंभ झाला. खून करण्यास उपयोगी पडेल असे *शिक्षण आम्हाला देण्यात आले होते, असे आम्हाला वारंवार सांग*ण्यात येऊ लागले. शस्त्रास्त्रे कोठे मिळाली याचा तपशील त्यांनी पुरवला. मानसिकदृष्ट्या हतबल करण्याच्या दृष्टीने हे सर्व प्रयत्न चालू होते. आम्हाला खुनाच्या कटात गोवून फाशी देण्यात येईल असेही सांगण्यात आले. अखेर एक दिवस गुप्त पोलीसअधिकारी न्यायमूर्तींना बरोबर घेऊनच आले. कबुलीजबाब देण्याची ही अखेरची संधी आहे असेही मला सांगण्यात आले. कबुलीजबाब तयारच होता; पण मी नकार दिला. पुन्हा एकदा जबर मारपिटीचा तडाखा मिळाला. अनेक कोऱ्या कागदावर माझ्या सह्या घेण्यात आल्या. १५ ऑगस्टला शेख मुजीब आणि त्यांच्या कुटुंबियांच्या हत्येचे वृत्त समजले. २३ मार्च १९७६ रोजी मला फतेगडच्या तुरुंगात हलवण्यात आले आणि त्यानंतर मात्र फारसा त्रास झाला नाही.

पी. एन. सिंग यांची कथाही यापेक्षा वेगळी नाही. मला पकडले त्याच रात्री त्यांना अटक करण्यात आली आणि सर्व पोलिसी अत्याचारांना त्यांनाही तोंड द्यावे लागले. त्यांना अशी धमकी देण्यात आली की समोर केलेल्या कबुलीजबाबावर जर त्यांनी सही केली नाही तर त्यांच्या बायकोला पकडून आणण्यात येईल आणि त्यांच्यासमोर तिच्यावर बलात्कार केला जाईल. २६ जून रोजी बाबुजींनी इंदिराजींना मारण्याचा सल्ला आपल्याला दिला असा कबुलीजबाब त्यांना हवा होता; पण सिंग यांनी नकार दिला. बाईंनी राजीनामा दिला असता तर ते सरकारच्या आणि पक्षाच्या हिताचे ठरले असते एवढेच बाबुजींनी सांगितल्याचे सिंग यांनी आपल्या जबाबात नमूद केले; परंतु तेवढ्याने पोलिसांचे समाधान झाले नाही. बेशुद्ध पडेपर्यंत त्यांना मारण्यात आले; परंतु तरीही कबुलीजबाब मिळू शकला नाही.

दोन प्रमुख साक्षीदार उभे करता न आल्याने— बाकी सर्व तयारी असूनही हा नकली कट कागदावरच फसला. समजा, हे कबुलीजबाब मिळवण्यात जर पोलिसांना यश आले असते तर—असा विचार आज मनात आल्यावाचून रहात नाही. □

## □ कॉंग्रेस निवडणूकनिधी....एक नवा फुगा

आणीबाणीमधील अत्याचारांच्या निनादाचे डमरू म्हणण्यासारखा आवाज देईनासे झाल्यावर काही तरी नवीन खेळण्याची आवश्यकता होतीच आणि हा खेळ हुशारीने खेळणाऱ्या चरणसिंगांच्या हाती नवीन फुगा आला... कॉंग्रेस निवणूकनिधी... चौकशीसत्र

पूर्ण झाल्यावर त्यांनी धवन, यशपाल कपूर आणि पी. सी. सेठी याच्यामागे चौकशीचे झगट लावून दिले. अर्थात हा तर केवळ प्रारंभ होता. वडे मासे अजून गळाला लागायचे आहेत असे चौधरी मोठ्या डौलात सागत आहेत. 'करंट' या इंग्रजी साप्ताहिकाचे संपादक अयुब सइद याना दिलेल्या मुलाखतीमध्ये कांग्रेस निवडणूकनिधीचा हा फुगा किती फुगविता येईल याची झलक चौधरी चरणसिंग यानी पेश केली आहे. कोटयवधी रुपयाची मालमत्ता कांग्रेस नेत्यानी केली असा आरोप चौधरीनी केला असून गैरमार्गाने जमविलेल्या या सपत्तीचो मुळे कांग्रेसच्या निवडणूकनिधीमध्ये सापडतात असे मत व्यक्त केले आहे. चरणसिंग याना असा प्रश्न विचारण्यात आला की, 'कोटयववी रुपयांचा निधी जमा करण्यात आला असे तुम्ही म्हणता; तेव्हा त्याला काही पुरावा आहे काय?' त्याला उत्तर देताना ते म्हणतात,– 'जवळजवळ ९०० कोटी रुपयाचा निधी जमा करण्यात आला आहे आणि त्यापैकी जवळजवळ साडेतीनशे कोटी रुपयांबाबतचा कागदोपत्री पुरावा आमच्या हाती आहे!' या निधीच्या संदर्भात एक महत्त्वाचा खुलासाही चरणसिंग यांनी केला आहे. ते म्हणतात– 'निधी कसा गोळा केला याची चौकशी चालू नसून पक्षाचा निधी व्यक्तिगत कारणासाठी कसा वापरण्यात आला याची चौकशी चालू आहे!' म्हणजे सध्या तरी या बेकायदेशीर निधीला हातभार लावून या निधीचा आगडोंब उभा करणाऱ्या मंडळीना गृहमंत्र्यानी चौकशी कक्षेबाहेर ठेवले आहे आणि या निधीचा गैरवापर कसा झाला या एकाच गोष्टीभोवती लक्ष केंद्रित केले आहे.

आणीबाणीतील अत्याचारांच्या पापाची तीव्रता पातळ होत असताना हे नसतेच लचाडे उभे राहिले म्हणून कांग्रेसवाले जाम वैतागून गेले आहेत. कांग्रेस पक्षाचे जे शिबीर मुंबईमध्ये अलीकडेच पार पडले त्यामध्ये बोलताना यशवंतरावासारखा सयमी नेताही अगदी पोटतिडकीने बोलला. 'निधीच्या चौकशीचे प्रकरण म्हणजे आणीबाणीपेक्षाही भयंकर प्रकार आहे!' अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. केवळ अत्याचाराबाबत चौकशी चालू होती त्या वेळी ही लागण आणीबाणी काळात गाजलेली चांडाळ चौकडी आणि स्वत: इंदिराजी याच्या पलीकडे जात नव्हती. म्हणजे आपल्या पापाची शिक्षा भोगण्यासाठी ही मंडळी बाजूला झाली. म्हणजे उरलेल्या कांग्रेसपक्षाला शुद्धिकरणाचे पत्रक आपोआपच मिळत होते. त्यामुळे या अत्याचाराच्या चौकशीबाबत बहुतेक कांग्रेस नेते मूग गिळून होते. मुंबई प्रदेश कांग्रेस समितीचे माजी अध्यक्ष रजनी पटेल यानी तर अशा चौकशी प्रकरणामध्ये काहीही गैर नाही असे स्पष्ट मत नोंदविले. मात्र कांग्रेस निधीच्या वापराबाबत होत असलेल्या चौकशीला कसून विरोध केला. 'केवळ सूडाच्या भावनेतूनच अशी चौकशी संभवते!' असेही ते म्हणाले. कांग्रेस अध्यक्ष ब्रह्मानंद रेड्डी यांनीही या निधी-चौकशी-प्रकरणाला कसून विरोध केला आहे. या चौकशीची इतर काय कारणे असतील ती असोत; पण कांग्रेसपक्षाला कोणत्याही परिस्थितीमध्ये तेज लाभू द्यायचे नाही हे या चौकशी-प्रकरणामागील राजकीय उद्दिष्ट आहे. आज चौधरीच्या भारतीय लोकदलाचे आणि जनसंघाचे जनता पक्षातर्गत जे वर्चस्व आहे त्याला जुन्या कांग्रेसचे काही लोक कंटाळले आहेत. जनता पक्षाखेरीज त्याना पर्याय राहू नये हा या चौकशीमागे दडलेला अर्थ आहे. राजकीय वर्तुळामध्ये अशी एक भीती व्यक्त केली जात होती की, आणीबाणीमधील अत्याचाराचे प्रायश्चित्त घेण्यासाठी दोषी असलेले नेते बाजूला झाले की उरलेली कांग्रेस आणि काही जुने कांग्रेसवाले पुन्हा एक होतील. निधी–चौकशी–प्रकरणाचे भूत उभे करून चौधरीनी ही सभाव्य नाळ कापून काढली आहे निधी वापराबाबत होत असलेल्या चौकशीची कुऱ्हाड कोणावर आणि केव्हा कोसळेल हे सागता येत नसल्याने आधीच अर्धांग झाल्यासारखी अवस्था झालेला हा पक्ष पूर्णपणे अस्वस्थ झाला आहे. या निधी वापराबाबतचे एक मजेशीर उदाहरण देण्यासारखे आहे. निवडणूक काळामध्ये पक्षाच्या उमेदवाराना जीप पुरविण्याचे कॉन्ट्रॅक्ट एका मोटार व्यावसायिकाला देण्यात आले. ए. आय् सी सी. मार्फत झालेल्या या कराराप्रमाणे या कॉन्ट्रॅक्टरने दररोज १८० रुपये भाडे घेऊन ३० दिवसासाठी जीप्स उपलब्ध करून द्याव्यात असे ठरले. या भाड्यामध्ये ड्रायव्हरच्या वेतनाचा किंवा पेट्रोलखर्चाचा समावेश नव्हता. लोकसभेच्या प्रत्येक मतदारसंघासाठी त्याने सात जीप्स पुरवाव्यात असे ठरले आणि या हिशेबाप्रमाणे १८०×७×३०=३७,५०० रुपयाची रक्कम त्याला देण्यात आली. कॉन्ट्रॅक्टर मोठा हुशार! जीप्स वगैरे जमवायच्या भरीस तो पडलाच नाही. त्याने प्रत्येक मतदारसंघामधील कांग्रेस उमेदवाराची गाठ घेतली आणि त्याच्या गाड्यांची सोय त्यानीच पाहावी असे त्याने सुचविले आणि प्रत्येक गाडीमागे रोज ११० रुपयेप्रमाणे रक्कम त्याच्या हाती ठेवली आणि केवळ या दलालीपोटी रोज प्रत्येक गाडीमागे ७० रुपयेप्रमाणे प्रचंड रक्कम आपल्या खिशात घातली. या कॉन्ट्रॅक्टरने लोकसभा उमेदवारांना जेव्हा रक्कम दिली त्या वेळी अर्थातच त्याच्याकडून पावत्याही घेतल्या. आज अनेक खासदार या पावत्या पोलिसाच्या हाती पडल्या आहेत काय, या कल्पनेने धास्तावले आहेत! कारण लोकसभेच्या सदस्यत्वाची शपथ घेताना त्यांनी आपण निवडणुकीसाठी ३५ हजाराहून जास्त खर्च केलेला नाही असे लिहून दिलेले आहे आणि जीपच्या संदर्भातील ही पोच त्याना चागलीच त्रासदायक ठरणार आहे! अर्थात या जीपभाड्याच्या पावत्या पोलिसांच्या हाती पडलेल्या आहेत की नाहीत हे जाणून घेण्यास अनेक मंडळी विशेष उत्सुक आहेत. या प्रकरणी विचारणा झाली तर हा पार्टीचा पैसा होता असे म्हणूनही त्याला हात झटकता येणार नाहीत. कारण हा पार्टीचा पैसा असल्यास खर्चाचा सारा व्यवहार सबंधित प्रदेश समितीतर्फे होणे आवश्यक होते.

कांग्रेसची निवडणूक निधीसंबंधीची आणखी काही गुपिते आपल्याला कळावीत यासाठी जनतासरकारचा आटापिटा चालू आहे. पोलिसांमार्फत चाललेल्या प्रयत्नांखेरीज अन्य पातळ्यांवरही भरपूर प्रयत्न चालू आहेत. या संदर्भात आणीबाणीच्या काळात गाजलेल्या चांडाळ चौकडीपैकी ओम मेहता याचे नाव घेतले जाते. हे ओम मेहताजी सध्या अजिबात प्रकाशझोतामध्ये नाहीत. बन्सीलाल, सजय आदी मंडळी बदनामीच्या निमित्ताने का होईना, परंतु वृत्तपत्रामध्ये झळकत आहेत; पण याच मंडळीच्या बरोबरीने हत्यार चालवलेल्या ओमसाहेबांचे नावसुद्धा ऐकू येत नाही. या ओम मेहताजीना अर्धांगाचा बारीकसा झटका आला होता आणि त्यातून सुधारल्यानंतर राजकीय वृत्तातून त्याचे नाव पुसले गेले आहे. आता आतली बातमी

अशी आहे की, ओमजी जनता पक्षाच्या वरीष्ठ नेत्याशी संपर्क साधून आहेत. ही बातमीही कॉंग्रेसच्या अनेक मंडळींना हादरा देणारी आहे. कारण मेहता यांना जनता पक्षाला ज्याच्यामध्ये गोडी आहे अशा अनेक गोष्टी माहीत आहेत आणि या साहेबदस्तुरांनी जर खरोखरच तोंड उघडले तर ते अनेकांना महाग पडणार आहे. जनता सरकारने पोलिसाचे झंगट ज्याच्या मागे लावलेले नाही असा बदनाम झालेला आणि तरीही आतापर्यंत बचावलेला एकमेव नेता म्हणून ओमजीचे नाव घेता येईल. या सरक्षणाच्या बदल्यात जनता सरकार त्यांच्याकडून काय हाती पाडून घेते ते बघायचे; पण दरम्यान उरलेल्या कॉंग्रेसपक्षामध्ये तरी पुष्कळच एकजूट पहावयास मिळत असून निधीप्रकरणी बदनाम झालेल्यांचा बचाव पक्षाने करावा अशी भूमिका घेतली जात आहे. ◻

## ◻ केरळमधील शीतयुद्ध

केरळच्या उच्च न्यायालयाने ठपका ठेवल्यामुळे तेथील संयुक्त दलाच्या मंत्रिमडळाचे नेतृत्व करणाऱ्या करुणाकरन याना राजीनामा द्यावा लागला आणि त्यांच्या जागी ए. के. अँथनी यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. आता माजी मुख्यमत्री करुणाकरन यानी इंदिराजीच्या आशीर्वादाने मुख्यमंत्र्याविरुद्ध मोर्चे बाधण्यास प्रारंभ केला आहे. कॉंग्रेस अध्यक्ष रेड्डी यानी प्रारंभी जरी करुणाकरन याना पाठिंबा दिला असला तरी इंदिराजीपासून दूर झाल्यावर त्यानी चव्हाणाच्या सल्ल्याप्रमाणे याचा पाठपुरावा चालवला आहे. अँथनी राज्याचे मुख्यमंत्री आहेत, त्याचप्रमाणे प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्षही आहेत. करुणाकरन याच्या म्हणण्याप्रमाणे अँथनी याची भूमिका रामाच्या पादुका सांभाळणाऱ्या भरताप्रमाणे आहे. म्हणजे समजा, जर सर्वोच्च न्यायालयाने करुणाकरन यांना राजन हत्याप्रकरणी दोषमुक्त ठरवले तर अँथनी यानी जागा खाली करून द्यावी असे त्याना वाटते. अँथनी आज भाडण्याच्या मनस्थितीमध्ये नसले तरी केवळ करुणाकरन सागतात म्हणून ते बाजूला होतील असे मुळीच नाही करुणाकरन याना त्यानी दिलेले उत्तर खास राजकीय स्वरूपाचे आहे. अँथनी म्हणतात– ' मला मुख्यमंत्रीपदाचा मोह नाही. ज्या वेळी विधिमंडळामधील संयुक्त विधायक दल माझ्या राजीनाम्याची मागणी करेल त्या दिवशी मी राजीनामा देऊन बाजूला होईन. मुख्यमंत्रीपद आणि प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्षपद एकाच व्यक्तिकडे असू नये अशी हाकाटीही करुणाकरन यानी चालवली आहे. केंद्रीय नेत्यापैकी फक्त इंदिराजी त्यांच्या मागे आहेत. एक तर आणीबाणीच्या काळात ज्यांनी आपल्याविरुद्ध टीका–टिप्पणी केली अशी व्यक्ती मुख्यमंत्री म्हणून गादीवर बसवली या गोष्टीचा त्याना राग आहे आणि नवीन मुख्यमंत्र्याला जर चव्हाण–रेड्डी याचा पाठिंबा रहाणार असेल तर आपला असा एक मनुष्य केरळमध्ये असावा अशी त्याची धारणा असून त्यांनी करुणाकरन याचा पाठपुरावा त्याच दृष्टिकोनातून चालू ठेवला आहे. न्यायालयाकडून दोषमुक्त झाल्यास मुख्यमंत्रीपद आणि दोषमुक्त न झाल्यास आपल्या मर्जीचा प्रदेश कॉंग्रेस अध्यक्ष बसविण्यात करुणाकरन उत्सुक आहेत. प्रदेश कॉंग्रेस अध्यक्षपदाबाबतही अँथनीची भूमिका साफ आहे. ते म्हणतात, ' करुणाकरन याच्या मागणीमध्ये काहीही गैर नाही. प्रदेश कॉंग्रेस पदाधिकाऱ्याच्या निवडणुका झाल्याच पाहिजेत अशी माझी धारणा असून मी तर जिल्हापातळीपासून निवडणुका घेण्यात याव्यात अशी मागणी कॉंग्रेसश्रेष्ठीकडे केली आहे.' त्यांच्या या स्पष्ट वक्तव्यामुळे करुणाकरन याच्या मागणीमधील हवाच काढून घेतली गेली आहे. नवीन मुख्यमंत्री त्यांच्या साध्या राहणीमुळे आणि सुस्पष्ट विचारसरणीमुळे बऱ्यापैकी लोकप्रिय आहेत आणि तरीही प्रादेशिक पातळीवर हुकमत मिळवण्यासाठी दिल्लीहून जे राजकारण खेळले जाते त्याचे प्रतिबिंब या शीतयुद्धामध्ये पहावयास मिळते. कर्नाटकमध्ये देवराज अरस आणि के. एच्. पाटील याच्यामध्ये चाललेल्या रणधुमाळीचे तेज केरळमधील या धुसफुशीला प्राप्त झाले नसले तरी न्यायालयीन निर्णयानंतर करुणाकरन कोणता पवित्रा घेतात याच्यावर पुढील गोष्टी अवलबून आहेत. ◻

---


ग्रामीण आंदोलनांचा मागोवा घेणारे पुस्तक

# श्री ग्रा मा य न

( दुसरी आवृत्ती : प्रकाशनाच्या वाटेवर )

श्री. ग. माजगावकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव । पुणे ३०

मूल्य : पंधरा रुपये

# मुक्ताफळे

पृष्ठ ३ वरून

पण तसे होण्याचे चिन्ह नाही म्हणून मी काँग्रेस सोडते आहे.'

—श्रीमती आयथाईड. २८-४-७७

असे एक का दोन फितूर म्हणावे! पुण्याचे भाऊसाहेब नातू गेले; भूतपूर्व कांग्रेस-मंत्री एच्. एम्. त्रिवेदी गेले; इंदिराजींचे एके काळचे लाडके दिनेशसिंग गेले आणि अगदी कहर म्हणजे ३० ऑगस्टला द्वारकाप्रसाद मिश्रा की हो गेले! १९ सप्टेंबरला जनता सरकारविरुद्ध रणशिंग फुंकण्याचा ठराव २४ ऑगस्टला पास झाला तेव्हा हे वर्किंग कमिटीच्या सभेला हजर होते. यांना एकाएकी असा 'तीव्र झटका' का यावा? पत्रकांत म्हणतात—

'मी पराभवानंतर चार वेळा दिल्लीला गेलो. वाटलं, आपला काही उपयोग होईल. प्रत्येक वेळी अधिकाधिक निराशा पदरी आली. उदासीन झालो. वाटलं, फुकट मी वेळ घालवतो आहे. इथे रहाण्यात अर्थ नाही! अमुचा रामराम घ्यावा!'

संन्यास घ्या म्हणावं संन्यास! वसंतदादांची सेकंडहॅन्ड कफनी तयार आहे. निराश व्हायला काय झालं? त्यांना वाटलं आता इंदिराजी जाणार; मग आपणच कांग्रेसचे पुढारी! पण इंदिराजी मुळी गेल्याच नाहीत. झाले हे उदासीन!

सर्वात दुःखकारक बातमी ६ सप्टेंबरला आली. श्री. यशवंतराव मोहित्यांचे जावई बंदिराजे खर्डेकर यांनी कॉंग्रेसमधल्या गटबाजीला कंटाळून राजिनामा दिला. विनाश जवळ आला की प्रथम जावई फुटतो असा इतिहास आहे. शहेनशहा मुसोलिनीचा जावई काउंट सियानो असाच ऐन वक्ताला उलटला! मुसोलिनीने गोळचाच घातल्या साल्याला! जावई असला म्हणून काय झालं?




हे सर्व दुःख पचवून हसणे सोपे होते काय? पण यशवंतराव चव्हाण, यशवंतराव मोहिते आणि दादासाहेब रूपवते यांनी शिबीराचे वातावरण पालटून टाकले.

प्रथम यशवंतराव मोहिते यांनी व्यक्तिगत दुःख विसरून, संघासंबंधी नवा क्रांतिकारक कार्यक्रम जाहीर केला. पंडित नेहरू व इंदिरा गांधी यांनी गेली ३० वर्षे संघाला गाडण्याचा कार्यक्रम हाती घेतला होता; परंतु खड्डा खणावा तो संघ मोठा झालेला; मोठा खड्डा खणावा तर संघ त्याहून मोठा झालेला! हा अनुभव जमेस धरून संघाला गाडण्याऐवजी अरबी समुद्रात बुडविण्याचा कार्यक्रम मोहित्यांनी मांडला! हा शिबीरात इतका पसंत पडला की हास्यकल्लोळात आणि टाळ्यांच्या गजरात तो संमत झाला. हे हास्य विरते न विरते तोच दादासाहेब रूपवते यांनी विनोद केला. उत्तर प्रदेशात कॉंग्रेसची जी धुळधाण झाली तो राग त्यांनी थोड्या विनोदी अंगाने पेश केला. तोच एकाएकी 'रूपवते मुर्दाबाद' असा घोष सुरू झाला. दादासाहेब गडबडले. विनोदाची आणि शोकांतिकेची सीमारेषा इतकी पुसट असते याची त्या बिचाऱ्यांना काय कल्पना? दादासाहेब दचकले. माफी मागितली. नवा विनोद आठवण्यापूर्वी त्यांची भाषणाची वेळ संपली हे श्रोत्यांचे कमनशीब; पण दादासाहेबांनी नाउमेद होऊ नये. गावोगाव शिबीरे भरणार आहेत. तिथे त्यांनी विनोदी भाषण करावे. दादासाहेब, विनोद तयार ठेवा!

यशवंतरावांनी—म्हणजे चव्हाणांनी आपला लाडका विनोदी प्रश्न समारोपात केला.

'जनता पक्षाच्या विजयाचा आनंद कुणाला झाला?' शरद पवारांच्या पोलिसांनी महाराष्ट्रात आनंद झालेल्या लोकांच्या याद्या तयार करण्याचे काम हाती घेतलेले आहे. पण ही यादी करण्यापेक्षा, ज्यांना दुःख झाले त्यांची यादी करणे सोपे आहे, असा पोलिसखात्याचा रिपोर्ट आला असावा!

विनोदी भाषण केले नाही शरद पवारांनी; पण म्हणून त्यांच्या भाषणात गंमत कमी होती असे नाही. त्यांनी जे बेदम आक्रमक भाषण केले त्यात त्यांनी सांगून टाकले—

'आज केवळ इंदिरा गांधीच बदनाम होत आहेत. उद्या आम्हा सर्वांनाच बदनाम केले जाणार आहे!'

पवारांना भविष्य समजते की काय कोण जाणे ! पण बदनाम करण्यासाठी जनता-पक्षाला फार प्रयत्न करावे लागत आहेत असे मात्र नाही. येथून जाऊन बदनामी कशा-करता ? तर कॉंग्रेसने जो ९०० कोटी रुपये फंड जमविला, त्यातले जे ३५० कोटी रुपये कॉंग्रेस नेत्यांनी हडप केले त्या प्रकरणात महाराष्ट्र कॉंग्रेसचा वाटा किती ? वस्तुत: यासबधात यशवतरावजी चव्हाण व रजनी पटेल यांनी मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत.

यशवंतरावाचे म्हणण 'सगळ्याच पक्षाच्या निधीची चौकशी का करीत नाही ?' रजनी पटेल याचे म्हणणे– 'राजकीय पक्षाच्या निधीची चौकशी करणेच बरोबर नाही. कारण ३५०००/– रुपयात निवडणूक लढविता येत नाही हे जगजाहीर आहे !' म्हणजे कॉंग्रेसनिधीत गडबड आहे याबद्दल या दोघांचे एकमत आहे. असू दे गडबड असली तर; पण जितक्या सहजपणे अटलांटिक महासागरात टिटॅनिक ही अजस्र बोट बुडाली तितक्या सहजपणे ३५० कोटी रुपये कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या समुद्रात गिळकृत झालेले आहेत ! या सर्व प्रकरणी कॉंग्रेस अध्यक्ष ह्मानद रेड्डीचे उत्तर आम्हाला फार आवडली.

'कॉंग्रेसनिधी किती ? तो कोणी जमवला ? कसा व कोणी खर्च केला ? यासंबंधी मला काहीही माहीत नाही !'

असा अध्यक्ष सस्थेला हवा ! रेड्डी यामुळे अज्ञानी ठरतील; पण डॅंबिस ठरणार नाहीत ! तेव्हा आपल्यातले कोणी फुटणार नाहीत एवढीच काळजी पवारानी घ्यावी. अशी काळजी घेतली तर मोठमोठे गुन्हे पचवता येतात. नाही तर ते द्वारकाप्रसाद मिश्रा ! कॉंग्रेसमधून फुटल्यावरोबर इग्रजी टाइम्सला पत्र ! १२–९–७७ च्या टाइम्समध्ये त्याचे पत्र प्रसिद्ध झाले आहे त्यात हा माणूस कबूल करतो–

'भावे कमिशनने मध्यप्रदेशाचा मुख्य मंत्री म्हणून मला व तेव्हाचे अन्नमंत्री गौतम शर्मा यांना गुलाबी चणा डाळीवरील निर्यातीचे निर्बंध उठविण्याच्या मोबदल्यात, १९६७ च्या निवडणूक फंडासाठी ५० लाख रुपये जमा केल्याबद्दल दोषी ठरविले आहे, ही गोष्ट खरी आहे; पण हे ५० लाख रुपये आम्ही काही स्वत:करिता जमविले असे कमिशन म्हणत नाही ना ?'

काय मूर्ख माणूस आहे ! कबूलच कशाला करता जमविले ५० लाख म्हणून ? आता लोक विचारणार– सरकारी परमिटे देताना कॉंग्रेसचे मंत्री व्यापाऱ्याकडून निवडणुकीसाठी असे लाखो जमवीत होते हे खरे दिसते. निवडणुकीनंतर मालाच्या किंमती वाढवून व्यापारी हे पैसे जनतेच्या खिशातून दाम-दुपटीने वसूल करीत होते ही गोष्टही सरकारी मन्त्र्यांना ठाऊक होती अलबत ! काय उलट्या काळजाचा हा धंदा ! वर पुन्हा नाटक म्हणून व्यापाऱ्यांनाच शिव्या !

आली का पचाईत ! द्वारकाप्रसाद मिश्रा कॉंग्रेसमधून फुटले आणि खरे ते सागत सुटले. जो कॉंग्रसला चिकटून आहे तो असे कधीही करणार नाही शरद पवाराना याची कल्पना आहेच. म्हणूनच त्याच्या भाषणात महत्त्वाचे वाक्य एकच आहे. ते म्हणजे–

'यासाठी आता सर्वांनी एकत्रितपणे काम करावे !'

अजून वेळ गेलेली नाही आहे इंदिरा गाधी जशा जाहीर सभेच्या शेवटी सर्वांना मोठ्याने 'जअय हिन्द' म्हणायला लावीत असत त्या पद्धतीने शरद पवारानी शिबीरा-शिबीरातून पुढील वाक्य सर्वांना म्हणायला लावावे. वाक्य तोडून तोडून माईकवरून सांगावे. प्रथम पवार म्हणतील मग जमलेले लोक–

'कॉंग्रेसनिधी किती ?'
'कॉंग्रेसनिधी किती–'
'तो कुणी जमविला ?'
'तो कुणी जमविला–'
'कसा व कुणी खर्च केला ?
'कसा व कुणी खर्च केला–
'यासंबधी–'
'यासबधी.'
'आम्हाला–'
'आम्हाला.'
'काहीही माहीत नाही !'
'काहीही माहीत नाही !'

और जोरसे–

'कॉंग्रेसनिधी किती ?'

या कार्यक्रमासाठी शेवटची दहा मिनिटे ठेवावी आणि हे सगळे झाले की मग

'जय हिंद !'

–ग्यानबा




# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरू झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या तपशिलासह लिहा. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्याना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

BHARAT AYURVEDASHRAM (M) P. O. KATRISARAI (GAYA)

# प्रतिवर्षी पुण्यात भरणारी एक चैतन्य-जत्रा
# पुरुषोत्तम करंडक नाट्य-स्पर्धा

रवींद्र गुर्जर

काहीशा उशीरानं, बरंच चर्वित-चर्वण झाल्यावर पुरुषोत्तम करंडक स्पर्धेबद्दल लिहायचं तर थोडं विस्तारानं लिहिणं योग्य ठरेल.

१९६३ साली फर्ग्युसनच्या अँफी थिएटरमध्ये महाराष्ट्रीय कलोपासक (पुणे) आयोजित अशी ही स्पर्धा सुरू झाली. यंदाचं तेरावं वर्ष. मध्यंतरी दोन वर्ष ती बंद होती; परंतु तेव्हापासून अखंड उत्साहात, वाढत्या प्रतिसादानं 'पुरुषोत्तम करंडक' पुण्याच्या नाट्य–जीवनात अपरिहार्य होऊन बसला आहे. ऑगस्ट महिन्याकडे महाविद्यालयीन युवकांचे दरवर्षी डोळे लागलेले असतात. तशा अलीकडे बऱ्याच संस्था एकांकिका–स्पर्धा घेतात. त्यात पी. डी. ए., रंगदीप, कामगार कल्याण केंद्र प्रामुख्यानं आहेत; परंतु कलोपासकइतका विश्वास आणि यश कोणीच संपादन केलेलं नाही.

या वर्षी १० दिवसांत २० महाविद्यालयांनी ३० एकांकिका सादर केल्या. कोणत्याही स्पर्धेतील हा उच्चांक ठरावा. परीक्षकांच्या मते त्यातील ८ प्रयोग उत्तम झाले तर बाकीचे २२ अत्यंत भिकार झाले. तथापि सामान्य प्रेक्षकांची अपेक्षा गृहीत धरता १५ एकांकिका चांगल्या झाल्या, असं निश्चित म्हणता येईल.

नव्या नियमांनुसार यंदा एकांकिका-दिग्दर्शन मुख्यतः विद्यार्थ्यांनीच केलं होतं. ३० पैकी ३ च ठिकाणी प्राध्यापकांनी पुढाकार घेतला. प्रत्यक्षात नाव एकाचं पण 'एम्' बिहाइंड कर्टन दुसराच असतो, ही तक्रार जुनीच आहे; पण त्याविषयी अधिक खोलात जायला नको. ६ एकांकिकांचे लेखक विद्यार्थी होते. बाकी नेहमीचे सिद्धहस्त, प्रथितयश वगैरे. तेंडुलकर, काणेकर, दळवी इ. जुने आणि एलकुंचवार, रमेश पवार हे अलीकडचे. २ एकांकिका रूपांतरित होत्या. एकंदर २६४ कलाकार भरतच्या रंगभूमीवर पदन्यास करून गेले. त्यातील बऱ्याचशा भूमिका कवायतीच्याच होत्या.

लेखन, दिग्दर्शन, अभिनय, तंत्र आणि अखेरीस प्रेक्षक हे गेल्या १३ वर्षांत आपापल्या परीने बदलत आलेले आहेत. तेंडुलकर, काणेकर इ. च्या एकांकिका आज-काल पूर्वीसारख्या 'अपील' होत नाहीत. १९६३ साली रोमांच उभे करणारी 'बळी' एकांकिका स्पर्धेत पहिली आली; ती या वर्षी साफ कोसळली. तरीही त्याच त्याच एकांकिका पुन्हा सादर करून प्रेक्षकांच्या सहनशक्तीचा अंत पाहिला जातोच!

दिग्दर्शन आणि तंत्र आज-काल विलक्षण सुधारलं आहे आणि अभिनयात सहजता येत चालली आहे.

### बदलता प्रेक्षकवर्ग

आता प्रेक्षकवर्गाविषयी. 'पुरुषोत्तम'पुरतं बोलायचं झालं तर प्रेक्षकांचे अनेक वर्ग पडतात. पहिला वर्ग म्हणजे स्पर्धक. त्यांना (मोफत) पूर्णोत्सवपत्रिका मिळते; परंतु या प्रेक्षकांची गर्दी हळूहळू वाढत जाते. कारण त्यांच्या एकांकिका सादर व्हायच्या असतात. तालमी जोरात चालू असतात. दुसरा वर्ग नियमित अन् हौसेनं येणाऱ्या प्रेक्षकांचा. त्यांचे चेहरे केव्हाही चटकन् ओळखू येतात. तिसरा वर्ग आपापल्या कॉलेजच्या वेळी कलाकारांना चिअरिंग देणे आणि कॉमेंटस् करणाऱ्यांना गप्प बसविण्यासाठी इमाने येणाऱ्या विद्यार्थ्यांचा. बुद्धिहीन कॉमेंट्स आणि एकांकिका पाडण्याच्याच महत्त्वाकांक्षेनं येणाऱ्या विघ्नसंतोषी लोकांचा वर्ग कमी; पण तोही आहेच. त्याशिवाय आपल्या मुला-मुलींचं कौतुक करण्यासाठी आलेला पालक आणि शिक्षकवर्ग. सरतेशेवटी आपल्या अनुपस्थितीमुळे प्रेक्षागृहात खळबळ माजेल अशा भ्रमात असलेला आणि 'काय शिक्षा आहे बुवा!' असं म्हणत हजर राहणारा चोखंदळ 'रसिक!'

या साऱ्या प्रेक्षकांची सहनशक्ती वाढली आहे, तसाच उतावीळपणाही वाढला आहे. पूर्वी पाहिलेली एकांकिका, तेच तेच 'थीम,' भिकार अभिनय, पाठांतर नसणे यातील प्रत्येक गोष्ट क्षणार्धात असह्य होऊ लागते. इंटेलिजन्ट कॉमेंट एखादीच; बाकी सारा भंपकपणा असतो आणि केव्हाही सभात्याग करणं आपल्या 'पायातलं'च असतं.

पुढील विवेचनापूर्वी स्पर्धेच्या नियमांविषयी थोडंसं. एका महाविद्यालयास दोन संघ पाठविता येतात. या वर्षीच्या प्रतिसादावरून त्यात बदल करावा, अस वाटतं. प्रत्येकी एकाच प्रयोगास परवानगी द्यावी. नाही तर पुढच्या वर्षी असेच ४०–४५ प्रयोग सादर व्हायचे.

एकांकिकेची किमान कालमर्यादा ३५ मिनिटांची आहे, ती ३० मिनिटावर आणावी काही एकांकिकांना ३५ मिनिटे 'भरविण्या'साठी करावी लागणारी ओढाताण आणि त्यामुळे प्रेक्षकांचे होणारे हाल पाहून तसा बदल अपेक्षित आहे

लेखन–दिग्दर्शनातील- प्राथमिक अवस्था लक्षात घेता विद्यार्थी लेखक किंवा दिग्दर्शक असावा हा आग्रह फारसा सुखकारक नाही

स्पर्धकाची वाढती सख्या लक्षात घेता 'अतिम निर्णय अदाज-स्पर्धे'त एखाद्या प्रेक्षकाला पारितोषिक मिळण हे लॉटरीच लाखाचं बक्षीस लागण्याइतकं दुरापास्त आहे त्यामुळे पहिले चार क्रमाक परीक्षकाच्या निर्णयाप्रमाणे देणाऱ्या प्रेक्षकाला सदर बक्षीस द्याव. हे क्रमाक देताना प्रेक्षकाला अभिनयनैपुण्य आणि दिग्दर्शन विचारात घ्यावं लागेलच, अर्थात हा बदल अनिवार्य आहेच असं नाही.

*स्पर्धेच्या सुरुवातीच्या काळात बी. जे. मेडिकलचा खूप दबदबा* होता. नतर अन्य महाविद्यालयानाही 'करंडका'चा लाभ होऊ लागला. सतीश आळेकर, सुहास तांबे, दिलीप जगताप यांसारखे लेखक आणि जब्बार पटेल, विद्याधर वाटवे, मोहन आगाशे, कल्पना भालेराव, मोहन गोखले, मंजिरी परांजपे हे कलाकार या स्पर्धेमध्ये प्रेक्षकांपुढे *आले. एकांकिकाचे सुदर 'फॉर्मस्' आणि 'कॉम्पोझिशन्स' बघायला* मिळाली. त्या दृष्टीन कलोपासकाचा हा उपक्रम अत्यत लोकप्रिय आणि यशस्वी झाला आहे, यात शंका नाही.

## उल्लेखनीय एकांकिका

*पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागानं सादर केलेली* एकांकिका 'रक्तपुष्प' या वेळी करडक मिळवून गेली. अभिनय-नैपुण्याच पारितोषिक याच एकांकिकेतील सुषमा देशपांडेला मिळालं. फर्ग्युसनन हीच एकांकिका केली. त्याचा प्रयोगही प्रेक्षकांनी 'ॲप्रिशिएट' केला होता. 'परीक्षकाचा निर्णय अतिम', अस एकदा ठरल्यानतर त्याबद्दल चर्चा करायच कारण नाही. त्यांची अभिरुची आणि समज आपण नम्रपणे गृहीत धरायलाच हवी. नाही तर त्याना नेमणाऱ्या कलोपासक सस्थेवर अन्याय केल्यासारख होईल शिवाय बक्षीस न मिळालेल्या हितसबधी व्यक्ती नाराज होणं साहजिकच आहे आणि क्रमाक देण ही परीक्षकांपुढे बिकट कामगिरीच असते. या वर्षीचंच उदाहरण घेतलं तर आठ एकांकिका प्रेक्षकाच्या पूर्ण पसतीस उतरल्या. 'स्पर्धेतलं नाटक' आणि 'भोलेश्वरनगरीचा भोलेनाथ राजा' या दोन एकांकिकाना प्रेक्षकानी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्याच वर्चस्व वगळता बाकीच्या सहा प्रयोगामधून बक्षीसपात्र एकांकिका ठरवणं सोप नव्हत. हे परीक्षकाची बाजू घेणं नसून त्यांच्या भूमिकेतून केलेला विचार आहे

सादर झालेल्या क्रमानुसार त्या आठ एकांकिका अशा : कैद (बी. जे. मेडिकल), रक्तपुष्प (वृत्तपत्र विद्या विभाग), कुणी गोविंद घ्या (शाहू), स्पर्धेतलं नाटक (अभियांत्रिकी), पिदी (अभिनय कला), अग ॲण्ड टेम (बी. जे.), भोलेश्वरनगरी... (पुणे विद्यापीठ), बूटपॉलिश (मॉडर्न)

डेथ ऑन दि रेल्वेलाइन (गरवारे वाणिज्य), वेटिंग फॉर घासलेट (टिळक आयुर्वेद), आदिताल (अभियांत्रिकी), चेकनाका (सिम्बॉयसिस), साहू ऽ स्नवा ऽ ऽ ट (टिळक आयुर्वेद) रक्तपुष्प (फर्ग्युसन) आणि डिक्टेटर (स. प ) या सात एकांकिकाही समाधानकारक झाल्या.

बाकीच्या पधरा प्रयोगाबद्दल फारसं न बोलणंच चागल आई-वडिलांशी मतभेद, बेकारी, असफल इटरव्ह्यू आणि प्रेम वैफल्य या गोष्टी विद्यार्थ्यांना लिहिण्यास उद्युक्त करतात. त्यामुळे तोच तोचपणा येण अपरिहार्य. अशा विद्यार्थ्यांचा नाटयलेखनाविषयी अभ्यासही नसतो. कंटाळवाणी लावलचक स्वगते, रंगभूमीवर कलाकारांची अखड आवक-जावक बिचाऱ्या प्रेक्षकानं कुठवर सहन करायची? मायमिग आणि ड्रील यांचाही हल्ली अतिरेक होऊ लागला आहे.

यंदा अन्याय झालाच असेल तर तो फक्त 'अभिनय कला'च्या 'पिदी' एकांकिकेवर ! पहिल्या चार क्रमाकात तिचा समावेश होऊ शकला नाही, याच सर्वांनाच आश्चर्य वाटलं. लेखनदृष्टया प्रयोग कमकुवत होता आणि पारितोषिकवितरण समारंभाचे अध्यक्ष महेश एलकुंचवार याच्या मते सदर एकांकिका फॉर्मच्या फार आहारी गेली होती. तथापि प्रयोग उल्लेखनीय झाला होता. म्हणूनच एलकुंचवारानी बक्षीसपात्र न ठरलेल्या सघाचंही अभिनंदन केलं. ते म्हणाले की, 'कलाकाराच्या शर्यती मला पसत नाहीत, प्रत्येक *कलाकाराने आपापली वाट तुडवायची असते चिकाटीन आणि* आत्मविश्वासानं.' महेशजींचं हे भाषण म्हणजे समयोचित, मोजक्या शब्दात नेमके विचार व्यक्त करण्याचा आदर्श नमुना होता.

स्पर्धेबाबत त्यांच्या विचारांशी मात्र सर्वजण सहमत होतीलच अस नाही स्पर्धा म्हणून प्रेक्षकासमोर उतरल्यावरही जवळजवळ *निम्मे प्रयोग भिकार झाले. त्यातील कलाकार सर्व काही अत्यंत* 'लाईटली' घेत होते. उत्तम निर्मितीसाठी चुरस लागण्यात काहीच हरकत नसावी मुकुद टाकसाळे याच्या 'स्पर्धेतलं नाटक' या एकांकिकेत प्रायोगिक नाटकाची मुक्त टिंगल उडविलेली आहे. त्याबाबत बोलताना एलकुंचवार म्हणाले होते की, 'आम्ही प्रायोगिक *मडळींनी इतक हळवं असायचं काहीच कारण नाही टाकसाळयानी* अत्यत इन्टेलिजन्टली आमच्या चुका दाखवून दिल्या आहेत कुणी तरी हे करायलाच हवं होत.' हे जर खरं असेल आणि आहेच तर स्पर्धेत बक्षिस मिळालं नाही तरी नाउमेद, निराश होण्याच कारणच काय ?

*ज्या एकांकिकात काही नाविन्य आढळल, अशा काहीचा परामर्ष :*

सदानद बोरसे याच्या समर्थ अभिनय-दिग्दर्शनामुळं बी. जे. ची 'कैद' रंगली. या एकटया कलाकारान अखेरपर्यंत प्रयोग पेलला.

वृत्तपत्र विद्या विभागाची 'रक्तपुष्प' यशस्वी झाली ती एलकुंचवाराच्या लेखनामुळं आणि यातील चारही कलाकाराच्या उत्तम अभिनयान. मुलगा युद्धात मेलेला, थड स्वभावाचा नवरा, राग राग करणारी मुलगी आणि त्यातच आजार यामुळे जीवन उद्‌ध्वस्त झालेल्या एका स्त्रीची ही कथा. भूमिकेचं बेअरिंग सुषमा देशपांडेला उत्तम साधल. इतर तीन कलाकाराची साथही तितकीच प्रभावी होती.

## स्पर्धेतलं नाटक

'स्पर्धेतलं नाटक' अभियांत्रिकीनं सादर केलेल्या या एकांकिकेचं कौतुक करावं तितकं थोडंच आहे. मुकुद टांकसाळे यानी याचं लेखन अत्यंत गणिती पद्धतीनं, नेमके रिस्पॉन्सेस हमखास मिळतील असं बांधेसूद बेतलं आहे. वरकरणी सोपं वाटलं तरी अशा प्रकारचं लेखन अत्यंत अवघड आहे. विशिष्ट प्रेक्षकवर्ग डोळ्यांसमोर ठेवून रंगभूमीवरील तांत्रिक बाबींचा उत्तम उपयोग करून घेणं त्यांना विलक्षण साधून गेलं. यातील एकही कलाकार कमी पडून उपयोगी नव्हता आणि प्रत्यक्षातही पंधरा कलाकारानी अत्यत सहजपणे काम करून प्रेक्षकांच्या सतत टाळयाच घेतल्या. प्रायोगिक नाटकांची आणि कलाकरांची यात टिंगल उडविलेली आहे. याचा अर्थ त्या नाटकाचा सूक्ष्म अभ्यासही लेखकाकडून अपेक्षित होता. सदर एकांकिकेचा प्रयोग झाल्यावर भरत नाटयाच्या आवारात प्रेक्षकानी मुकुंद टांकसाळे यांना अक्षरशः डोक्यावर घेतलं. गेल्या कित्येक वर्षांच्या नाटयेतिहासात हे भाग्य कोणा लेखकाला लाभल्याचं ऐकिवात नाही. ही एकांकिका पूर्णपणे निर्दोष होती, असं मात्र नाही. यातील कीर्तनाचा प्रसग ताणलेला आहे. 'अरे, आपण स्पर्धेतलं नाटक करतोय्' ही जाणीव कलाकारांनी वारवार करून द्यायचं काहीच कारण नव्हतं आणि तिसरी गोष्ट म्हणजे यांत विस्कळितपणा होता. वेगवेगळे प्रसग एकामागून एक कृत्रिमपणे सांधल्यासारखे वाटत होते. तथापि प्रयोग मात्र निस्संशय अप्रतिम झाला!

अभिनव कलाच्या 'पिदी' विषयी वर लिहिलंच आहे. यातील वेगळेपण म्हणजे कलाकारानी एकदा लहान मुलांचं आणि लगेच मोठ्या व्यक्तींचं बेअरिंग उत्तम राखलं. राजश्री पाटणकरची भूमिका उल्लेखनीय.

बी. जे. मेडिकलची दुसरी एकांकिका 'अस ॲण्ड देम.' 'टीमवर्क' आणि 'कॉम्पोझिशन्स' यामुळे प्रेक्षक खूष!

पुणे विद्यापीठाच्या गणित विभागाचं वगनाटय 'भोलेश्वर-नगरीचा भोलेनाथ राजा' प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलं. लेखक, दिग्दर्शक आणि प्रमुख भूमिका असलेला उमेश देशपांडे हा शाहीर दादू मारुती इंदुरीकर किंवा दादा कोंडकेंच्या सहजतेनं रंगभूमीवर वावरतो. त्याची वाक्यांची फेक लाजवाब आहे. ढोलक्याच्या बोलांबरोबर ही एकांकिका चढत गेली. पुणे विद्यापीठाचे आवार आणि कारभार यांची कल्पना असणाऱ्या लोकांनाच खरा आनंद लुटता आला. प्रचलित राजकारणही त्यांत बेमालूम घुसडलं होतं. उमेश देशपांडेला व्यावसायिक रंगभूमीवर उज्ज्वल भविष्यकाळ आहे.

एक नृत्यांगना आणि लयीत स्वतःचं भान विसरलेला एक मृदंगी यांच्या भावजीवनाची कथा 'आदिताल' हा प्रयोग करण्याचं धाडस दाखविल्याबद्दल अभियांत्रिकीचं अभिनंदन! मंजू भिडेचा नृत्याविष्कार सुदर.

## काही विचार

महाविद्यालयीन एकांकिकाना अद्याप स्त्री-कलाकाराची वाण दिसते. याबाबतीत काही भाग्यवान सस्था सोडल्यास सामान्यतः स्त्री-कलाकार सुमार असतात. याची कारणं काय असू शकतील ?

प्रयोगासाठी मंजूर होणाऱ्या कॉलेजाच्या बजेटमध्ये बरीच तफावत आढळते. काही ठिकाणी १०००/- रुपये तर काही ठिकाणी अवघे १००/- रुपये. ही अवस्था बदलली पाहिजे. एकांकिकेप्रमाणे योग्य तो विचार करून बजेट ठरलं पाहिजे. त्याशिवाय चांगले प्रयोग पुढे येणार नाहीत.

एकांकिकेची निवडे आणि दिग्दर्शन पूर्णपणे विद्यार्थ्यांवर सोपवू नये. जाणकार प्राध्यापकांनी यात पुरेसं आणि मनापासून लक्ष घालावं. 'पुरुषोत्तमला' प्रयोग सादर करणं ही प्रेस्टीजची बाब झाली आहे. तथापि पात्राची निवड करताना वशिलेबाजीचे प्रकार घडू नयेत.

नाटयशास्त्राचे प्राथमिक धडे कलाकारांना मिळणं अत्यत आवश्यक आहे शक्य झाल्यास कलोपासकच्या किंवा अन्य सस्थांच्या सदस्यांनी निरनिराळ्या कॉलेजांत तालमीच्या वेळी भेट देऊन उत्साही कलाकारांना आणि दिग्दर्शकाला योग्य त्या सूचना द्याव्यात. त्यामुळे स्पर्धेचा दर्जा वाढू शकेल.

कलोपासकने अभिनयनैपुण्याबद्दल स्त्री कलाकार आणि पुरुष कलाकाराला स्वतंत्रपणे प्रथम पारितोषिक द्यावं. तसंच नेपथ्य आणि प्रकाशयोजनेसाठी पारितोषिकं असावीत.

जाता जाता, स्पर्धेच्या वेळी वाटण्यात येणाऱ्या पुस्तिकेबद्दल पूर्णोत्सवपत्रिका घेणाऱ्या प्रेक्षकांना ही पुस्तिका वाटण्यात येते. तिची छपाई तर उत्कृष्ट असतेच शिवाय सुरुवातीपासूनच्या स्पर्धेतील विजेत्यांची यादीही त्यात दिलेली असल्यामुळे अभ्यासू नाटय-रसिकाला तिची विशेष उपयुक्तता वाटते. तरुण कलाकारांना मार्गदर्शन व्हावं या दृष्टीनं आज आघाडीला असलेल्या एखाद्या नाटय-कलावंताकडून खास लेख लिहून घेऊन त्याचा पुस्तिकेत समावेश केल्यास उत्तमच. □


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन पुणे-३०

## ‘ मी आक्रमक धोरण स्वीकारणार ! ’

**मा. यशवंतरावांच्या या नव्या आक्रमक पवित्र्याला आव्हान मिळणार मराठवाड्यातून. येत्या निवडणुकीत मराठवाडा कौल कुठे लावतो यावरच महाराष्ट्रातील काँग्रेसचे म्हणजेच यशवंतरावांचे भवितव्य ठरणार !**




## या मराठवाड्याचा माणूस प्रतिनिधींनी घेतलेला कानोसा

- मराठवाड्यातील नेतृत्व यशवंतरावांनी पुढे येऊ दिले नाही हे खरे नाही. शंकरराव चव्हाणांना तर त्यांनीच बोट धरून राजकारणात आणले. उलट शंकररावांनीच स्वत:शिवाय इतर कुणाला वाढू दिले नाही. काँग्रेसमध्ये व मंत्रिपदावर असतानाही शंकररावांनी परभणी जिल्ह्यात शे. का. पक्षाला खतपाणी घातले आणि यशवंतरावांनी मराठवाड्यावर अन्याय केला ही कल्पनाच मुळात चुकीची आहे. कारण मराठवाड्याचा विकास नक्कीच पुरेसा झालेला आहे.

  – *माणिकराव पालोदकर*, (माजी काँग्रेस खासदार)

- आता खुद्द यशवंतरावही आपण मराठवाड्यावर अन्याय केल्याचे कबूल करतात.

  – *बाळासाहेब पवार*, (काँग्रेस आमदार)

- हा नवा आक्रमक पवित्रा यशवंतरावांच्या राजकीय जीवनातला एक मोठा turning point ठरणार आहे. कारण हा काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाचा, म्हणजेच पर्यायाने त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे.

  – *एक पत्रकार*, औरंगाबाद

- यशवंतराव हा ‘ गुळमट लुच्चा ’ आहे !

  – *मराठवाड्यातील ग्रामीण स्त्रीवर्गाची प्रतिक्रिया*

- आणीबाणीला गप्प राहून किंवा सक्रियपणे ज्यांनी ज्यांनी पाठिंबा दिला, त्या कुणालाच मी लोकशाहीवादी म्हणणार नाही. यशवंतरावही लोकशाहीचे शत्रूच आहेत. त्यांच्या स्थितिवादी राजकारणाचा स्थायीभाव सत्ता आहे. कुठलेही तत्त्वज्ञान नव्हे.

  – *अनंतराव भालेराव*, संपादक, दैनिक मराठवाडा


# माणूस : कृष्णा-कोयना विशेषांक

**प्रसिद्धी : १ ऑक्टोबर        किंमत : अंदाजे सव्वा रुपया**

**‘ रायबरेली अंक ’ कमी पडला. तेव्हा विक्रेत्यांनी आपल्या मागण्या त्वरित नोंदवाव्यात.**